भटकती आत्मा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८४८



REFBK-0023110

संपादक : वि. सी. जोशी.

विचार प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

9 AUG 1981

(क्र. मा. प.)
५०००-४-८०

निबंध
२८४८
२३७१०
संदर्भ शारखा
२४।२।८१

समग्र क्रांती

संपादक मंडळ
वसंत मुळे, सुनील दाते,
सौ. कमल मुळे

कार्यकारी संपादक
वि. सी. जोशी

REFBK-0023110

विचार प्रकाशन, औरंगाबाद

पूर्वीची प्रकाशने

भारतीय मध्यम वर्ग १९७३

भारताचे परराष्ट्रीय धोरण १९७४

भारतीय खेडी व जाती १९७६

जनता पक्ष : राजकारण आणि आर्थिक धोरण १९७८

क्रोचेचे सौंदर्यशास्त्र १९७९

सर्व हक्क विचार प्रकाशनाकडे

प्रकाशक : **सुनील दाते**, चिटणीस, विचार प्रकाशन, २ समाधान कॉलनी, सेशन्स कोर्टामागे, औरंगाबाद (महाराष्ट्र)

मुद्रक : **ज. रा. बर्दापूरकर,** व्यवस्थापक, जयहिंद प्रिंटिंग प्रेस, औरंगाबाद (महाराष्ट्र)

प्रथमावृत्ती : ऑक्टोबर १९८०

किंमत : **चोवीस रुपये**



संपूर्ण क्रांतीचे आवाहन

सङ्गच्छध्वं सं वदध्वं सं वो मनांसि जानताम् ।
देवा भागं यथा पूर्वे सञ्जानाना उपासते ॥ १ ॥

(लोकहो, तुम्ही एका विचाराचे, एक भाषणाचे आणि एक ज्ञानाचे व्हा. पुरातन सहविचारी लोकांप्रमाणे तुम्ही आपली कार्ये एकमताने करा.)

समानो मन्त्र समितिः समानो समानं मनः सहचित्तमेषाम् ।
समानं मन्त्रमभि मन्त्रये वः समानेन वो हविषा जुहोमि ॥ २ ॥

(लोकहो, तुमची सर्वांची प्रार्थना, विचारस्थान, तसेच ज्ञान आणि मने एकसारखी असावीत. एकाच सामग्रीने तुम्ही देवपूजन करावे.)

समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥ ३ ॥

(लोकहो, संघशक्तिपुष्टयर्थ तुमचे अभिप्राय, अंतःकरण, तसेच मन एकसारखे असावे.)

(ऋग्वेदातील दशम मंडलातील संज्ञान सांगणाऱ्या ऋचा).

प्रास्ताविक

महाविद्यालयाच्या स्टाफरूममध्ये प्राध्यापक अनेक प्रश्नांवर चर्चा करीत असतात. अशा चर्चांना विषयाचे बंधन व अभ्यासाची जोड देऊन पुस्तकरूपाने मांडण्याच्या कल्पनेतून विचार प्रकाशनाने आकार घेतला. विचार प्रकाशनाच्या सभासद–प्राध्यापकांनी समग्र क्रांती या विषयावर केलेल्या चर्चेतून प्रस्तुत पुस्तक तयार झाले आहे. मध्यंतरीच्या काळात प्रकाशनातील सातत्य टिकविण्यात आले असले तरी सभासदांतील सहकार्याभावी लेखक प्राध्यापकांची संख्या रोडावत गेली. सर्वांना पुन्हा 'समग्र क्रांती' त एकत्र आणण्यात आम्हाला यश आले आहे. या सहकार्यात सातत्य टिकविण्याचा आमचा प्रयत्न राहील.

'समग्र क्रांती' हे जयप्रकाश नारायण यांच्या तत्त्वज्ञानावरील पुस्तक प्रकाशित करताना आम्हाला आनंद होत आहे. या पुस्तकाद्वारे आम्ही लोक–नायकांच्या स्मृतीला वंदन करीत आहोत. विचार प्रकाशनचे हे सहावे प्रकाशन.

या पुस्तकातील लेखांमधून जयप्रकाश यांच्या विचारांचे चिंतन करण्याचा प्रयत्न विचार प्रकाशनाच्या सभासदांनी केलेला आहे. त्यावर आपल्या शंका व मतभेदही मुक्तपणे व्यक्त केलेले आहेत. जयप्रकाशांचे विचार व्यावहारिक–दृष्टचा विचार करता केवळ आदर्शवादी वाटतील. पण विचारांचे स्वतःचे असे सामर्थ्य असते जे कालांतरानेही जाणवू लागते. जयप्रकाशांच्या आदर्शांना आजचा काल अनुकूल नाही व हे त्यांच्या जीवनकार्यातच त्यांनी अनुभवले व पाहिले आहे. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे विचार केव्हा फलद्रूप होतील हे सांगता येत नसले तरी लोकशाही मूल्यांचा स्वीकार करणाऱ्यांना ते सदैव मार्गदर्शक ठरतील यात शंका नाही. त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीला त्यांच्या विचारांचा अभ्यास करून आम्ही त्यांच्या ऋणाची अल्पशी फेड करीत आहोत.

बिहार आंदोलनात ५ जून १९७४ ला पाटण्यात केलेल्या जाहीर सभेतील भाषणातून जयप्रकाशांनी संपूर्ण क्रांतीची कल्पना मांडली. तेव्हापासून संपूर्ण क्रांतीचा विचार आपण ऐकत आलेलो आहोत. लोकक्षोभाला उन्नत करून संपूर्ण क्रांतीचे अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा जयप्रकाशजींचा प्रयत्न रहात आलेला होता. जनता सरकार प्रस्थापित होण्यात जयप्रकाशांचा मोठा वाटा होता. सर्व देशाचे लक्ष त्यांच्यावर केंद्रित झालेले होते. संपूर्ण क्रांतीच्या विचारांची

चर्चाही त्यामुळे सुरू झाली. विचार प्रकाशनाचे सदस्यही त्यापासून दूर राहू शकले नाहीत. त्यांच्याच आग्रहामुळे संकल्पित प्रकाशनाऐवजी मध्येच 'समग्र क्रांती' या विषयावरील प्रकाशन हाती घेण्यात आले.

समग्र क्रांतीच्या विचारांची चर्चा सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवावी ही आमची इच्छा आहे. हा प्रयत्न कितपत साधला आहे हे वाचकांनी व संपूर्ण क्रांतीच्या विचाराच्या आलोचकांनीच ठरवावयाचे आहे. यातील यश लेखक सभासदांचे, अपयश आम्हा पदाधिकाऱ्यांचे.

जयहिंद प्रेसने अतिशय अल्पकाळात पुस्तक छपाईचे काम पूर्ण करून दिले त्याबद्दल जयहिंद प्रेसचे व्यवस्थापक श्री जगन्नाथराव बर्दापूरकर व कर्मचारी वर्ग यांचे हार्दिक आभार. बर्दापूरकरांचे सहकारी श्री रामकृष्ण जोशी यांच्या विशेष सहकार्याचा उल्लेख आवश्यक वाटतो.

मुखपृष्ठाचे सजावटीचे काम श्री. व्यंकटेश देशपांडे यांनी केले आहे, त्याचा ऋणनिर्देशही आवश्यक आहे.

वसंत मुळे
अध्यक्ष
विचार प्रकाशन, औरंगाबाद

अनुक्रमणिका

१ समग्र क्रांती : स्वरूप, तात्त्विक बैठक व वैचारिक विकास.
– वि. सी. जोशी १

२ संपूर्ण क्रांतीचे अर्थशास्त्र
– दिनकर बोरीकर १९

३ सामाजिक परिवर्तन
– सौ. कमल मुळे ३१

४ समग्र क्रांतीचा राजकीय आशय
– सुनील दाते ४०

५ लोकसमित्या
– व. रा. मुळे ५९

६ भारतीय राष्ट्रवादाचा आध्यात्मिक आशय
– सौ. शशिकला जोशी ६९

७ संपूर्ण क्रांतीचे मार्ग व तंत्र
– रमेश ढोबळे ७७

८ समस्या व भवितव्य
– वि. सी. जोशी ८९

९ जयप्रकाश नारायण : जीवनाची वाटचाल
– चंद्रकांत न्यायाधीश ९९

समग्र क्रांती :
स्वरूप, तात्त्विक बैठक व वैचारिक विकास

वि. सी. जोशी

१. स्वरूप

जयप्रकाश नारायण यांच्या दृष्टीने समग्र क्रांती मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत शांततेच्या मार्गाने परिवर्तन घडवून आणणे यात आहे. अर्थव्यवस्था, राजकीय व्यवस्था, समाज व्यवस्था, शिक्षण, सांस्कृतिक जीवन या सर्वांमध्ये हा बदल घडून येणे समग्र क्रांतीत अभिप्रेत आहे. मानवी जीवनातील नैतिक स्तर उंचावणे व माणसातील मानवी गुणांची वाढ करणे हे या क्रांतीचे उद्दिष्ट असेल व याकरता होणारा संघर्ष हा अनत्याचारी असहकार कायदेभंग व सविनय अवज्ञा आंदोलन, जनजागृती व लोकशाही दडपण या स्वरूपाचा असेल.

समग्र क्रांतीच्या संदर्भात जयप्रकाश नारायण यांच्या कल्पना परिस्थिती-जन्य आहेत. यामुळे या कल्पनांना तार्किक सुसंगती देण्याचा त्यांनी वेळोवेळी केलेला प्रयत्न अर्धवट राहिलेला दिसतो. परंतु स्वतःमध्ये या कल्पनांना व्यावहारिक संदर्भ आहे व म्हणून त्या उपयुक्त आहेत. या कल्पना मांडताना जयप्रकाश नारायण यांच्या भूमिका कोणत्याही तत्त्वज्ञानाच्या चौकटीत बसणाऱ्या नाहीत. त्या मार्क्सवाद व गांधीवाद या दोन्हींनी प्रभावित झालेल्या आहेत. परंतु त्या केवळ मार्क्सवादी किंवा गांधीवादी आहेत असे म्हणता येत नाही. मार्क्सवादाकडून गांधीवादाकडे जयप्रकाश नारायण यांची वाटचाल संपूर्ण क्रांतीच्या संकल्पनेत मूर्त स्वरूप घेते.

जयप्रकाश नारायण स्वतः जेव्हा समग्र क्रांतीची कल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांचा भर प्रामुख्याने आर्थिक, राजकीय, सामाजिक, नैतिक व शैक्षणिक बाबतीत दिसून येतो. परंतु त्यांनी आपल्या क्रांतीच्या कल्पनेला सप्तरंगी म्हटले आहे व सांस्कृतिक, बौद्धिक व आध्यात्मिक क्षेत्रातही क्रांती आपल्याला अभिप्रेत आहे असे ते सांगतात.

अ) आर्थिक क्रांती

आर्थिक क्षेत्रात क्रांतीचे स्वरूप काय असेल हे सांगताना त्यांनी केवळ भौतिक गरजा या आर्थिक आहेत ही कल्पना अमान्य केली आहे. मानवी गरजा या भौतिक व आध्यात्मिक आहेत व त्या दोन्हीही भागवल्या गेल्या पाहिजेत हा त्यांचा आग्रह आहे. भौतिक गरजांमध्ये अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या गरजांचा समावेश होतो व यावाबतीत त्यांचा भर साधेपणावर आहे. अन्न हे साधे रुचकर व आरोग्यवर्धक असावे, कपडे हे उपयुक्त तसेच सुरुचि दर्शविणारे असावेत परंतु त्यात अपव्यय व प्रदर्शन कटाक्षाने टाळले जावे. घरे साधी व आरोग्यप्रद असावी व ती दिखाऊ व भपकेबाज असू नयेत. एकंदरीत भौतिक गरजा भागवताना उपभोगावर स्वेच्छेने मर्यादा घालण्यावर त्यांचा भर आहे. केवळ वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे म्हणजे विकास ही कल्पना जयप्रकाश नारायण यांनी अमान्य केलेली आहे. अशा व्यवस्थेतून समाजातील तळाशी असणाऱ्या वर्गापर्यंत भौतिक समृद्धी पोचू शकते (Percolation Theory) ही कल्पना त्यांना मान्य नाही. विकास कशाकरता व कोणाकरता या प्रश्नाचे उत्तर आपण शोधले पाहिजे हा त्यांचा आग्रह आहे. यात युद्ध व शांतता, निसर्ग व वातावरण यांची शुद्धता, मानवी स्वभावातील सृजनशीलता व सौंदर्यदृष्टी या प्रश्नांचा भौतिक गरजा भागवताना विचार करणे हे त्यांना आवश्यक वाटते. भौतिक विकास हे स्वतःमध्ये उद्दिष्ट नसून नैतिक व आध्यात्मिक मूल्यांनी तो मर्यादित केला पाहिजे असे जयप्रकाश नारायण यांना वाटते.

निसर्ग व वातावरण यांच्या प्रदूषणाचा प्रश्न या ठिकाणी त्यांना महत्त्वाचा वाटतो. शहरांची बेसुमार वाढ व खेड्यांचे ओस पडणे किंवा वाढते दारिद्र्य हे दोन्ही प्रश्न परस्पर निगडित आहेत. याकरता ग्रामीण पुनर्रचनेविषयी संपूर्णपणे नव्याने विचार करण्याची त्यांना गरज वाटते. खेडी व शहरे ही एकमेकांना पूरक असावी व प्रत्येक शहर हे भोवतालच्या खेड्यांशी विकासाच्या गरजा भागवण्याकरता जोडलेले असावे व खेडी व शहरे यांच्यातील सध्या असणारे शोषणाचे संबंध नाहीसे व्हावेत या गोष्टींवर भर देण्यात आला आहे. याकरता आवश्यक असलेला लोकांच्या स्थलांतराचा प्रश्न हा लोकांनी व सरकारने लोकशाही पद्धतीने व शक्तीचा वापर न करता सोडवावा हा त्यांचा आग्रह आहे.

आर्थिक विकासाचा अर्थ केवळ वाढते उत्पादन नसून मानव हा त्यातील केंद्रबिंदू मानण्यात यावा हा जयप्रकाश नारायण यांचा आग्रह आहे. त्यांच्या संपूर्ण क्रांतीत बेकारी नष्ट करण्याला अग्रस्थान आहे. कुटुंब हा घटक धरून

कामाचे वाटप केल्यास कुटुंबातील सर्व काम न करू शकणाऱ्या–मुले, अपंग, म्हातारे–व्यक्तींच्या किमान गरजा भागवण्याइतके वेतन असावे अथवा प्रत्येक काम करू शकणाऱ्या वयस्क माणसाला काम व पुरेसे वेतन असावे हा त्यांचा या ठिकाणी दृष्टिकोण आहे.

उत्पादनाच्या क्षेत्रात मोठ्या उद्योगधंद्यांच्या विस्तारावर नियंत्रण घालण्याची वेळ आलेली आहे असे ते प्रतिपादन करतात. याला एकच अपवाद ते मान्य करतात व तो शास्त्रीय संशोधन व संरक्षणाच्या गरजांशी संबंधित आहे. भारताच्या गरजा व भारतीय लोकांचे आर्थिक हित लक्षात घेऊन, तंत्रज्ञानाचा उत्पादनाच्या क्षेत्रात काळजीपूर्वक वापर केला जावा हा त्यांचा आग्रह आहे.

जयप्रकाश नारायण हे गांधीप्रमाणे यांत्रिकीकरणाच्या विरुद्ध नाहीत. परंतु असे उद्योगीकरण व यांत्रिकीकरण त्यांना अमान्य आहे, ज्यामुळे बेकारीचा प्रश्न अधिक विकट होईल. शिवाय त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील अनावश्यक असलेल्या मोठ्या गोष्टींबद्दलच्या आग्रहावर टीका केली आहे. मोठी धरणे, मोठे कारखाने, अवाढव्य इमारती, मोठी शहरे, मोठी इस्पितळे, मोठ्या शाळा या सर्वांबद्दल असणाऱ्या भारतीय लोकांच्या आकर्षणावर त्यांनी टीका केली असून लहान उद्योग, लहान शहरे, छोट्या इमारती, छोटी राज्ये, लहान संस्था यांच्याविषयी आपली आपुलकी व्यक्त केली आहे. पण याहीपेक्षा अधिक म्हणजे त्यांना मोठ्या गोष्टींबद्दल असणारे हे प्रेम भारताच्या गरजांच्या संबंधात नेहमी अप्रस्तुत वाटत आले होते.

औद्योगिक विकासाची आपली भूमिका स्पष्ट करताना जयप्रकाश नारायण यांची बाजू उपयुक्ततावादी व प्रायोगिक आहे व केवळ तात्त्विक नाही हे लक्षात घेतले पाहिजे. या दृष्टीने मोठे उद्योग, मध्यम उद्योग, छोटे उद्योग व ग्रामीण उद्योग यांचा समन्वित विकास घडवून आणण्यावर त्यांनी भर दिला आहे. त्या बरोबरच ग्रामीण उद्योगांमधून आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावरही त्यांनी भर दिला आहे. उपयुक्त तंत्रज्ञान (Appropriate technology) शिकवण्याकरता खेड्यांतील शाळांमधून खास विभाग उघडावे व त्यांनी स्थानिक गरजांशी सुसंगत असे तांत्रिक ज्ञान देण्याची तरतूद करावी यावर भर देण्यात आला आहे.

उत्पादनाच्या साधनांच्या मालकीविषयी देखील त्यांचे विचार उपयुक्ततावादी व प्रयोगवादी असल्याचे दिसून येते. उत्पादनाची सर्वच साधने सामुदायिक मालकीची असावी हा आग्रह नाही. स्वयंरोजगार, ग्रामीण समुदायाची मालकी, सहकारी स्वरूपाची मालकी, लहान उद्योगांवर खाजगी मालकी, मोठ्या उद्योगांवर सामाजिक नियंत्रणाखाली खाजगी मालकी व

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग हे सर्वच प्रकार अस्तित्वात असू शकतात व यामुळे आर्थिक सत्तेचे राजकीय केंद्रीकरण होणार नाही असे त्यांना वाटते. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांबाबत अधिक काळजीपूर्वक विचार करून त्यातील अपव्यय, भ्रष्टाचार, कामगारांना कारखान्याच्या प्रशासनात सहभागित्व, व्यवस्थापक व संचालकांचे पगार व कार्यक्षमता इत्यादी प्रश्नांवर उपाय-योजना करण्यावर त्यांनी भर दिला आहे. मोठ्या उद्योगधंद्यांतून कामगारांनी केवळ स्वतःच्या नफ्याचा विचार न करता उपभोक्त्याच्या हिताचा विचार करण्याची तयारी दाखवल्यास त्यांना व्यवस्थापनात सहभागी करून घेता येईल, अन्यथा त्यांवर राज्याचे नियंत्रण असणे हे अधिक व्यवहार्य ठरेल. उत्पादनाच्या क्षेत्रात सध्याची मिश्रव्यवस्था उपयुक्त आहे व खाजगी क्षेत्रात उत्पादनाला प्रेरणा देण्यासाठी योग्य सवलती दिल्या गेल्या पाहिजेत असेही मत त्यांनी व्यक्त केले आहे. अनावश्यक सरकारी हस्तक्षेप व नियंत्रणापासून उद्योगधंद्यांना मुक्त करावे असे त्यांना वाटते. परंतु एकंदर उद्योगांकरता कायद्याने आचार संहिता तयार होणे आवश्यक आहे. कामगारांना व्यवस्था-पनात सहभागी करून घेण्यासाठी कामगार संघटनांनी आपल्या प्रतिनिधींना योग्य प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

शेतीसकट सर्व उत्पादनांच्या क्षेत्रात वातावरण दूषित होऊ नये याकरता, तसेच स्वच्छता व सौंदर्य टिकवण्याकरता काळजी घेण्यावर भर दिलेला आहे.

ब) राजकीय क्रांती

राजकीय क्रांतीच्या क्षेत्रात मूलभूत हक्क, विकेंद्रीकरण व सामुदायिक समाजाच्या कल्पनांचा समावेश जयप्रकाश नारायण करतात. मूलभूत हक्कां-मधून मालमत्तेचा हक्क वगळल्यास इतर हक्कांच्या बाबतीत, कायदेमंडळ किंवा कार्यकारिणीला त्यांत बदल करून ते रद्द करता येऊ नयेत हे पाहणे त्यांना लोकशाही टिकवून ठेवण्याकरता आवश्यक वाटते. भारतासारख्या देशात लोकशाही संकेतांच्या अभावी, बलवान विरोधी पक्ष नसल्यामुळे, मूलभूत हक्कां-वर सहजासहजी आक्रमण होऊ शकते हे बेचाळीसाव्या घटनादुरुस्तीने सिद्ध केले. याठिकाणी संसदेचे सार्वभौमत्व हे वस्तुतः ज्या लोकांकडून प्रदत्त सत्तेच्या स्वरूपात वापरावयाची कल्पना होती तिच्या मुळाशी घाव घालण्यात आला व लोकांचे सार्वभौमत्व नष्ट करण्याकरता कार्यकारिणीचे कायदेमंडळावर व प्रधानमंत्र्याची कार्यकारिणीवर सत्ता प्रस्थापित करण्यात आली. या अनुभवा-तून मूलभूत अधिकाराचे अतिक्रमण कोणत्याही सरकारला कितीही बहुमत असले तरी करता येऊ नये या गोष्टीचे महत्त्व जयप्रकाश नारायण यांना पटले

व मूलभूत हक्कांना निःसंदिग्ध असे महत्त्व देऊन त्यांनी लोकांच्या सार्वभौमत्वावरील आपला विश्वास व्यक्त केला असे म्हणता येईल.

विकेंद्रीकरणावर जयप्रकाश नारायण यांनी विशेष भर दिला आहे. त्यांच्या दृष्टीने राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली पंचायती राज व त्यातील त्रिस्तरीय योजना खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण नाही. असे विकेंद्रीकरण होण्यासाठी लोकांना निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सरळ सहभागी होता आले पाहिजे. याकरता लोकसमित्या स्थापन करून पक्षविरहित लोकसत्ता निर्माण करण्याचा ते पुरस्कार करतात. पण याहीपेक्षा अधिक महत्त्वाचा भाग म्हणजे प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याकरता लोकसमित्या व वेळप्रसंगी लोक व युवक संघर्ष समित्यांची स्थापना करणे हे आहे. राजकारणातील भ्रष्टाचाराला आळा घालण्याकरता या संस्था प्रभावी ठरतील असे त्यांना वाटते.

विकेंद्रीकरणाच्या कल्पनेत आणखी एक महत्त्वाची कल्पना निहित आहे. सत्तेचे, मग ती आर्थिक असो वा राजकीय, केंद्रीकरण करता कामा नये. या दृष्टीने साम्यवादी पक्षाच्या सर्वकष सत्तेच्या धोरणाचे समर्थन जयप्रकाश कदापिही करणार नाहीत. या उलट ते अराज्यवाद्यांची मर्यादित सरकारची कल्पना स्वीकारतात. निरनिराळ्या स्तरांवर—केंद्र, राज्य, जिल्हा, ग्राम या स्तरांवर—सत्तेचे वाटप अशाप्रकारे व्हावे ज्यामुळे त्या त्या क्षेत्रात निर्णय घेण्याचे अधिकार त्या त्या पातळीवरील संस्थांकडे खऱ्या अर्थाने राहतील. या अर्थाने आज सत्तेचे केंद्रीकरण आर्थिक व राजकीय क्षेत्रात होत आहे व ही अनिष्ट प्रक्रिया आहे असे ते मानतात. राज्य हे कल्याणकारी असल्यामुळे केंद्रीकरणाच्या स्वरूपात बदल होत नाही. उलट कल्याणकारी राज्याची प्रवृत्ती सर्वंकष होण्याकडेच असते. या दृष्टीने कल्याणकारी राज्याचे स्वरूपदेखील विकेंद्रीकरणाच्या संदर्भात बदलावे लागेल.

विकेंद्रित व सहभागी लोकशाहीप्रमाणे सामुदायिक समाज हे राजकीय क्रांतीचे उद्दिष्ट आहे. गांधीवाद हा मार्क्सवादाप्रमाणेच, खाजगी मालमत्तेच्या, सामुदायिक हितकरता नियंत्रणावर व मर्यादित करण्यावर भर देतो. साम्यवादाचे उद्दिष्ट—प्रत्येकाने आपल्या शक्तीप्रमाणे काम करणे व प्रत्येकाच्या गरजा भागवणे—गांधीवादाचेही उद्दिष्ट आहे. व्यक्ती व समाज यांचे परस्परावलंबन, शोषणरहित व्यवस्था, शासनविहीन समाज या कल्पना भूदान, संपत्तीदान, ग्रामदान या कल्पनांमधून राबवता येतील व ग्रामीण पुनर्रचना करण्याकरता खेड्यांमधून खाजगी शेतीऐवजी सहकारी व सामुदायिक शेतीच्या प्रयोगाकडे वळले पाहिजे.

क) सामाजिक क्रांती

जयप्रकाश नारायण यांनी बिहार आंदोलनाकरता जो जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यातून त्यांच्या समाजक्रांतीच्या कल्पना स्पष्ट होतात. सामान्य माणसाबद्दल, विशेषकरून समाजव्यवस्थेतील अन्यायाला बळी पडलेल्या शोषित माणसाबद्दल त्यांना जी आस्था आहे त्याचे निदर्शन या जाहीरनाम्यातून झाले आहे. या लोकांना त्यांच्या मूलभूत गरजा भागवण्याकरता त्यांच्या जीवनपद्धतीत बदल हवा आहे. पाणी नसेल तेथे पाण्याची तरतूद, काम नसेल तेथे काम, कमण्याम जमीन किंवा उपजीविकेकरता नोकरी आणि काहीच नसेल तर जिवंत राहण्याकरता बेकार भत्ता, अंग झाकण्याकरता व थंडीपासून संरक्षणाकरता कापड, राहता येण्यासारखी घरे, जातिव्यवस्थेत संपूर्ण बदल, हुंडापद्धती नष्ट करणे, मध्याच्या शिक्षण पद्धतीतील वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी दूर करून सर्वांना उपयुक्त होईल अशा शिक्षणाची तरतूद, स्वयं रोजगाराकरता उपयुक्त असे शिक्षण, शहरी व ग्रामीण भागातील सत्ताधाऱ्यांची मक्तेदारी संपुष्टात आणणे व अल्पसंख्यकांचा बहुसंख्यकांवरील जुलूम थांबवणे, शासनात लोकांना प्रत्यक्ष सहभागी होण्याचे स्वातंत्र्य, प्रशासकीय व्यवस्थेत संपूर्ण बदल व ती लोकांना जबाबदार करणे, राजकारण, सरकार व प्रशासन यातील भ्रष्टाचार दूर करणे या सर्व गोष्टींचा उल्लेख या जाहीरनाम्यात केलेला आहे. परंतु हे सामाजिक परिवर्तन कोणताही पक्ष राजकीय मतप्रणालीचा स्वीकार करून घडवून आणू शकतो यावर जयप्रकाश नारायण यांचा विश्वास नाही. या समस्या कोणत्याही मतप्रणालीच्या चौकटीत बसत नाहीत. त्यांचे स्वरूप निश्चित करणे व त्या सोडवण्याकरता मार्ग किंवा साधने निश्चित करणे हे कार्य शास्त्रज्ञांचे आहे व शास्त्रज्ञ कोणत्याही मतप्रणालीला बांधून घेऊ शकत नाहीत. फारतर उद्दिष्टे व मूल्ये आपल्याला राजकीय दृष्ट्या निश्चित करता येतील परंतु ही उद्दिष्टे साध्य करण्याचे काम राजकारणी लोकांचे नाही.

समाजपरिवर्तनाकरता कायदे कितपत समर्थ आहेत याबद्दल जयप्रकाश नारायण शंका व्यक्त करतात. लोकांमध्ये कायद्यांनी दिलेले हक्क राबवून घेण्याची वृत्ती निर्माण करण्याकरता संघटित प्रयत्न करणे आवश्यक आहे. कायद्याने किंवा सरकारी यंत्रणेच्या माध्यमाने जमिनीशी संबंधित समस्या सोडवता येण्यासारख्या नाहीत. याकरता स्थानिक पातळीवर संघर्ष समित्या व लोकांची सत्ता यांचा वापर करणे आवश्यक आहे. याहीपेक्षा अधिक अवघड भाग सामाजिक संस्था व प्रवृत्ती बदलण्याचा आहे व कायदा या ठिकाणी बव्हंशी असमर्थ ठरतो. उच्च-नीचतेच्या कल्पना, त्यांवर आधारलेली जाति-

व्यवस्था, अस्पृश्यता, हुंडापद्धती, स्त्रीदास्य व स्त्रियांना समाजात मिळणारी हीन वागणूक, अंतरजातीय व अंतरधार्मिक विवाह, अशा प्रकारची उदाहरणे आहेत. या संस्थांमध्ये संपूर्ण बदल घडवून आणणे हे समग्र क्रांतीचे उद्दिष्ट आहे.

सामाजिक क्रांतीच्या संदर्भात जयप्रकाश नारायण यांनी दोन मुद्यांवर भर दिला आहे. यातील पहिला मार्क्सवादाशी व दुसरा लोकशाहीशी संबंधित आहे. मार्क्सवाद्यांप्रमाणेच जयप्रकाश नारायण यांना आर्थिक क्रांती महत्त्वाची वाटते. परंतु आर्थिक क्रांती घडून आल्याबरोबर समाजव्यवस्थेची इमारत आपोआप बदलू लागेल किंवा त्यात अपेक्षित बदल होतील याबद्दल त्यांना शंका आहे. एरव्ही त्यांनी आर्थिक क्रांती इतकेच सामाजिक व राजकीय, तसेच शैक्षणिक व सांस्कृतिक क्रांतीवर भर देण्याचे कारण नव्हते.

दुसरा मुद्दा लोकशाही प्रक्रियेशी संबंधित आहे. केवळ निवडणुकांमधून सरकार तयार झाले एवढ्यावरच सरकारच्या कर्तुमकर्तुम् शक्तीबद्दल भरवसा बाळगण्याचे कारण नाही. शिवाय निवडणुकांमधून भ्रष्टाचाराचा शिरकाव झाल्यामुळे सरकार व शासनयंत्रणा आपल्या उगमस्थानीच भ्रष्ट व दूषित झाली आहे. हे सरकार लोकानुवर्ती व जबाबदार असणे, त्यावर लोकांचा अंकुश असणे, व लोकसत्ता यथार्थपणे राबवली जाण्याकरता लोकांना निर्णयाच्या प्रक्रियेत सहभागी होता येणे, या गोष्टी लोकशाही प्रक्रियेत निवडणुकाइतक्याच महत्त्वाच्या आहेत. आणि याकरता लोकांना जागरूक व संघटित करण्याची गरज आहे. संघटनेचे उद्दिष्ट अर्थातच प्रत्येक विशिष्ट अन्यायाचे परिमार्जन करणे असेल.

बिहार आंदोलनाच्या तात्कालिक संदर्भात जयप्रकाश नारायण यांनी देशव्यापी काही समस्यांवर बोट ठेवून आंदोलनाची दिशा निश्चित केली होती. यात त्यांनी निवडणुका, राजकारण व प्रशासन यातील भ्रष्टाचार दूर करणे, महागाईची समस्या, बेकारी निवारण व शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल यांचा समावेश केला होता.

ड) संपूर्ण क्रांतीचे इतर पैलू

जयप्रकाश नारायण यांनी शैक्षणिक सांस्कृतिक, वैचारिक व आध्यात्मिक अशा पैलूंची संपूर्ण क्रांतीच्या संदर्भात कल्पना केलेली असली तरी आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील परिवर्तनापासून त्यांची कल्पना फारशी वेगळी नाही. शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल व्हावयास हवा असे जयप्रकाश यांना वाटते. हा बदल शिक्षण अधिक जीवनाभिमुख करण्याच्या दिशेने आहे. सध्याची शिक्षणपद्धती भ्रष्टाचाराने पोखरली गेल्यामुळे, गुणवत्ता, कस, पदव्या, नीति-

सत्ता या सर्व दृष्टींनी ती हिणकस आहे व त्यातून बेकारीचा प्रश्न हा अधिकाधिक उग्र होत आहे. याकरता शिक्षणाचे अधिक चांगल्याप्रकारे नियोजन झाले पाहिजे. जीवनातील निरनिराळ्या क्षेत्रांतील गरजा भागवण्याच्या दृष्टीने नियोजित शिक्षण व काम यांची सांगड घातली गेली पाहिजे.

जयप्रकाश नारायण यांना असेही वाटते की सध्याची शिक्षणपद्धती वरिष्ठ वर्गाकरता मक्तेदारी निर्माण करणारी आहे. या करता प्राथमिक शिक्षणाला प्राथमिकता देणे, शिक्षण व काम यांची सांगड घालणे, ग्रामीण भागात तेथील गरजांना अनुसरून शिक्षणक्रम ठरविणे, पदव्या व शिक्षण, पदव्या व नोकरी यांचा परस्पर संबंध तोडून टाकणे व शिक्षणातून ज्ञानसंवर्धन व गुणवत्ता यांवर भर देणे या गोष्टींचा ते पुरस्कार करतात.

सांस्कृतिक क्रांतीत वैचारिक व नैतिक परिवर्तन अपेक्षित आहे. बुद्धिजीवी वर्ग हा समाजाचे नेतृत्व करण्यास असमर्थ आहे व तो ऐहिक सुखसोयींच्या मागे लागून आपले वैचारिक स्वातंत्र्यही गमावून बसला आहे याचा त्यांना खेद होतो. हे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी वेळप्रसंगी दारिद्र्याचे व्रतही बुद्धिजीवी वर्गाने स्वीकारावे असे ते आवाहन करतात.

नैतिक अधःपातावर जयप्रकाश नारायण यांनी व्यापक विचार केला आहे. प्रामाणिकपणा, स्वातंत्र्यनिष्ठा, सत्यप्रियता, व न्यायबुद्धी त्यांच्या दृष्टीने चिरंतन अशी मूल्ये आहेत व सध्याच्या भारतीय जीवनपद्धतीत भ्रष्टाचाराच्या व्यापक शिरकावामुळेही मूल्ये नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. केवळ आर्थिक प्रश्न हाताळून त्यांचे पुनरुज्जीवन करता येणार नाही. ही मूल्ये जोपासण्याकरिता धार्मिक चळवळीसारखी कडवी वृत्ती असणारी चळवळ उभी राहिली पाहिजे व भ्रष्टाचार नष्ट करण्याकरिता संघटित प्रयत्न झाले पाहिजेत असे त्यांना वाटते. सत्तालोलुपता व लोभ भ्रष्टाचाराच्या मुळाशी आहेत व त्यांना पायबंद घालण्याची जरूर आहे असेही एकंदरीत त्यांचे प्रतिपादन आहे.

केवळ भौतिक गरजा भागवल्यामुळे माणूस किंवा समाज खऱ्या अर्थाने सुखी किंवा समृद्ध होऊ शकेल याविषयी जयप्रकाश नारायण शंका व्यक्त करतात. भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिकता हे एक चिरंतन मूल्य आहे असे त्यांना वाटते. परंतु ही आध्यात्मिकता केवळ ईश्वर व मानव यांच्या संदर्भात किंवा धार्मिक स्वरूपाची नसून ती माणसामधील स्वार्थी वृत्ती कमी करून त्याला समाजनिष्ठ बनवण्यात आहे असे त्यांना वाटते. त्यांची आध्यात्मिक क्रांतीची कल्पना मानवतावादाकडे नेणारी आहे.

२. तात्त्विक बैठक

समग्र क्रांतीची जयप्रकाश नारायण यांची कल्पना एकाएकी घडून येणारी प्रचंड सामाजिक राजकीय उलथापालथीची नाही. ती क्रमशः घडून येणाऱ्या परिवर्तनाची आहे. परंतु हे परिवर्तन दिशाहीन नाही. त्याच्या मुळाशी एका अशा सामाजिक व्यवस्थेची कल्पना आहे ज्यात माणूस हा वृत्तीने बदललेला असेल. तो युयुत्सु, स्पर्धक, स्वार्थी, आक्रमक असण्याऐवजी शान्त, सहनशील, न्यायबुद्धी बाळगणारा, निःस्वार्थी व इतरांशी सहकार्य करणारा असेल. परंतु अशा प्रकारचा मानव ज्या समाजव्यवस्थेचा आधार असेल ती व्यवस्था एका-एकी रक्तरंजित क्रांतीतून निर्माण होणारी नाही. तसा प्रयत्न नेहमी अयशस्वी ठरलेला आहे व म्हणून समग्र क्रांतीची प्रक्रिया ही परिस्थितिजन्य बदल घडवून आणण्याइतकेच, मानवी स्वभावात परिवर्तन घडवून आणण्यावर भर देते. यात प्राथमिक काय आहे हा प्रश्न अप्रस्तुत आहे. कारण परिस्थितीतील बदल व माणसातील बदल या एकमेकांवर परिणाम करणाऱ्या गोष्टी आहेत. जयप्रकाश नारायण यांनी अर्थव्यवस्था ही प्राथमिक मानून त्यात संपूर्ण बदल घडवून आणण्याची कल्पना सोडून दिली आहे असे म्हणणे बरोबर होणार नाही. त्यांच्या विचारातील सूत्र हे कायम टिकलेले आहे. परंतु मार्क्सवादाची या बाबतीतील आग्रही भूमिका त्यांनी सोडून दिली आहे व मानवी वृत्तीवर भर दिल्यामुळे ते गांधीवादी झाले आहेत असे म्हणता येईल.

सामाजिक परिवर्तन हे सातत्याने व क्रमशः घडून आले पाहिजे व हे परिवर्तन शांततामय पद्धतीने घडवून आणता येईल, ही तत्त्वे समग्र क्रांतीच्या तात्त्विक भूमिकेचा आधार मानता येतील. मानवी स्वभाव हा बदलता येईल व तो बदलण्याकरता मानवी संस्थांमध्ये बदल केला पाहिजे ही आणखी एक महत्त्वाची कल्पना आहे. माणूस हा बदलत नसेल व मानवी वृत्ती मुळातच स्वार्थ, स्पर्धा, महत्त्वाकांक्षा, भीती या प्रवृत्तींनी मर्यादित असतील तर सामाजिक परिवर्तनाचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरतील. बदल घडून येईल पण तो अपेक्षित दिशेने असणार नाही. जयप्रकाश नारायण यांची समग्र क्रांती माणसाला बदलण्याचे स्वप्न पाहते. तो स्वातंत्र्यप्रिय, निर्भय, निःस्वार्थी, सहिष्णु, स्वावलंबी सहकार्य करणारा व शांततावादी असावा हे त्यांचे स्वप्न आहे. असा मानव घडवण्यासाठी आवश्यक संस्था समाजात निर्माण होतील किंवा नाही हे एक प्रश्नचिन्ह आहे. याचे उत्तर समाधानकारक रीतीने देता येण्याइतके ज्ञान माणसाजवळ नाही.

पण जयप्रकाश नारायण हे आशावादी आहेत. त्यांना आलेले अनुभव व त्यांचे अयशस्वी झालेले प्रयत्न हे आशावादाला फारसे पोषक नाहीत, परंतु हा

दुर्दम्य आशावादी माणूस ज्या तऱ्हेने झगडत राहिला त्यातून सामाजिक परिवर्तनाच्या पुरस्कर्त्यांना चिरंतन प्रेरणा मिळण्यास हरकत नाही.

जयप्रकाश नारायण यांचे विचार व्यवहार्य आहेत अथवा अव्यवहार्य याबद्दल खल करता येईल. परंतु अस्तित्वात असलेल्या संस्था कायम ठेवून त्यांच्या विचारांना व्यवहार्य किंवा अव्यवहार्य ठरवता येणार नाही. उदाहरणार्थ, केवळ उत्पादनवाढ व भौतिक समृद्धीच्या मागे लागून माणसातील चांगुलपणा वाढवता येणार नाही ही त्यांची मूलभूत कल्पना आहे. माणसाला शांततापूर्ण बनवण्यासाठी लहान समुदाय व स्वावलंबी जीवनाच्या कल्पना आवश्यक आहेत असे त्यांना वाटते. प्रचंड आकाराविषयी आधुनिकतेचा आग्रह हा माणसामध्ये नैराश्य, भीती, एकटेपणा, वैफल्य, परावलंबित्व निर्माण करतो. या समस्या सोडवण्याकरता अधिक साधे जीवन हा पर्याय म्हणूनच निवडावयाचा आहे. या त्यांच्या कल्पना व्यवहार्य आहेत किंवा अव्यवहार्य, हे ठरवण्यापूर्वी आपण परिवर्तनाचे उद्दिष्ट, दिशा व मार्ग यांची निवड करणे आवश्यक आहे. जयप्रकाश नारायण यांचा आग्रह नैतिक जीवनावद्दल आहे, सुबत्ता व समृद्धीबद्दल नाही, हे समग्र क्रांतीचा आशय समजून घेताना लक्षात ठेवले पाहिजे.

समग्र क्रांतीच्या मार्गाच्या बाबतीत हिंसा–अहिंसा या प्रश्नाचा विचार करताना जयप्रकाश नारायण यांनी व्यावहारिक मार्ग म्हणून हिंसक व रक्तरंजित क्रांतीचा त्याग केला आहे. परंतु अहिंसेबद्दल नैष्ठिक भूमिका न स्वीकारतादेखील सत्याग्रह, असहकार, निःशस्त्र प्रतिकार व जनसंघर्ष यांवर त्यांनी भर दिला आहे. याबाबतीत त्यांचे विचार साधनशुचितेविषयी आग्रही स्वरूपाचे असल्यामुळे ते मार्क्सवादापेक्षा गांधीवादाला अधिक जवळ आहेत. माणूस बदलण्याच्या प्रक्रियेत हिंसेपेक्षा अहिंसा, सशस्त्र प्रतिकारापेक्षा निःशस्त्र प्रतिकार, व्यक्तीबद्दल द्वेष बाळगणाऱ्याऐवजी व्यवस्थेविरुद्ध संघर्ष, या तत्त्वांना अधिक महत्त्व त्यांनी दिलेले आहे. याही बाबतीत प्रायोगिक भूमिका घेणे महत्त्वाचे आहे. कारण अमुक मार्ग हा माणूस बदलण्याकरता उपयुक्त ठरू शकतो हे अद्याप सिद्ध व्हावयाचे आहे. गांधींच्या अनुयायांनी प्रत्यक्ष व्यवहारात गांधींच्या तत्त्वांचा त्याग करणे व चंबळ खोऱ्यातील दरोडेखोरांनी आपली मूळ वृत्ती न बदलणे, यातून असे म्हणता येईल की हिंसक मार्गापेक्षा अहिंसक मार्ग हा श्रेष्ठ आहे हे निर्विवादपणे सिद्ध व्हावयाचे आहे. परंतु जयप्रकाश नारायण हे प्रयोगशील आहेत व पोथीनिष्ठ नाहीत. त्यामुळे समग्र क्रांतीच्या मार्गाविषयी त्यांचे विचार प्रायोगिक मानावयास हवेत.

३. वैचारिक विकास [१]

आपण राष्ट्रीय चळवळीकडून मार्क्सवादाकडे व मार्क्सवादाकडून सर्वोदयाकडे कशा प्रकारे वाटचाल केली याचे जयप्रकाश नारायण यांनी स्वतःच वर्णन केलेले आहे. या सर्व विचारांमध्ये सामान्य सूत्र शोधता येणे शक्य आहे व समग्र क्रांतीचे तत्त्वज्ञान ही त्याची परिणत अवस्था आहे.

या सामान्य सूत्रामध्ये स्वातंत्र्य या तत्त्वाचा ते समावेश करतात. सुरुवातीला देशाच्या स्वातंत्र्याच्या भावनेने प्रेरित होऊन त्यांनी असहकार आंदोलनात भाग घेतला परंतु नंतर मानवी स्वातंत्र्याच्या कल्पनेकडे ते झुकले. यात मानवी व्यक्तिमत्त्व, मानसिक व आध्यात्मिक स्वातंत्र्याचा त्यांनी समावेश केला. भाकरी, सत्ता, सुरक्षितता, समृद्धी, राज्याचे श्रेष्ठत्व किंवा इतर कोणत्याही कारणासाठी आपण स्वातंत्र्याचा बळी देण्यास तयार नाही असे ते लिहितात.

अमेरिकेत असताना आपण मार्क्सवादाचा स्वीकार का केला याचे वर्णन करताना, स्वातंत्र्याचे उद्दिष्ट मार्क्सवादी क्रांतीतून अधिक लवकर साध्य करता येईल असे वाटल्याचे त्यांनी नमूद केले. मार्क्सवादाकडून त्यांना समता व बंधुत्व या कल्पना मिळाल्या व स्वातंत्र्याची त्यांची कल्पना यामुळे अधिक समृद्ध व व्यापक झाली. स्वातंत्र्य म्हणजे शोषणापासून, उपासमारीपासून व दारिद्र्यापासून मुक्तता, या स्वरूपात स्वातंत्र्याची कल्पना विकसित झाल्याचे ते नमूद करतात.

भारतात ते १९२९ मध्ये परत आले त्यावेळी भारतातील कम्युनिस्ट हे स्वातंत्र्य आंदोलनापासून दूर असल्याचे त्यांना दिसून आले. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय आंदोलनाची चळवळ 'बूर्ज्वा' व गांधीसारखे नेते हे भांडवलशाहीचे हस्तक असल्याचा आरोपही कम्युनिस्ट करीत होते. भारतातील कम्युनिस्ट कोमिटर्नच्या वर्चस्वाखाली असलेले व स्वयंप्रज्ञेने काम करणारे नसल्यामुळे त्यांच्याविषयी व सोव्हियट रशियाविषयी आपली निराशा झाल्याचे ते नमूद करतात. राष्ट्रीय आंदोलनाच्या चळवळीला सामाजिक-आर्थिक कार्यक्रमाचा पुरेसा आधार नसल्यामुळे, काँग्रेस समाजवादी पक्ष उभा करण्यात इतरांबरोबर त्यांनी पुढाकार घेतला व राष्ट्रीय आंदोलनाने सत्तेच्या भागीदारीत सहभागी होण्यास व ब्रिटिश सरकारशी सहकार्य करण्यास विरोध करण्यात काँग्रेस समाजवादी पक्ष हा सतत अग्रेसर राहिला असे ते नमूद करतात.

---

१. हे पत्र त्यांनी प्रजा समाजवादी पक्षाचा राजीनामा देताना १९५७ मध्ये लिहिले होते.

१९३० नंतर हिटलरचा उदय, हिटलरविषयी स्टालिनचे चुकलेले अंदाज, हिटलरशी मॉस्को कराराद्वारे केलेली मैत्री या सर्वांचे आपल्या मनावर विपरीत परिणाम झाल्याचे जयप्रकाश नारायण नमूद करतात. हिटलरच्या उदयाला जर्मनीतील कम्युनिस्ट जबाबदार होते, कारण तेथील समाजवादी पक्षाला त्यांनी आपला सर्वांत मोठा शत्रू मानले व मते फोडली. परंतु हिटलरच्या उदयानंतर मास्कोच्या आदेशावरून कम्युनिस्टांनी 'लोकशाही आघाडी'चा पुरस्कार केला. या काळात कम्युनिस्टांना राष्ट्रीय चळवळीत व काँग्रेस समाजवादी पक्षात आणण्यात आपण अच्युत पटवर्धन, लोहिया, अशोक मेहता यांच्या सल्ल्याविरुद्ध जाऊन कसा पुढाकार घेतला व कम्युनिस्टांनी नंतरच्या काळात कामगार संघटना व काँग्रेस समाजवादी पक्षाच्या दक्षिण भारतातील संघटनांमधून आपले वर्चस्व कशाप्रकारे प्रस्थापित केले व त्यांना मॉस्कोचे हितसंबंध राखण्यासाठी कशा प्रकारे वापरले याचे थोडक्यात वर्णन करून त्यातून निष्कर्ष काढले आहेत. कम्युनिस्ट चळवळीचा यूरोप व खुद्द रशियातील इतिहास, व शुद्धीकरणाच्या नावाखाली झालेल्या कत्तली यांचा आपल्यावर मार्क्सवादाचे पुनर्मूल्यांकन करण्याच्या दृष्टीने परिणाम झाल्याचे जयप्रकाश नारायण नमूद करतात.

सामाजिक क्रांतीच्या दृष्टीने किंवा समाजवादाच्या प्रस्थापनेकरता मार्क्सवाद–लेनिनवाद हा कितपत समर्थ आहे याविषयी या पत्रात जयप्रकाश नारायण यांनी पुढील मुद्दे उपस्थित केले आहेत. (१) ज्या समाजात लोकशाही मार्गाने लोकांना सामाजिक परिवर्तन घडवून आणता येणे शक्य असेल अशा समाजात हिंसाचाराने क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न हा प्रतिक्रांतीला पोषक असेल. (२) समाजवाद लोकशाही स्वातंत्र्याची उपेक्षा करून व त्याच्या अभावी अस्तित्वात येणार नाही. हिंसाचाराने क्रांती घडवून आणता येईल किंवा नाही हा मुद्दा जयप्रकाश नारायण यांना उपेक्षणीय वाटतो. कारण त्यातून येणारी, कामगार वर्गाच्या हुकूमशाहीच्या नावाखाली एक अल्पसंख्य नोकरशहांची हुकूमशाही, त्यांना मुळीच मान्य होण्यासारखी नाही. कदाचित चीन व युगोस्लाव्हियातील साम्यवाद हा बहुसंख्यकांच्या हुकूमशाहीच्या स्वरूपाचा असेल. परंतु कम्युनिस्टांनी लोकांच्या नावाने सर्वत्र हुकूमशाही संस्था निर्माण केलेल्या आहेत व जयप्रकाश नारायण यांच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारची हुकूमशाही समाजवादाला पोषक नाही.

जयप्रकाश नारायण यांचा सोव्हियट व्यवस्थेवर असाही आरोप आहे की राष्ट्रीकरण व सामुदायिक शेतीच्या माध्यमातून भांडवलशाही संपली असली तरी समाजवादी व्यवस्थेपासून सोव्हियट व्यवस्था फार दूर आहे. केवळ स्वातंत्र्यच

नव्हे तर, सामाजिक न्याय, समता यांच्या प्रस्थापनेऐवजी नोकरशाहीचे वर्चस्व व नवीन शोषणपद्धती तेथे अस्तित्वात आहे. जयप्रकाश नारायण यांना हेही मान्य नाही की सोव्हियट व्यवस्थेतील हे दोष स्टालीनच्या विकृतीचा केवळ परिणाम आहेत. त्यांच्या दृष्टीने राजकीय व आर्थिक क्षेत्रातील अतिकेंद्रीकरण व राज्यवाद या गोष्टी या विकृतीच्या मुळाशी आहेत.

या अतिकेंद्रीकरणाच्या व राज्यवादाच्या मुळाशी मार्क्सच्या मूळ कल्पनां-मध्ये लेनिनने केलेला बदल कारणीभूत असावा असे जयप्रकाश नारायण यांना वाटते. मार्क्सची साम्यवादी क्रांती उद्योगीकरणाच्या व भांडवलशाहीच्या परिणत अवस्थेतून येणार होती. याऐवजी लेनिनने ही क्रांती मागासलेल्या अर्थ-व्यवस्थेत राजकीय सत्ता हस्तगत करून तिचा विशिष्ट वापर करून घडवून आणली. याला स्टालिनने सक्ती व दडपणाच्या जोरावर उद्योगीकरण घडवून आणण्याची साथ दिली. यातून लष्करीकरण, स्वातंत्र्याचे अपहरण व दडपशाही या गोष्टी आल्या. पॉल बारानच्या विधानाचा उल्लेख करून ते या गोष्टीवर भर देतात की समाजवाद, सोव्हियट व्यवस्था व स्टालिनची दुष्कृत्ये यात फरक करण्याची गरज आहे. सोव्हियट व्यवस्थेतील दोष हे एका मागासलेल्या देशात आत्यंतिक वेगाने विकास घडवून आणण्याच्या प्रक्रियेतून आलेले आहेत व त्यात अंतर्गत संघर्ष व परकीय आक्रमणाची भीती यांनी भर घातली.

जयप्रकाश नारायण यांना असे वाटते की भारताने व आशियातील इतर राष्ट्रांनी आपले उद्योगीकरण करताना या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. लोकशाहीचा स्वीकार केल्यामुळे उद्योगीकरणाचे हे दोष टाळता येतील असे नसून एका मर्यादेपलीकडे उद्योगीकरणाची प्रक्रिया नेल्यास हुकूमशाहीकडे वाटचाल होणे अपरिहार्य ठरेल. यामुळे विकेंद्रीकरण, राज्याचे क्षेत्र मर्यादित करणे, सामुदायिक व्यवस्थांची पर्यायी योजना व सामाजिक नियंत्रणाचे इतर मार्ग यांचा वापर करण्यावर त्यांचा भर आहे.

जयप्रकाश नारायण यांचा मार्क्सवादावर असाही आक्षेप आहे की मार्ग व साधनांच्या बाबतीत मार्क्सवादाने नीतिनिरपेक्ष भूमिका घेतल्यामुळे रशिया-तील शुद्धीकरणाच्या नावाखाली झालेल्या अनन्वित गुन्ह्यांना 'क्रांतिकारक नीति सत्ता' हे गोंडस नाव देता आले.

या सर्व काळात कम्युनिस्टांशी मतभेद बाळगूनही जयप्रकाश नारायण यांचा क्रांतिकारक समाजवादावर विश्वास होता व ते युरोपातील लोकशाही समाजवाद्यांचे तसेच गांधीवादाचे टीकाकार राहिले. युरोपातील साम्यवाद व युरोपातील समाजवाद या दोन्ही चळवळी समाजवादाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या

दृष्टीने अयशस्वी ठरलेल्या आहेत. कल्याणकारी राज्य हा समाजवादाला पर्याय नाही व राज्यवादापासून तो फारसा दूर नाही. युरोपातील समाजवादाला जास्तीत जास्त यश स्कँडिनेव्हियन देशांमधून आले आहे आणि याचे कारण ते देश लहान आहेत व त्यांत राज्यावर विसंबून राहण्याऐवजी समाजवादाचे इतर प्रकार स्वीकारलेले आहेत असे जयप्रकाश नारायण यांना वाटते.

एकंदरीत औद्योगिक समाजावर आधारलेली युरोपातील समाजवादी चळवळ किंवा मागासलेल्या व कृषिप्रधान समुदायाला उद्योगीकरणाकडे नेणारा साम्यवाद हे दोन्ही भारतीय समाजवादी चळवळीचे आदर्श असू शकत नाहीत. समाजवादी चळवळीने गांधीवादी समाजक्रांतीचे भूदान, ग्रामदान, ग्रामराज्य यांतून व्यक्त झालेले स्वरूप लक्षात घेतले पाहिजे व समाजवादाच्या नावाने राज्याच्या मालकीखाली व नोकरशाहीच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या आर्थिक उद्योगांचा आपल्याला आलेला अनुभव लक्षात घेतला पाहिजे असे जयप्रकाश नारायण यांना वाटते. त्यांच्या स्वतःच्या विचारांतून त्यांनी काढलेले निष्कर्ष हे लोकशाही, विकेंद्रीकरण व उद्दिष्टपूर्तीकरता अनुरूप साधने यांवर भर देणरे आहेत.

१९५२ पासून आपण मार्क्सवादापासून दूर गेलो असे जयप्रकाश या पत्रात लिहितात. या वर्षी त्यांनी केलेल्या उपोषणाच्या काळात त्यांना अशी जाणीव झाली की भौतिकवाद हा नीतिमत्तेकरता योग्य आधार असू शकत नाही. तसेच आत्म्याचे स्वातंत्र्य व ईहा या गोष्टींकरता जडवाद आधार असू शकत नाही. आधुनिक शास्त्र व शास्त्रीय पद्धती या देखील माणसाचे मन व मानसिक प्रक्रिया समजावून देण्यास अपुऱ्या आहेत. माणसाला स्वत्व जाणून घेण्याची अथवा आपल्या अस्तित्वाचा अर्थ शोधण्याची गरज भासते व यातच त्याच्या नीतिमत्तेचा आधार आहे. जयप्रकाश नारायण यांना हे मान्य नाही की आर्थिक व राजकीय संघर्ष हे नीतिमत्तेचा संदर्भ असणारे नाहीत. माणसाच्या सर्वच कृती, मग त्या वैयक्तिक असोत अथवा सामुदायिक, जीवनविषयक तत्त्वज्ञानावर आधारलेल्या असल्याशिवाय त्यांना सुसंगती व एकात्मता प्राप्त होऊ शकत नाही. त्यांचा समाजवादी व कम्युनिस्टांवर असा आरोप आहे की भौतिक समृद्धी, सतत वाढणारे उत्पादन व सतत वाढणारे जीवनमान या गोष्टींवर त्यांनी प्रमाणाबाहेर भर दिला असून त्यामुळे माणसांमधील मानसिक शांतता नष्ट झालेली आहे. भौतिक समृद्धीकरता व्यक्ती, गट व राष्ट्रे यांच्यातील स्पर्धा व संघर्ष व शेवटी युद्ध या गोष्टी त्यांना टाळता आलेल्या नाहीत. याकरता विज्ञान, उद्योगीकरण, सामाजिक संघटना, अंतरराष्ट्रीय संबंध या सर्वांकडे पाहण्याची दृष्टी बदलली पाहिजे व जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी शिक्षणातून दिली गेली पाहिजे.

मानवी मूल्यांची, विशेष करून समाजवादी मूल्यांची, जोपासना करण्यासाठी व मानवी व्यक्तिमत्व व नीतिमत्ता यांत वाढ करण्यासाठी माणसाच्या वाढत्या गरजांना नियंत्रण घालण्याची जरूर आहे. परंतु जर स्वेच्छेने माणसांनी अशा प्रकारचे नियंत्रण घालून घेतले नाही तर योग्य वाटणी किंवा विभागणी करण्यासाठी सक्ती, बलप्रयोग व संघर्षाचा मार्ग शिल्लक राहतो. परंतु यात पुन्हा काही माणसे इतरांना शिस्त लावतात परंतु स्वतः शिस्तीपलीकडे राहतात. कम्युनिस्ट व्यवस्थांमध्ये राज्यकर्त्यांना शिस्त लावण्याचा प्रश्न शिल्लक राहतोच.

या समस्येचे उत्तर जयप्रकाश नारायण सर्वोदयात शोधतात. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस पक्षाचे विसर्जन करून लोकसेवक संघ निर्माण करण्याची गांधींची मृत्यूपूर्वी व्यक्त झालेली अंतिम इच्छा त्यांच्या अनुयायांनीच पूर्ण केली नाही याचा त्यांना खेद वाटतो. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस व एकंदर पक्षपद्धतीची वाढ सत्ता प्राप्तीकरता भ्रष्ट मार्गाचा अवलंब करण्याच्या दिशेने झाली. लोकांवर पैसा, संघटना व प्रचारमाध्यमांचा प्रभाव पाडून पक्षांनी एकंदर राजकारण दूषित तर केलेच, पण त्यावरोवर स्वतःमध्ये सत्तेची अंतर्वर्तुळे निर्माण केली. लोकांचे काम अशा पक्षांनी लादलेल्या उमेदवारांना मते देण्यापुरते मर्यादित करण्यात आले. या पक्षपद्धतीतून लोकांमध्ये स्वयंशासन किंवा स्वराज्य येऊ शकेल असे जयप्रकाश नारायण यांना वाटत नाही.

समाजवाद्यांनी विकेंद्रीकरण, चतुःस्तंभी राज्य वगैरे कल्पनांचा पुरस्कार केला असला तरी राज्य व सत्ता हीच त्यांच्या समाज परिवर्तनाची माध्यमे आहेत. पक्षपद्धत व सत्तेचे वरिष्ठ पातळीवर केंद्रीकरण असेपर्यंत विकेंद्रीकरण किंवा लोकतंत्र यांना अर्थ नाही. सत्ता लोकानुवर्ती होण्यासाठी सत्ता वरून खाली अशी सोपवण्याची प्रक्रिया थांबून लोकांनी स्थानिक पातळीवर स्वयंशासन व स्वतःचा कारभार स्वतः चालवणे या गोष्टी सुरू केल्या पाहिजेत. याकरता लोकांना मदत करण्याचे काम निष्पक्ष, विधायक वृत्तीच्या संघटनेने करावयाचे आहे व गांधींच्या लोकसेवक संघामध्ये ही कल्पना होती.

पक्षपद्धतीप्रमाणेच राज्याचे अस्तित्वदेखील अनिष्ट आहे व राज्याचे अस्तित्व नष्ट करता आले नाही तर राज्याची कक्षा शक्य तितकी मर्यादित केली पाहिजे असे जयप्रकाश नारायण यांना वाटते. मानवी उत्क्रांती ही माणसांनी आपसात न्याय, मैत्री व सहकार्याच्या भावनेने राहण्यात आहे व याकरता कोणतेही बाह्य निर्बंध नकोत. परंतु लोकशाही समाजवादी, कम्युनिस्ट, कल्याणकारी राज्याचे समर्थक, हे सर्वच राज्याची कक्षा वाढवण्यावर भर

देतात. अगोदरच राजकीय सत्तेची मक्तेदारी असणाऱ्या राज्याकडे आर्थिक सत्तेची मक्तेदारी गेल्यामुळे जशा प्रकारे सत्तेचे केंद्रीकरण होईल त्यावर नियंत्रण ठेवण्याकरता केवळ संविधान किंवा मूलभूत हक्क हे सर्वथा असमर्थ आहेत. यांतून व्यक्तींची गुलामगिरी पूर्णत्वाला जाईल कारण त्यांचे स्वातंत्र्य व त्यांची भाकरी यांवर राज्यातील नोकरशाहीचे संपूर्ण वर्चस्व असेल. समाजवाद्यांनी याकरता केलेल्या कल्पना सर्वथैव अपुऱ्या आहेत. कामगार चळवळ राज्याच्या वाढत्या सत्तेला आळा घालू शकत नाही व स्वतः कामगार चळवळ नोकरशाहीने ग्रस्त आहे.

कदाचित उपभोक्त्यांच्या संघटना व सहकारी संघटना राज्याच्या वाढत्या शक्तीला आळा घालू शकतील. सत्तेचे विकेंद्रीकरण ही कल्पनादेखील समाजवादी अलीकडे मान्य करू लागले आहेत. परंतु एकंदरीत नागरी स्वातंत्र्याला राज्याचे वाढते सामर्थ्य धोका निर्माण करीत आहे असे जयप्रकाश नारायण यांना वाटते.

लोकांमध्ये अंतर्बाह्य शिस्त निर्माण करणे, राज्यावर अवलंबून न राहता शक्य तितके स्वावलंबी होणे व स्वयंशासन करण्याकरता लोकांनी समाजवादी संस्था निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे या जाणिवेतून आपण सर्वोदयाकडे वळलो असे जयप्रकाश नारायण लिहितात. समाजवाद हा राज्य–समाजवाद असण्याऐवजी लोकांचा समाजवाद असावा व सर्वोदयात ते अभिप्रेत आहे असे त्यांना वाटते. सत्ता किंवा पक्ष यादृष्टीने निरुपयोगी आहेत व समाजवादी समाजपरिवर्तनामध्ये लोकांना स्वावलंबन व स्वयंशासन याकरता कार्यप्रवण करण्याकरता त्यांच्यात राहून निःस्वार्थ वृत्तीने सतत कार्य करणाऱ्या लोकसेवकांची गरज आहे असे त्यांना वाटते.

समाजवादाला अभिप्रेत सहकार्य, स्वावलंबन व जबाबदारीची भावना ही वैशिष्ट्ये असणारा समाज औद्योगिक संस्कृती व शहरांची वाढ यांतून निर्माण होणार नाही. यातील माणसामाणसांचे संबंध औपचारिक, जिव्हाळा नसलेले, कामाच्या पद्धती आनंद व संतोषरहित व केवळ उत्पादनवाढ व कार्यक्षमता यांवर भर देणारे असतील. विज्ञानाने सर्व जग लहान केले आहे परंतु या लहान विश्वात नवीन संस्कृतीने शेजाऱ्यांना देखील परके केले आहे. अशा जगात नोकरशहा, व्यवस्थापक, तंत्रज्ञ, राज्यवादी यांच्याकडे सत्ता केंद्रित होणे हे अपरिहार्य आहे. राज्यावर भर देऊन समाजवाद्यांनी असा समाज स्वीकारण्याची चूक केली आहे. स्वयंशासन, सहकार्य, योग्य वाटप, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व ही मूल्ये वाढवण्याकरता अशा समुदायाऐवजी लहान समुदायांचा बुद्धि-

पुरस्सर स्वीकार करावयास हवा. माणूस हा निसर्ग व संस्कृती दोन्हींचे अपत्य आहे व त्यांच्यात समन्वय साधणे हे त्याच्या समतोल विकासाकरता आवश्यक आहे.

ऑल्डस हक्सलेचा आधार घेऊन जयप्रकाश असे प्रतिपादन करतात की विज्ञानाच्या प्रगतीचा व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात विस्ताराचा जवळचा संबंध नाही. तांत्रिक क्षेत्रात विज्ञानाचा वापर करून मोठ्या प्रमाणावर केलेले उत्पादन हे एका विशिष्ट समाजव्यवस्थेतून घडून आले, ज्यामध्ये नफ्याकरता उत्पादन करणे हे एका संपत्ती बाळगणाऱ्या वर्गाच्या हिताचे होते व याकरता मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यावर भर देण्यात आला. परंतु जर समाजाची उद्दिष्टे नफा मिळवणे व युद्ध करणे ही नसून शांतता, सहकार्य, स्वातंत्र्य, समता ही असतील तर विज्ञानाचा वापर तितक्याच कौशल्याने उपयुक्त तंत्रज्ञान वाढवण्याकरता करता येईल. असे तंत्रज्ञान मध्यम व छोटे उद्योग उभे करण्याकरता व उत्पादनाचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरावे. यांतून राष्ट्रवादाला पोषक परिस्थिती निर्माण होईल काय ? या प्रश्नाचे उत्तर जयप्रकाश नकारार्थी देतात. सर्वोदय समाज हा जागतिक शांततेवर भर देणारा आहे व त्यात राष्ट्रवाद व राष्ट्रांच्या स्पर्धा यांना स्थान नाही. यातील छोटे समुदाय हे एकमेकांशी स्पर्धा करणारे किंवा स्वार्थी वृत्तीचे असणार नाहीत. त्यातील व्यक्ती जगाचे नागरिक असतील व स्थानिक गट हे एकमेकांशी सहकार्य करणारे असतील.

गांधीवादात निहित असलेली समाजक्रांतीची कल्पना प्रत्यक्ष कृतीच्या अभावी आपल्याला आकलन झाली नाही असे जयप्रकाश लिहितात. परंतु भूदान चळवळीने ही कल्पना साकार झाल्याचे त्यांना दिसून आले. या चळवळीत भाग घेतल्यामुळे समाजक्रांती शांततामय मार्गाने साध्य करता येईल असा विश्वास त्यांच्यात निर्माण झाल्याचे ते नमूद करतात. भूदानात जमीन विभागण्याची कल्पना होती, ग्रामदानात ग्रामीण जीवन सामुदायिक नियंत्रणाखाली आणण्याची व एकंदर जमिनीची मालकी सामुदायिक बनवण्याची कल्पना होती. दान या शब्दाचा अर्थ शंकराचार्यांच्या व्याख्येला अनुसरून सम विभाग करणे असा विनोबांनी लावला व या कल्पनेचा विस्तार भूदान, ग्रामदान व संपत्तिदान या कल्पनांद्वारे करून ग्रामीण क्रांतीचा पाया घातला असे जयप्रकाशना वाटते.

गांधींच्या तत्त्वज्ञानाला अशाप्रकारे व्यावहारिक स्वरूप देण्याचे श्रेय जयप्रकाश विनोबांना देतात. जयप्रकाशांच्या दृष्टीने या क्रांतीची प्रक्रिया विचार व मूल्यांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची आहे. जुनी मूल्ये सोडून नवीन

मूल्यांचा स्वीकार करताना, नवीन समाजरचनेला अनुकूल असणारी मूल्ये आत्मसात करण्यावर येथे भर देण्यात आला आहे. उद्दिष्टांना अनुरूप अशी साधने असावयास पाहिजेत, अन्यथा क्रांती अयशस्वी होते असा अनुभव आहे. त्यामुळे स्वेच्छेने मालमत्ता, जमीन व मालकी हक्क यांच्याविषयी लोभ कमी करणे हे कायम क्रांतीकरता आवश्यक आहे असे ते प्रतिपादन करतात. भूदान, ग्रामदान व संपत्तीदान यांमधून ग्रामस्वराज्य हे साकार होईल असा त्यांना विश्वास वाटतो.

परंतु हे करण्यासाठी जशा प्रकारच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची गरज आहे ते सत्तेच्या व स्पर्धेच्या राजकारणातून मिळणार नाहीत. सर्वोदयाचे राजकारण हे त्यांना सत्तेच्या राजकारणापेक्षा अधिक आकर्षक वाटते. यामुळे ते राजनीतीकडून लोकनीतीकडे वळतात. त्यांचा असा दावा आहे की सर्वोदयाचे राजकारण हे पक्षविरहित व सत्ताविरहित असेल परंतु राजनीती व लोकनीती यांत विरोध असण्याचे कारण नाही. लोकांच्या हाती सत्ता असावी हे राजनीतीचे उद्दिष्ट असेल, तर हे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरता लोक-नीती ही पूरक ठरेल. जयप्रकाश नारायण यांच्या सर्वोदयवादाची ही तात्त्विक भूमिका आहे.

* * *

संपूर्ण क्रांतीचे अर्थशास्त्र

दिनकर बोरीकर

मार्क्सवाद, समाजवाद, रॉयवाद, भूदान व ग्रामदानयुक्त सर्वोदयवाद अशा कर्मयोगी वैचारिक प्रवासातून आपल्या आयुष्याच्या संध्याकाळी जयप्रकाशजी स्थिरावले ते संपूर्ण क्रांतीच्या क्षितिजावर. भारतीय समाज बहुरंगी, बहुढंगी असून या समाजात सांस्कृतिक विविधता आहे. प्रचंड प्रमाणात अंधश्रद्धा आहेत, एकीकडे डोळे दिपवून टाकणारी ऐश्वर्यसंपन्नता आहे तर दुसरीकडे पोटाची खळगीदेखील भरता येत नाही एवढे भयानक दारिद्र्य आहे. आधुनिक युगाचे न थोपविता येणारे आक्रमण आहे तर जीर्ण झालेल्या विविध रूढींची व परंपरांची न तुटणारी नाळ देखील शाबूत आहे. अशा एका स्थितीतून जयप्रकाशांना तीव्रतेने गरज भासली ती अशा एका चळवळीची की जी चळवळ एका नवीन समाजरचनेचा पाया घालील. याच चळवळीला त्यांनी नाव दिले संपूर्ण क्रांती. जयप्रकाशांना अभिप्रेत असलेली ही संपूर्ण क्रांती हिंसक नाही, लष्करीदेखील नाही, ती केवळ सत्तांतराचीही नाही. ती आहे स्थित्यंतराची क्रांती. आहे ते सर्व उद्ध्वस्त करून अगदी नवीनच काहीतरी पेरायचे ही कल्पना त्यांच्या क्रांतीत नाही. उदात्त परंपरा आणि देदीप्यमान इतिहासाचा वारसा यांच्याशी नाते कायम ठेवूनच समाज-परिवर्तनाचा प्रवाह पुढे गेला पाहिजे, अशीच त्यांची संपूर्ण क्रांतीविषयीची भूमिका आहे. म्हणूनच अशा परिवर्तनासाठी त्यांचा भर आहे तो वाद प्रतिवाद, चर्चा, पाठपुरावा, मतपरिवर्तन व अत्यंत शिस्तबद्ध व शांततापूर्ण सत्याग्रह या बाबींवर.

जयप्रकाशांच्या संपूर्ण क्रांतीत माणूस हा केंद्रबिंदू असून त्याला सुसंस्कृत जीवन जगता यावे म्हणून मानवी हक्क आणि नागरी स्वातंत्र्य यांची शाश्वत

हमी त्यांना अति मोलाची वाटते. केवळ माणूस बदलणं अशक्य आहे म्हणून त्याच्याभोवती असलेली व्यवस्था व वातावरण बदलण्याची ही गरज जयप्रकाशांनी प्रतिपादिली आहे. म्हणजेच जयप्रकाशांच्या कल्पनेत क्रांती आणि उत्क्रांतीचा मिलाफ झालेला दिसून येतो. प्रश्न तात्पुरते सोडविण्याऐवजी मूलभूत परिवर्तनावर त्यांचा भर दिसून येतो. हे परिवर्तन कसे घडवायचे ? शांततापूर्ण लोकशाही मार्गाने. कोणासाठी घडवायचे? सर्वसामान्य माणसासाठी. कोणी घडवायचे ? सर्वसामान्य माणसाने, वैयक्तिक निर्धार व सामूहिक प्रयत्न यांची सांगड घालून. याचा अर्थ जयप्रकाशांच्या संपूर्ण क्रांतीचा सर्वसामान्य माणूस साध्य आहे आणि साधनही.

मात्र ही संपूर्ण क्रांती नेमकी कशी असेल, ती कधी घडेल इत्यादीबाबतीत जयप्रकाशांनी नीलप्रत बनविली नाही. एवढेच नव्हे तर अनेक बाबतीत संकल्पनात्मक सुस्पष्टतादेखील अद्याप आलेली नाही. संपूर्ण क्रांतीच्या व्यावहारिक तपशिलाचा विचार करण्याच्या आधी आज खरी गरज आहे ती संकल्पनात्मक स्पष्टता आणण्याची; संपूर्ण क्रांतीला अभिप्रेत असलेली अर्थरचना कशी असेल याची नीलप्रत बनविण्याच्या आधी अर्थशास्त्र आणि अर्थव्यवस्था यासंबंधीच्या प्रचलित विचारसरणीत कोणत्या प्रकारचे बदल अभिप्रेत आहेत हे जाणून घेण्याची. अर्थशास्त्र आणि अर्थरचना यांविषयीचा आपला एक तर परंपरागत किंवा पोथीवादी दृष्टिकोण बनलेला आहे. संपूर्ण क्रांतीच्या प्रक्रियेत हा मूलभूत दृष्टिकोणच बदलण्याची गरज आहे. मूळ दृष्टिकोण न बदलता अपेक्षित परिवर्तनाचे कितीही व्यावहारिक तपशील आपण तयार केले तरी ते परिवर्तनच असणार नाही. आगापिछा नसलेले, तेवढ्यापुरते तेवढे बदल एवढेच त्याचे स्वरूप राहील. संपूर्ण क्रांतीला अभिप्रेत असलेल्या परिवर्तनाचे यथार्थदर्शी चित्र त्यातून उभे राहणार नाही. म्हणून कोणत्या बाबतीत मूलभूत दृष्टिकोण बदलण्याची गरज आहे त्याचे विवेचन सदरहू लेखात करण्याचे योजिले आहे. बदलदेखील आपापल्या विचारप्रणालीनुसार भिन्नभिन्न असू शकतात. संपूर्ण क्रांतीला जवळचे असणारे बदल कोणते असू शकतील त्याचे येथे दिशादिग्दर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे.

अर्थशास्त्राचे स्थान

" Economic ambitions are good servants, but they are bad masters ". आर. एच. टॉनी यांनी ' रिलीजन अँड दि राईज ऑफ कॅपिटॅलिझम ' या पुस्तकात वरीलप्रमाणे आपले मत मांडले ते अर्थशास्त्राचे सामर्थ्य आणि अर्थशास्त्राची मर्यादा स्पष्ट करण्याच्या दृष्टीने मोठे सार्थ मत आहे.

मानवाचे एकूणच भवितव्य अर्थशास्त्र ठरविते असे म्हणणे अतिरेकी ठरेल. पण आजच्या काळात मानवाच्या भवितव्यावर अर्थशास्त्राचा मोठा प्रभाव आहे हे सत्य आहे. एखादा व्यवहार, मग तो व्यक्तीचा असो, गटाचा असो किंवा सरकारचा असो, तो आर्थिकदृष्टचा योग्य आहे किंवा नाही याच निकषावर त्याची योग्यायोग्यता तपासली जाते. नास्सो सीनियर या विख्यात अर्थशास्त्र–ज्ञाने अर्थशास्त्र हे अग्रणी असे नैतिकशास्त्र असून संपत्ती संपादनाने मानवाची प्रचंड नैतिक प्रगती होते असे उद्‌गार काढून अर्थशास्त्र सर्वव्यापी शास्त्र ठरविण्याचा प्रयत्न केला होता. अर्थात् जॉन स्टुअर्ट मिलसारख्या प्रतिभावान बुद्धिमंताने अर्थशास्त्र हे मानवी जीवनाच्या एकूण साकलिकतेचा एक अंश आहे असे प्रतिपादिले होते. संपत्तीचा मोह माणसाच्या जीवनाला प्रेरक ठरतो असे मत मांडणाऱ्या लॉर्ड कीन्सलादेखील, आर्थिक प्रश्नाला अतिरेकी महत्त्व देऊन जीवनातील इतर स्थार्यी महत्त्वाच्या बाबींचा आर्थिक प्रश्नाच्या वेदीवर बळी देऊ नका असाच इशारा शेवटी द्यावा लागला.

पण आधुनिक समाजात अशाप्रकारचे मत ऐकावयास मिळणे दुर्मिळच झाले आहे. आर्थिक कार्यमान, आर्थिक विकास, आर्थिक विस्तार या संज्ञा आज चलनी नाणी बनल्या आहेत. एखादी योजना, मग ती मानवी हिताच्या दृष्टीने कितीही महत्त्वाची असो, अनार्थिक (uneconomic) आहे असे म्हटले की ती योजना एकदम आपल्या नजरेतून उतरते. या उलट एखादी योजना कितीही अनैतिक, आत्मनाशी, अधःपतनाकडे नेणारी व मानवी संस्कृती संकटात आणणारी असो, तिच्यामुळे भावी पिढ्यांचे कितीही अपरिमित नुकसान होणारे असो, जोपर्यंत ती आर्थिक निकषावर परवडणारी नाही हे सिद्ध केले जात नाही तोवर ती योजना उत्कर्षच पावणार ही आजची समजूत आहे. अर्थशास्त्र ज्यावेळी अनार्थिक ही संज्ञा वापरते त्यावेळी ते अनार्थिकपण केवळ एकाच निकषावर ठरविले जाते. पैशाच्या रूपाने त्या योजनेतून नफा मिळत नसेल तर ते अनार्थिक हा अर्थशास्त्राचा सरळ साधा हिशेब. हा नफा तरी कोणाला मिळावा ? एकूण समाजाला नफा मिळाला असता तर समजू शकले असते. पण योजना अंगीकारणाऱ्यास नफा मिळावा हा निकष लावला जातो. आपल्या देशातील अनेक राष्ट्रीकृत उद्योगांकडे याच दृष्टीने पाहिले जाते, याची अनेक उदाहरणे देता येतील.

नफ्याचा निकष लावताना लागतीचा हिशेब केला जातो, तो आर्थिक साचेबंद चौकटीतच. नैसर्गिक परिस्थिती, वातावरण यांसारख्या मुक्त वस्तू आपण वापरतो पण त्यांची किंमत द्यावी लागत नसल्यामुळे त्यांची हानी झाली तरी त्याची कदर न करता केवळ पैशाच्या रूपाने होणारा खर्चच आपण

लागतीत मोजतो व त्या आधारावर नफा काढून योजनेची सुदृढता ठरवितो. याचा परिणाम असा झालेला दिसतो की माणूस आणि निसर्ग यांचे जे निकोप संबंध असावयास हवेत त्याची तमा न बाळगता असंख्य योजना आपण तात्कालिक नफ्यावर दृष्टी ठेवून पुढे रेटीत असतो.

आजच्या आर्थिक व्यवहारात बाजारपेठ यंत्रणा अत्यंत महत्त्वाची बनलेली आहे. स्वतःपुरताचा स्वार्थ एवढ्या एकाच भूमिकेतून खरीददार व विक्रेते अशा बाजारपेठेत परस्परांच्या संपर्कात येत असतात. खरीददार आपण देत असलेल्या किंमतीचा पुरेपूर मोबदला मिळण्यासाठी वस्तू स्वस्त पडावी एवढ्याच स्वार्थी हेतूने व्यवहार करीत असतो. ती वस्तू कशी निर्माण झाली, त्या निर्मिती प्रक्रियेत समाजाचा व देशाचा लाभ झाला का, इत्यादी बाबी तो विचारात घेत नाही. म्हणूनच आयात वस्तू स्वस्त पडत असेल तर तो अत्यंत खुषीने ती खरेदी करतो, पण असे करण्यात आपल्या देशातील उद्योगाची बाजारपेठ आपण कमी करीत आहोत, देशातील कारागिरांच्या पोटावर पाय देत आहोत, आपल्या देशावर परदेशी कर्जाचा बोजा आपण वाढवीत आहोत, अशा गंभीर व दूरगामी दुष्परिणाम घडविणाऱ्या बाबी त्याच्या लेखीही नसतात. एखादा खरीददार गरजू व गरीब आहे म्हणून विक्रेत्याने त्यास कमी किंमतीला वस्तू विकली असा मानवतावादी व्यवहारही आपणास चमत्कारिक वाटतो. याचा अर्थ आजची बाजारपेठ व्यक्तिवादी स्वार्थावर आधारलेली संस्था आहे आणि अशी संस्था आर्थिक जगताचा गाभा बनलेली आहे. सर्वांना स्वार्थप्रेरित सर्व प्रकारचे स्वातंत्र्य हवे, पण व्यापक जबाबदारीची जाणीव नको, अशी आजची अर्थव्यवस्था व असे आजचे अर्थशास्त्र आहे.

अर्थशास्त्रज्ञ अर्थशास्त्राला जास्तीत जास्त शास्त्रीय बनविण्यासाठी संख्यात्मक बाजूकडे वळत आहेत. अर्थशास्त्र हे अर्थमितीचे गुलाम बनू पाहात आहे. मानवी जीवनात महत्त्वाच्या बाबी या गुणात्मकही असतात इकडे दुर्लक्ष केले जात आहे. सौंदर्य, आरोग्य, स्वच्छता, मानवी सहानुभूती इत्यादी बाबींना अर्थशास्त्रीय विचारात कसलेच स्थान दिसून येत नाही. लागत-लाभ विवेचनाचाही असाच व्यक्तीवादी विचार होत आहे. सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा निर्देशांक अर्थशास्त्रज्ञांना यामुळेच हर्षोन्मीलित करीत असतो. पण या राष्ट्रीय उत्पादनात नेमके काय वाढले, कुणाचे हित त्यातून साध्य झाले या मार्मिक बाबी उपेक्षिल्या जात आहेत.

या सर्व विवेचनाचा अर्थ असा की आजचे अर्थशास्त्र माणसाला हरवून बसलेले आहे. अर्थशास्त्र शेवटी मानवी समाजासाठीचे शास्त्र आहे ही मूळ भूमिका घेतली गेली तरच ती संपूर्ण क्रांतीला जवळ जाणारी असेल.

अमानुष तंत्रज्ञान

आजचे युग हे आधुनिक तंत्रज्ञानाचे युग असून एक प्रचंड उत्पादन शक्ती या तंत्रज्ञानाने मानवाला उपलब्ध करून दिली हे सत्य असले तरी आजच्या तंत्रज्ञानात 'माणूस' हरवून बसला आहे. निसर्ग आणि माणूस यांचे निकोप नाते या तंत्रज्ञानाने पार विघडवून टाकले आहे, एवढेच नसून माणसामाणसांत देखील एक प्रकारची परात्मता निर्माण केली आहे. एका अर्थाने आजचे तंत्रज्ञान अमानुष बनले आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाने मानवापुढे तीन समस्या उभ्या केल्या आहेत. एक म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाने तांत्रिक, संघटनात्मक आणि राजकीय क्षेत्रात असे काही आकृतिबंध निर्माण केले आहेत की त्यांत माणूस गुदमरून चाललेला आहे. त्याचे मनोबल खच्ची होत आहे. दुसरी समस्या म्हणजे माणसाच्या अवतीभवती जे सजीव वातावरण आहे त्याच्यावर भयानक ताण निर्माण होत असून ते जवळपास मोडकळीला आले आहे. तिसरी समस्या म्हणजे निसर्गातील अशी साधनसंपत्ती जिचे पुनर्निर्माण होत नाही, ती प्रचंड वेगाने संपुष्टात येत आहे.

या तीन संकटांपैकी कोणतेही एक संकटदेखील मानवाच्या विनाशाला कारणीभूत ठरू शकते. आजच्या तंत्रज्ञानाचे स्वरूपच असे आहे की ते विस्तारवादी राहणार आहे. मर्यादित वातावरणात अमर्याद तांत्रिक विस्तार मानवापुढे त्याच्या अस्तित्वालाच आव्हान देऊन उभे आहे. आजच्या तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य म्हणजे, विविध समस्यांना त्यायोगे जी उत्तरे मिळतात त्यापेक्षा अधिक वेगाने नवनवीन समस्या उभ्या राहात आहेत. त्यातून माणूस परांकित झाला आहे, होत आहे. दारिद्र्य आणि बेकारी या दोन भेडसावणाऱ्या प्रश्नांना अद्यापि उत्तर मिळू शकले नाही. एव्हढेच नव्हे तर विकसनशील देशांत बेकारीचे प्रमाण तीस टक्क्यांपर्यंत पोचले असून, यापुढे हे प्रमाण गंभीर स्वरूप धारण करणार आहे. अशा एकूण परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानात सुयोग्य बदल घडवून ते अधिक मानवी कसे करता येईल याचा विचार होण्याची गरज आहे.

माणसाला सुखी जीवन जगता यावे म्हणून त्याला विसाव्याची गरज आहे हे खरे आहे. पण केवळ शारीरिक कष्ट कमी झाले म्हणजे विसावा मिळतो हे तेवढे खरे नाही. कारण विसावा ही शेवटी मानसिक अवस्था आहे. आजच्या तंत्रज्ञानाने माणसाचे शारीरिक कष्ट कमी केले असले तरी वरील अर्थाने त्याचा विसावा वाढला आहे असे काही म्हणता येत नाही. शुमॅकर यांनी तर

याबाबतीत एक सूत्रच मांडले आहे. एखाद्या समाजास मिळणारा वास्तविक विसावा, त्या समाजातील श्रमबचावू आधुनिक तंत्रज्ञानाच्या व्यस्त प्रमाणात असतो. भारतीय माणसापेक्षा अमेरिकन माणूस अधिक आणि विविध मानसिक तणावात जीवन घालवीत असतो हे त्याचेच द्योतक आहे.

माणसाला विसावा देणे याचा अर्थ त्याला रिकामे ठेवणे असा जर कोणी काढला, तर कंटाळवाणेपणा त्याला स्वीकारावा लागेल व त्यातून जीवन सुखाने उपभोगण्याऐवजी मानसिक विकृतीला तोंड द्यावे लागेल. शुमॅकर यांनी आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रत्यक्ष उत्पादनाला किती वेळ खर्चावा लागतो याचा कच्चा हिशेब मांडला आहे. त्यांच्या मते एकूण सामाजिक वेळेच्या साडेतीन टक्केच वेळ प्रत्यक्ष उत्पादनकार्यात खर्च होतो. बाकीचा साडे शहाण्णव टक्के फुरसतीचा वेळ कसा घालवावा ही माणसापुढील समस्याच आहे. विश्रांती, झोप, खाणेपिणे, दूरदर्शन पाहणे आणि अशाप्रकारे वेळ घालविणे हे जर नित्याचे होणार असेल तर अशा जीवनपद्धतीत माणसाला रितेपण जाणवायला लागेल, आणि त्यातून माणूस 'माणूसपणा' हरवून बसायला लागेल. म्हणूनच आधुनिक तंत्रज्ञान वरवर पाहता वरदान वाटले तरी त्याचे हे दुष्परिणाम लक्षात घेता त्याचा पुनर्विचार होण्याची गरज आहे.

एकूण तंत्रज्ञान व उत्पादनतंत्र असे असावे की ज्यामुळे माणसाला सृजनशील उत्पादक कार्यात गुंतून राहता येईल. रिकामा वेळ कसा घालवावा म्हणून त्याला हशीश किंवा एलएसडी घ्यावे लागू नये, 'रिकामे डोके सैतानाचे घर' अशी त्याची दुरवस्था होऊ नये. विसावा आणि कष्ट यांचे संतुलन माणसाच्या प्रकृतीशी सांगड घालणारे असावे. आज घटकेला हे स्वप्नरंजन वाटेल, परंतु आधुनिक तंत्रज्ञानाने जो भस्मासुर माणसापुढे उभा केला आहे त्यातून विकृती आणि विनाश अटळ आहे. म्हणून आपल्याजवळ उपलब्ध असलेल्या ज्ञानाच्या साह्याने हे स्वप्नरंजन प्रत्यक्षात अवतरण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

प्रचंड प्रमाणावरील बेकारी दूर करणारे, दारिद्र्य निवारणाला हातभार लावणारे, ज्यामुळे ग्रामीण भाग ओस पडतो व नागरी भागात अमानुष गर्दी होते ही प्रक्रिया थांबविणारे, माणसाला पराकित न करता त्याला स्वावलंबी व स्वाभिमानी बनविणारे, माणसाच्या सृजनात्मक शक्तीचा व शैलीचा उपयोग घेणारे असे एक मानवी चेहरा असणारे तंत्र व तंत्रज्ञान आपण शोधून काढले पाहिजे.

प्रचंड उत्पादनाचे (mass production) तंत्राऐवजी सर्व सामान्यांकडून उत्पादनाचे (production by masses) तंत्र अवलंबिण्याची खरी

गरज आहे. प्रचंड उत्पादनाचे तंत्र हे हिंसक, पर्यावरण विस्कळीत करणारे, माणसाला लाचार करणारे व स्वयंपराभूत ठरणारे असे आहे. सर्व सामान्यांकडून उत्पादनाचे तंत्र आधुनिक ज्ञानाचा सुयोग्य वापर करणारे, विकेंद्रीकरणाला पूरक, नैसर्गिक पर्यावरणाला पोषक व मानवाला गुलाम बनविण्याऐवजी त्याची सेवा करणारे असणार आहे. शुमॅकरने अशा तंत्रज्ञानास मध्यम तंत्रज्ञान (Intermediate Technology) असे म्हटले आहे. हे तंत्रज्ञान मागास तंत्रापेक्षा उत्कृष्ट व आधुनिक तंत्रज्ञानापेक्षा मानवी असणार आहे. लोकशाही व स्वावलंबी समाजरचनेला हे तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त ठरणारे आहे.

तंत्रज्ञानाच्या बाबतीत वैचारिक संघर्ष दिसून येतो. विचारवंतांचा एक गट आधुनिक तंत्रज्ञानवादी असून आधुनिकतेपासून अत्याधुनिकतेकडे जाण्याचा त्यांचा आग्रह आहे. युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटीचे एक प्रमुख डॉ. मिक्को मॅन शॉट यांच्या मते 'more, further, quicker, richer, are the watch words of the present day society' आपली घोडदौड पुढेच असली पाहिजे अशा मताचे ते आहेत. वाढती लोकसंख्या आणि वाढती उपासमार याला अत्याधुनिक तंत्रज्ञान हेच उत्तर आहे असे त्यांचे मत आहे. लोक या तंत्रज्ञानाला विरोध करतील तर आधुनिक शस्त्रांनी सज्ज पोलिसांची मदत घेऊन तो विरोध मोडून काढला पाहिजे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाने वातावरण असंतुलित होत असेल तर प्रदूषण प्रतिबंधक उपाय कडक केले पाहिजेत, नैसर्गिक साधनसंपत्ती संपुष्टात येऊन ती अपुरी पडत असेल तर कृत्रिम साधनसामग्रीकडे वळले पाहिजे. इंधनशक्ती व ऊर्जा कमी पडत असेल तर सौरशक्तीकडे वळले पाहिजे. कोणतीही अडचण दुरापास्त नाही अशी एकूण त्यांची विचारसरणी.

दुसरी विचारसरणी ही 'स्वगृही परत चला' म्हणणाऱ्यांची आहे. अर्थात त्यांचा आवाज क्षीण आहे. लोकांचे चित्त ते खेचून घेऊ शकत नाहीत, कारण अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या विचारसरणीची एक फॅशन बनली आहे. त्याचे एक प्रचंड आकर्षण निर्माण झाले आहे. म्हणून या गटाचे म्हणणे सुजाणपणे समजून घ्यावे लागते. संपूर्ण क्रांतीवादी जयप्रकाश नारायण हे या गटाचे विचारवंत मानता येतील. या गटाचे लोक विकासविरोधी व मागास आहेत असा आरोप केला जातो तो बरोबर नाही. तसा विचार केला तर दोन्ही गट विकासवादी आहेत. पण पहिला विकासवादी गट 'प्रचंड' व 'संख्या' या दोन घटकांच्या आहारी गेलेला आहे, तर दुसरा गट विकासाचा विचार करताना मानवी जीवनाच्या सांकलिकतेचा व गुणात्मक बाजूचा विचार करताना दिसून येतो.

'स्वगृही परत चला' म्हणणाऱ्यांनाही प्रगती हवी आहे. पण प्रगतीचा अर्थ नेमका काय ? पहिल्या गटातील विचारवंत, अधिक मोठे, अधिक प्रमाण, अधिक वेग, अधिक हिंसा अशा निसर्गाच्या सुसंवादी सुरांशी बेसूर लावणाऱ्या कल्पना मनाशी बाळगून असतात, तर दुसऱ्या गटातील लोक निसर्गाशी असलेला माणसाचा सुसंवाद न बिघडविता प्रगती साधण्यावर भर देतात.

निसर्गाशी सुसंवाद राखून प्रगती साधणारे तंत्र आणि तंत्रज्ञान अशक्य आहे असे म्हणणाऱ्यांनी शेतीच्या क्षेत्रात Soil Association आणि औद्योगिक क्षेत्रात Intermediate Technology Development Group यांचे कार्य अभ्यासण्यासारखे आहे.

संपूर्ण क्रांतीला जी नवीन समाजरचना अभिप्रेत आहे त्या समाजरचनेला अत्याधुनिक तंत्रज्ञान मुळीच पोषक ठरणार नाही. त्यासाठी खऱ्या अर्थाने माणसाला सुखी व संपन्न जीवन जगू देणारे सुयोग्य तंत्रज्ञानच स्वीकारावे लागेल.

मालकी हक्काचा आकृतिबंध

अहंमन्यता, लालसा, भांडणाची वृत्ती हे मानवातील विकार समूळ नाहीसे करून एक संपूर्ण आदर्श मानवी समाज निर्माण करण्याचा दावा कोणतीच व्यवस्था करू शकत नाही. संपूर्ण क्रांतीनेदेखील असा दावा करू नये. परंतु संपूर्ण क्रांतीला अभिप्रेत असलेली समाजरचना या विकारांना खचविणारी परिस्थिती मात्र निर्माण करू शकते. आर्थिक क्षेत्रात बोलावयाचे झाल्यास वस्तू संपादन करण्याची माणसाची वृत्ती ठळकपणे दिसून येते. त्यातूनच मालमत्तेच्या मालकीचा हक्क पुढे येतो. या प्रश्नाकडे पाहण्याचा कोणता दृष्टिकोण संपूर्ण क्रांतीला जवळ जाणारा असू शकेल त्याचे विवेचन करणे उद्‌बोधक ठरेल.

खाजगी मालमत्ता आणि त्याला पर्याय म्हणून साचेबंद राष्ट्रीयीकरण अशा दोन भूमिकांतून मालमत्तेच्या हक्काकडे पाहिले जाते. यातून काही तिसरा पर्याय निघतो काय याचा विचार झाला पाहिजे.

मालमत्तेची खाजगी मालकी यात दोन प्रकार आपण केले पाहिजेत. सृजनशील कार्याला आवश्यक आणि मदतनीस ठरणारी मालमत्ता आणि अशाप्रकारे नसलेली मालमत्ता. पहिल्याप्रकारची खाजगी मालमत्ता निकोप व स्वाभाविक वाटते तर दुसऱ्या प्रकारची खाजगी मालमत्ता हानिकारक वाटते. म्हणजे खाजगी मालमत्तेचा हक्क प्रत्यक्ष श्रम आणि काम यापासून फारकत घेतलेला असेल तर तो हक्क भ्रष्टाचारी समजला पाहिजे. साहजिकच या भूमिकेतून पाहू गेल्यास उद्योगाचा आकार व परिणाम यांच्याशी मालकी हक्काचा फार मोठा

निकटचा संबंध मानला पाहिजे. या आधारावर खालीलप्रमाणे मालकी हक्क मांडता येतो.

लघुउद्योगात मालक हाच काम करणाराही असल्यामुळे खाजगी मालकी, स्वाभाविक, फलदायी व न्याय्य ठरू शकते. मध्यम परिमाण उद्योगात मालकाची प्रत्यक्ष कामापासून फारकत झालेली असते. अशा उद्योगात जी फलप्राप्ती होते तिच्यावर मालकांसह सर्व कामगारांचा हक्क मानला पाहिजे. विशाल परिमाणावरील उद्योगात मालकाचा प्रत्यक्ष कार्याशी संपर्क तर नसतोच, त्याची ओळखही नसते. म्हणून अशा उद्योगात खाजगी मालकी अर्थशून्य बनते. इतरांच्या कष्टावर जगणारा परोपजीवी वर्गच यातून निर्माण होतो.

अशा विशाल परिमाणावरील उद्योगाच्या खाजगी मालकीला राष्ट्रीयीकरणाचा पर्याय मानला पाहिजे. परंतु राष्ट्रीयीकरण म्हणजे केवळ खाजगी मालकीतून उद्योग सामाजिक मालकीकडे वळता करणे एवढाच संकुचित अर्थ काढून चालणार नाही, तर त्या पाठीमागे सामाजिक हिताला प्राधान्य देण्याची भूमिका प्रधान मानली पाहिजे. नाहीतर खाजगी संचालक मंडळाऐवजी नियुक्त संचालकमंडळ एवढा बदल सोडला तर समाजहिताविषयीची तीच बेदरकारी, तेच खचिक ऐश्वर्य, नवीन रूपाने जनतेचे शोषण करणारा नवीन वर्ग, असे त्याचे स्वरूप राहील.

राष्ट्रीयीकरणावर दोन आरोप खाजगी क्षेत्राकडून होत असतात. एक म्हणजे राष्ट्रीकृत उद्योगावर कसलेही उत्तरदायित्व नसल्यामुळे तो बेजबाबदार बनतो. सद्य स्थितीत हे काही प्रमाणात खरे असले तरी ते अटळ मानण्याचे कारण नाही. विचारप्रणालीच्या आधारावर झालेले राष्ट्रीयीकरण, राजकीय सोयीसाठी झालेल्या राष्ट्रीयीकरणापेक्षा निश्चितच जबाबदार असेल. त्यातून विशेष म्हणजे खाजगी नफ्याच्या स्वार्थापलीकडे जे खाजगी क्षेत्र स्वतःचे उत्तरदायित्व मानीत नाही, त्याचा वरील आरोप हा निर्मळ भूमिकेतून झाला असे मानण्याचे कारण नाही. दुसरा आरोप म्हणजे राष्ट्रीयीकरणामुळे अतिकेंद्रीकरण होऊन लोकशाही स्वातंत्र्याला बाधा येते. यावर उपाय म्हणजे विकेंद्रित स्वरूपात सार्वजनिक क्षेत्राची मालकी प्रस्थापित करणे हा होय.

राष्ट्रीयीकरणासाठी पथ्यपर काही तत्त्वे पाळली जावीत. व्यवसाय आणि राजकारण यांची सरभेसळ करू नये. नसता व्यवसाय अकार्यक्षम व राजकारण भ्रष्ट होऊ लागेल. राष्ट्रीकृत उद्योगांनी नफा जरूर कमवावा. परंतु नफा कमावणे हा प्रकार खाण्यासाठी जगणे यापेक्षा जगण्यासाठी खाणे या स्वरूपाचा असावा. माचला गेलेला नफा वाटला जावू नये किंवा तो सरकारलाही दिला

जाऊ नये, तर त्याचा वापर वाढत्या किंमती नियंत्रित करण्यासाठी व्हावा. सार्वजनिक हिताची जोपासना करण्याची कायदेशीर जबाबदारी राष्ट्रीकृत उद्योगांवर टाकली जावी. विचारप्रणालीवर आधारित राष्ट्रीयीकरण यशस्वी करण्याची नियोजनकारांवरदेखील मोठी जबाबदारी आहे. आधी प्रचंड संघटना उभी करायची व मग तिचे विकेंद्रीकरण करून विकेंद्रित घटकाला मर्यादित अधिकार द्यायचे या प्रकारापेक्षा आधी विकेंद्रित सार्वजनिक घटक निर्माण करावेत, त्यांच्या निकोप विकासाला आवश्यक तेवढे अधिकार त्यांना द्यावेत व त्या सर्वांच्या सुसूत्रीकरणासाठी त्यांचे महासंघ कायम करावेत. या पद्धतीने केलेले राष्ट्रीयीकरण विकेंद्रित स्वायत्त लोकशाहीला अधिक पोषक ठरणार आहे.

वरील सर्व विवेचनाचा अर्थ, मालकी हक्काचा विचार केवळ हक्क आणि अधिकार यांच्या संदर्भात न होता सामाजिक संदर्भातील त्याचे कार्यकारित्व याच्या निकषावर विचार झाला पाहिजे. उत्पादनाच्या साधनांच्या मालकीचे सामाजिकीकरण हा प्रश्न केवळ मालकीपुरता मर्यादित नसून तो एकूण जीवन-विषयक मूल्यांचा व तत्त्वप्रणालीचा प्रश्न बनतो हे लक्षात घेऊन शुमॅकर यांनी अनेक संभाव्य पर्याय असलेली एक संरचना आपल्या Small is Beautiful या पुस्तकात दिली आहे, तिच्यावर दृष्टी टाकणे उद्‌बोधक ठरेल.

पर्याय १ : स्वातंत्र्य बाजार अर्थव्यवस्था खाजगी मालकी	पर्याय ५ : सर्वाधिकारशाही बाजार अर्थव्यवस्था खाजगी मालकी
पर्याय २ : स्वातंत्र्य नियोजन खाजगी मालकी	पर्याय ६ : सर्वाधिकारशाही नियोजन खाजगी मालकी
पर्याय ३ : स्वातंत्र्य बाजार अर्थव्यवस्था सामूहिक मालकी	पर्याय ७ : सर्वाधिकारशाही बाजार अर्थव्यवस्था सामूहिक मालकी
पर्याय ४ : स्वातंत्र्य नियोजन सामूहिक मालकी	पर्याय ८ : सर्वाधिकारशाही नियोजन सामूहिक मालकी

आजच्या प्रचलित व्यवस्थेत एकतर पहिला पर्याय किंवा आठवा पर्याय असे दोनच पर्याय व्यवहार्य मानले जातात, पण आपली निवड एवढ्यापुरतीच मर्यादित ठेवण्याचे कारण नाही. संपूर्ण क्रांतीच्या तत्त्वज्ञानाला चौथा पर्याय जवळचा असू शकतो असे मानून त्याचा तपशील उभा करण्यास हरकत नसावी.

विकासविषयक स्पष्टता

संपूर्ण क्रांतिवाद्यांना विकास या कल्पनेविषयीची स्पष्टता स्वतःत आणण्याची, तसेच ती समाजाला पटवून देण्याची गरज आहे. कारण चालू युग हे विकासाचे असून, विकास हा एक परवलीचा शब्द बनला आहे. पण त्याच-बरोबर विकासाचा चुकं अर्थही लोकांच्या मनात ठसून बसला आहे.

विकास हा वस्तूच्या उत्पादनावरोबर सुरू होतो व वस्तूच्या उत्पादन वाढीवर तो संपतो असा सर्रास अर्थ लावण्याची प्रथा आपणास दिसून येते. नव्या प्रकारचे उत्पादन, त्या उत्पादनात वाढ, राष्ट्रीय उत्पादनात वाढ, नव्या तंत्रज्ञानाचा वापर, त्यात सतत भर घालणे, उत्पादन साधनात वाढ करणे या आपल्या विकास व प्रगतीच्या कल्पना राहात आल्या आहेत.

पण एक गोष्ट आपण विचारात घेत नाही, ती घेणे आवश्यक आहे. विकासाला, विशेषतः स्वायत्त विकासाला, आरंभ होतो जनतेतून. विकास प्रक्रियेचे पूर्वपद म्हणून एक त्रिसूत्री लक्षात ठेवणे आवश्यक आहे. शिक्षण, संघटन व अनुशासन. या तीन गोष्टींचा अभाव असेल तर एखादा देश नैसर्गिक साधनसंपत्तीच्या दृष्टीने कितीही संपन्न असो, विकासाच्या दृष्टीने तो निम्न-स्तरावरच राहणार आहे. आणि या गोष्टी जनतेत रुजल्या असतील तर युद्धात होरपळून निघालेला देशही फिनिक्स पक्षासारखा पुन्हा जिवंत होऊ शकतो. म्हणून विकासाच्या इतर बाबींवर भर देताना आद्यक्रम म्हणून या तीन गोष्टींवर भर दिला पाहिजे.

विकासाविषयीची स्पष्टता येण्यासाठी आणखी काही प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. कशाचा विकास ? कोणी केलेला विकास ? कोणासाठी केलेला विकास ? कशा पद्धतीचा विकास ?

या प्रश्नाच्या उत्तरादाखल विकासाची खालील वैशिष्ट्ये सांगता येतील: १. गरजेवर अधिष्ठित विकास २. अंतःस्फूर्त विकास ३. स्वावलंबी विकास ४. वातावरणातील समतोल राखणारा विकास ५. रचनेच्या बदलावर आधारित विकास.

१. माणसाच्या भौतिक आणि आध्यिभौतिक गरजा भागविण्याकडे विकास वळविला पाहिजे. जे शोषित व पिळले गेलेले आहेत व जे बहुसंख्य आहेत त्यांच्या मूळ गरजा भागविण्यापासून सुरुवात झाली पाहिजे. अभिव्यक्ती, निर्मितीक्षमता, समता आणि सहजीवन यांचे महत्त्व पटवून देण्यावर भर असला पाहिजे.

२. आपल्या भवितव्यावर आपलीच अधिसत्ता आहे अशा चैतन्याने प्रेरित झालेला समाज अंतःस्फूर्तीने विकासाकडे वळतो. त्याचे हे चैतन्य जागे केले पाहिजे.

३. समाजाने स्वतःच्या शक्तीवर, नैतिक व सांस्कृतिक गुणांवर उपलब्ध साधनांचा वापर करून विकास साधला पाहिजे.

४. नैसर्गिक, भौतिक साधनांचा विचारपूर्वक उपयोग करून वातावरणातला समतोल बिघडणार नाही याची दक्षता घेत विकासाची प्रक्रिया पुढे नेली पाहिजे.

५. ज्यांच्यावर प्रचलित रचनेचे दडपण आहे त्यांच्या स्वयंशासनास व सहभागी होण्याच्या प्रवृत्तीस जागृत केले पाहिजे.

वरील सर्व बाबी एकमेकांशी निगडीत असल्यामुळे विकासासाठी त्यांचा सुटासुटा विचार करून चालणार नाही. ती संकलित व एकत्र चालणारी प्रक्रिया आहे. शेवटी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की विकासाचा परिपाक निर्भीड, निर्भय, मुक्त समाजरचनेच्या निर्मितीत झाला पाहिजे.

लेखाच्या आरंभीच म्हटल्याप्रमाणे संपूर्ण क्रांतीच्या परिवर्तनात मूलभूत दृष्टिकोणातील परिवर्तन हेच आधी स्पष्ट झाले पाहिजे. एकदा ही स्पष्टता आली की अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत प्रत्यक्ष व्यावहारिक कार्यक्रम कोणते असावेत याची सविस्तर आखणी करणे हा तसा त्याला लागून येणारा गौण भाग ठरतो. कालस्थितीपरत्वे त्याच्यात कमी जास्त बदल होऊ शकतो. मात्र हा बदल मूळ गाभ्याला बगल देणारा असू नये याचे भान सोडता कामा नये.

* * *

सामाजिक परिवर्तन

सौ. कमल मुळे

१. समाजपरिवर्तन व समग्र क्रांती

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजरचनेतील बदल होय. समाजरचनेतील हे बदल समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील बदल असतात. त्यांपैकी मूल्ये, संस्था, संपत्ती व साधन-सामग्रीची वाटणी, व्यक्तीचा दर्जा व भूमिका, व्यक्तींची अभिरुची, या क्षेत्रांतील बदल हे सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख घटक आहेत व यांत परिवर्तन घडून आल्यामुळे समाज बदलतो. असे सर्व बदल परस्परावलंबी असल्याचे दिसून येते.

मूल्ये ही एका अर्थाने वर्तणुकीची नियमने आहेत. मूल्यांमध्ये बदल झाला की अभिवृत्ती बदलतात व म्हणून व्यक्तींच्या दर्जांवर व भूमिकांवर परिणाम घडून येतो. मूल्यात्मक परिवर्तन बदलणाऱ्या रूढी, नियमने, कायदे यांतून दिसून येते. या सर्व बदलांचा एकत्रित परिणाम म्हणून सामाजिक संस्था बदलतात व समाज बदलतो असे म्हटले जाते.

सामाजिक मूल्यांचा व्यक्तींच्या परस्पर संबंधावर परिणाम होत असल्यामुळे मूल्यात्मक परिवर्तन हे सामाजिक परिवर्तन घडवणारे असते. परंतु मूल्ये बदलण्यास फार वेळ लागतो. भारतामध्ये उद्योगीकरण व पाश्चात्त्यीकरण घडून येण्यापूर्वी असलेल्या मूल्यांमध्ये गेल्या दोन शतकांत बराच बदल झालेला आहे. आज धार्मिक व नैतिक दृष्टीने व्यक्तीचा दर्जा महत्त्वाचा न ठरता त्याऐवजी भौतिक दृष्टीने सांपत्तिक दर्जाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. मूल्यात्मक परिवर्तन घडवून आणून माणूस बदलणे हे एकंदरीत फार अवघड काम आहे.

सामाजिक परिवर्तनाचे आणखी एक महत्त्वाचे क्षेत्र सामाजिक संस्था आहेत. या संस्था व्यक्तींचे परस्परसंबंध, वर्तन व आंतरक्रिया यांचे नियमन करतात. नवीन कल्पनांचा स्वीकार करून व आधीच स्वीकृत वर्तनपद्धतीत थोडा बदल करून संस्थात्मक परिवर्तन घडून येते. असे झाल्यास व्यक्तींच्या मनोवृत्ती, अभिरुची, दर्जा व भूमिका यांत बदल होतात. समाज हा अशा प्रकारे सतत बदलत असतो.

सामाजिक परिवर्तन घडून येण्याकरता काही ठळक कारणे सांगता येतात. समाजव्यवस्थेमध्ये कालानुरूप बदल न झाल्यास दोष निर्माण होतात व ते दूर करण्याची गरज भासते. बदललेल्या परिस्थितीत निर्माण झालेल्या सामाजिक समस्या व त्यातून उद्‌भवणारे सामाजिक तणाव व संघर्ष दूर करण्यासाठी समाजसुधारक नवीन कल्पनांचा पुरस्कार करतात व शासनसंस्था कायदे तयार करून परिवर्तनाची प्रक्रिया सुरू करते. भारतीय समाजाच्या संदर्भात जातिव्यवस्था, अस्पृश्यता, अज्ञान, गलिच्छ सवयी व वस्त्या, गुन्हेगारी, बेकारी, भ्रष्टाचार इत्यादी कठीण समस्या हाताळण्यासाठी समाजपरिवर्तन घडवून आणणे आवश्यक झाले आहे.

जयप्रकाश नारायण यांची समग्र क्रांतीची संकल्पना या समस्यांशी संबंधित आहे. वस्तुतः समग्र क्रांतीची संकल्पना माणूस व समाज एका विशिष्ट दिशेने घडवण्याची कल्पना आहे. त्यात स्वप्नाळू आदर्शवाद नसून वास्तविक प्रश्न हाताळण्याची प्रयोगशील वृत्ती दिसून येते. या अर्थाने समग्र क्रांतीची संकल्पना एकीकडे देशकालपरिस्थितीनिरपेक्ष आहे तर दुसरीकडे तिला भारतीय संदर्भ प्राप्त झालेला आहे. १९७५ मध्ये एका पत्रकाराला समग्र क्रांतीची कल्पना समजावून देताना त्यांनी सांगितले की मूलभूत सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक व नैतिक बदल म्हणजे समग्र क्रांती होय, व हे सर्व बदल घडवून आणण्यासाठी व्यक्ती ही केंद्रबिंदू मानून काम करणे आवश्यक आहे. अशा क्रांतीमधून भारतीय माणूस व समाज बदलण्याची आपली तीव्र इच्छा ते व्यक्त करतात.

भारतीय संदर्भात दोन स्तरांवर क्रांती घडवून आणण्यावर जयप्रकाश भर देतात. सूक्ष्म दृष्टीने विचार करता मानव हा क्रांतीचा एकक आहे तर स्थूल-मानाने विचार करता खेडे हा क्रांतीचा एकक आहे. भारतातील बहुसंख्य लोक खेड्यांमधून राहतात व म्हणून खेड्यांचा विकास घडवून आणणे याला ते अग्रक्रम देतात. मुसहरी खंडातील त्यांचा ग्रामसुधारणेचा प्रयोग अनेक दृष्टचा उद्‌बोधक आहे. या ठिकाणी नक्सलवाद्यांच्या हिंसाचाराला आव्हान म्हणून

त्यांनी सर्वोदय पद्धतीने सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्या हे निदर्शनाला आले की समाजक्रांतीला वास्तविक अडथळा हा हितसंबंधी गट, राजकारणी व नोकरशाही यांच्याकडून येतो व त्यांची युती झालेली आहे. यामुळे खरा झगडा हा नक्सलवाद्यांशी नसून तो या हितसंबंधी गटांशी आहे. ते लिहितात की खेड्यांतून 'सामाजिक व आर्थिक विषमता, शोषण, अन्याय जुलूम हे दृश्य सर्वसाधारणपणे अत्यंत उग्र रूपाने दिसून येते. प्रत्येक खेड्यात दुर्योधनाचा दरबार आहे. द्रौपदीचे वस्त्रहरण होते व भीष्म, द्रोण, विदुर वगैरे गप्प बसतात. खेड्यांमधून अनेक प्रकारचे अन्याय होत राहतात परंतु कोणी त्याबद्दल वाचा फोडत नाही.'

व्यक्ती या एककाच्या आध्यात्मिक विकासावर भर देताना जयप्रकाश भौतिक विकासाचे महत्त्व मान्य करतात. भौतिक संपन्नतेशिवाय समता व स्वातंत्र्य हे आदर्श साध्य करता येणार नाहीत. परंतु एका मर्यादेपलिकडे आर्थिक विकासाला महत्त्व देणे इष्ट नाही असे ते मानतात. आधुनिक युगात सर्वच समाजांप्रमाणे भारतीय समाजही तंत्रज्ञान, विज्ञान व यंत्रांच्या साहाय्याने भौतिक सुखाच्या शोधात मग्न आहे. एकेकाळी मानव हा मानवाला गुलाम बनवत असे; आता असा काळ आला की यंत्र मानवाला गुलाम करीत आहे. यंत्रांनी मानवाची सेवा करावयास हवी. परंतु भौतिक सुखाच्या मागे लागलेल्या मानवाला याचे भान राहात नाही व म्हणून तो स्वतःचे महत्त्व, व्यक्तिमत्व व विशेष म्हणजे स्वातंत्र्य व आंतरिक विकासाला मुकला आहे. जयप्रकाश यांच्या मते हे मानवाचे पतन आहे किंवा मानवाच्या आंतरजगाचे हे 'दरिद्रीकरण' आहे. पश्चिमी देशांचा हवाला देऊन ते असे सांगतात की भौतिक प्रगती म्हणजे सामाजिक परिवर्तनाची खरी दिशा नव्हे. तेथे सूक्ष्मदर्शी व्यक्तींच्या हे लक्षात आले आहे की सर्व भौतिक सुखे मानवाच्या प्रगतीचा विचार करताना 'फिकी व सत्त्वहीन' वाटतात. भौतिक समृद्धी असूनही आध्यात्मिक विकास होत नाही व माणसाला आंतरिक समाधान मिळत नाही. समग्र क्रांतीमधून मानवाचा आध्यात्मिक विकास व्हावयास हवा; मानवाला त्याच्या आध्यात्मिक शक्तीमधून विज्ञानाच्या प्रगतिपथाची दिशा ठरवता येईल व विशेष म्हणजे, विज्ञानाने प्राप्त होणाऱ्या शक्तींवर नियंत्रण ठेवता येईल.

मानव स्वतःच एक एकक आहे. क्रांतीचा तोच एक केंद्रबिंदू मानून परिवर्तन घडवायला हवे. त्याच्या विकासाचा विचार करूनच सामाजिक व इतर सांस्कृतिक बदल अपेक्षित असायला हवेत. असे झाले नाही तर स्वतः एकक असलेल्या मानवाच्या मनात असंतोष निर्माण होईल. याला जयप्रकाश 'अना-

त्मीकरण ' अशी संज्ञा देतात. अनात्मीकरण हा समग्र क्रांतीच्या मार्गातील एक मोठा अडथळा होय.

समग्र क्रांती ही आजच्या युगाची गरज आहे असे जयप्रकाश मानतात. इतिहास असे दाखवतो की जेव्हा जेव्हा क्रांती घडून आली तेव्हा तेव्हा समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, मूलभूत गरजा भागवणे अशा स्वरूपाच्या आशादायक उद्दिष्टांचा घोष करण्यात आला, परंतु प्रत्यक्षात या सर्व उद्दिष्टांची पूर्तता कधीच झाली नाही. समग्र क्रांतीमध्ये या उद्दिष्टांची पूर्तता व्हावी असा प्रयत्न आहे. चांगल्या उद्दिष्टांकरता वापरली जाणारी साधनेही चांगलीच हवी असा जयप्रकाश आग्रह धरतात. त्यांची क्रांतीची कल्पना सातत्याने बदल घडवून आणण्यावर भर देते. समाजातील व्यक्तींना नैतिक व आध्यात्मिक मूल्ये जोपासण्याची शिकवण आवश्यक आहे. समाजाला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देऊन त्या आधारावर सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची कल्पना समग्र क्रांतीत आहे.

२. समग्र क्रांतीची दिशा

भारत स्वतंत्र होऊन ३५ वर्षे उलटली; परंतु आजही सामान्य नागरिकांच्या समस्या सुटलेल्या नाहीत. पंचवार्षिक योजना, सामुदायिक विकासाच्या योजना, शिक्षणप्रसार इत्यादी प्रयत्न करूनही भारताला सतत भेडसावणाऱ्या समस्यांची तीव्रता कमी न होता ती वाढतच आहे. दारिद्र्य, बेकारी, गुन्हेगारी, साठेबाजी, काळा बाजार, शिक्षणाचा अभाव, जातीय दंगली, भ्रष्टाचार, गलिच्छ वस्ती, अल्पसंख्याक, आदिवासी व दलित यांच्या समस्या, हुंडा पद्धत, अस्पृश्यता इत्यादी बाबतीत, स्वातंत्र्योत्तर काळात गेल्या ३५ वर्षांत काही फरक झालेला आढळत नाही. दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या सतत वाढत आहे. या सर्व पार्श्वभूमीवरून विचार करताना जयप्रकाशांना असे वाटते की लोकांच्या जागृतीतून जनशक्ती वाढेल व अशा जनशक्तीच्या प्रभावाने सामान्य जनतेच्या समस्या सोडवता येतील. म्हणून व्यक्तीचा विकास व व्यक्तीमधून समूहाचा विकास होईल अशी त्यांची अपेक्षा आहे. व्यक्ती व समाज यांचे घनिष्ठ संबंध व परस्परावलंबित्व लक्षात घेऊन व्यक्ती व समाज या दोन्हींचा परिपूर्ण बदल जयप्रकाशांना हवा आहे. समग्र क्रांती हे जनशक्तीचे आंदोलन आहे; प्रभावी जनशक्तीद्वारे ' सर्वोदय ' हे तिचे अंतिम ध्येय आहे. ते साध्य होईपर्यंत सतत क्रांतीची प्रक्रिया सुरू राहावी असे जयप्रकाश मानतात.

क्रांतीची दिशा व उद्दिष्टे स्पष्ट करताना जयप्रकाश व्यक्ती व समाज कसा घडवायचा याची कल्पना सांगतात. समाज घडवणाऱ्या व्यक्तीच्या अंत–

मनाची मुक्ती हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे व म्हणून व्यक्ती घडवणे हा क्रांतीचा प्रमुख हेतू आहे. समग्र क्रांतीमधून समाजात समता, बंधुत्व, स्वातंत्र्य, सुरक्षितता, प्रत्येकाला कामाची हमी, मानवतावादी दृष्टिकोण, वैयक्तिक व सामुदायिक नीतिमत्ता, किमान गरजा पूर्ण करणारी व्यवस्था, स्वावलंबन व निर्भयता यांना पाया मानून समाजरचना ही उद्दिष्टे साध्य व्हावीत अशी त्यांची इच्छा आहे.

३. समग्र क्रांतीचे मार्ग

वर उल्लेखलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जयप्रकाश समग्र क्रांतीचे मार्गही दाखवतात. यात व्यक्तीच्या अभिवृत्तींमध्येही बदल घडवण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी जयप्रकाश जनशक्ती हे प्रभावी माध्यम आहे असे सांगतात व जनशक्तीमध्ये युवाशक्ती व विशेष महत्त्वाची म्हणून छात्रशक्ती यावर विशेष भर देतात. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान मिळवणे फारसे महत्त्वाचे नाही. त्यांच्या मते शिक्षण हे समाजजीवनापासून अलिप्त राहू शकत नाही. म्हणून विद्यार्थ्यांनी आपल्या विद्यार्थीदशेतील काही काळ समाजसेवेसाठी द्यायला हवा. बिहार व गुजरात येथील आंदोलनात छात्रशक्ती किती प्रभावी असू शकते हे दिसून आले आहे. आंदोलन हा लोकशिक्षणाचा प्रभावी मार्ग आहे. छात्रशक्तीचा उपयोग करून आंदोलन उभे करता येते व अशा दडपणातून समाजपरिवर्तनाचे प्रयत्न करता येतात.

आंदोलन म्हणजे एक खुले विद्यापीठ आहे असे जयप्रकाश सांगतात. अशा विद्यापीठांतून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सामाजिक जीवन अभ्यासता येते व सामाजिक समस्या व त्यांचे स्वरूप यांचे आकलन होते. अभ्यासक्रमातून जे शिकता येत नाही ते आंदोलनातून शिकायला मिळते. यातून छात्रशक्ती व पर्यायाने युवाशक्ती जागृत व संघटित होते.

समग्र क्रांतीचा दुसरा मार्ग म्हणजे ग्रामीण भागांमधून समन्वित औद्योगिक विकास होय. योग्य तंत्रज्ञान, शेती व उद्योगधंदे यांचे योग्य मिश्रण करून भौतिक प्रगती, व्यक्तिस्वातंत्र्य कायम ठेवून व शोषण थांबवून, घडवून आणता येते असे जयप्रकाश मानतात. भौतिक उन्नती, आध्यात्मिक व नैतिक उन्नतीकरता पूरक आहे. उद्योगीकरणाचा विचार भारताच्या संदर्भात केला पाहिजे असे ते आवर्जून सांगतात. मानव व यंत्र यांच्या संबंधांमध्ये मानव हा यंत्राचा नियंत्रक असला पाहिजे, त्याने यंत्र व यांत्रिकीकरण यांचा दास होता कामा नये. याकरता शहरांची बेसुमार वाढ थांबवली पाहिजे. शहरांमधून होणाऱ्या औद्योगिक विकासाबरोबर ग्रामीण भागात शेतीला पूरक उद्योग उभे

करण्याकरता औद्योगिक विकास महामंडळ व शेती विकास महामंडळासारख्या स्वायत्त संस्थांची निर्मिती आवश्यक आहे असे जयप्रकाश मानतात.

याशिवाय, समाजातील हुंडापद्धती, भ्रष्टाचार, गुन्हेगारी यांसारख्या कठीण समस्यांची उकल करण्यासाठी स्वयंसेवकांची जागृत पथके, व लोक-समित्या व दक्षता समित्या यांसारख्या नागरिकांनी निर्माण केलेल्या स्वतंत्र संघटना यांचे अत्यंत महत्त्व आहे असे जयप्रकाश सांगतात. अशा स्वायत्त व स्वतंत्र संस्था समग्र क्रांतीकरता गतिवर्धक ठरतात. नागरिकांच्या स्वतंत्र संघटनांमुळे एकतर लोकशिक्षण होते व शिवाय शासनावर नियंत्रण ठेवता येते.

क्रांतीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मर्यादित प्रमाणात कायद्याचाही वापर जयप्रकाश मान्य करतात. कायद्यामुळे व्यक्तीच्या आचार–विचारांना एक चौकट प्राप्त होते. कायदे सुधारणा करण्याची दिशा दाखवतात, परंतु कायद्याला काही मर्यादा आहेत. व्यक्तींच्या अभिवृत्ती लक्षात घेऊन, त्यांच्या सवयी, रूढी व परंपराप्राप्त वर्तणुकीच्या पद्धतींमध्ये बदल करायला हवेत. नाहीतर कायदे करूनही उपयोग होत नाही. उदाहरण म्हणून, दारूबंदी, हुंडाबंदी, विवाहाच्या वयाची मर्यादा यांबाबतचे कायदे धाब्यावर बसवून लोक वागताना दिसतात. म्हणून केवळ कायदे तयार करून जनहित साधता येत नाही. जयप्रकाशांनी आदिम लोकांच्या स्थितीचे उदाहरण दिले आहे. कायद्याने आदिम लोकांना त्यांच्या जमिनींचे संरक्षण दिले असतानाही ती जमीन प्रत्यक्षात सावकाराच्या ताब्यात असते. आदिम माणूस धान्य पिकवतो पण ते सावकाराच्या ताब्यात जाते. त्याचे श्रम व त्याची जमीन, सावकार, अधिकारी व पोलीस यांच्या संगनमतामुळे त्याच्याकडून हिरावली जाते.

हुंडाबंदी, दारूबंदी, किमान वेतन, अस्पृश्यता निवारण, किमतींवर नियंत्रण, कमाल जमीनधारणा इत्यादी अनेक सामाजिक व आर्थिक स्वरूपाचे लोकहिताचे कायदे आजही अस्तित्वात आहेत. परंतु या कायद्यांमुळे या समस्या सुटल्या आहेत असे कोणी म्हणू शकत नाही. म्हणून कायद्याचा वापर हा फक्त मर्यादित प्रमाणात करता येतो. कायदे अमलात येण्यासाठी लोकमताचे दडपण असणे आवश्यक आहे व म्हणून जनजागृती व्हावयास हवी.

४. समग्र क्रांतीमधील अडथळे

क्रांतीची कल्पना स्पष्ट करताना क्रांतीमधील अडथळे कसे असतील याचे वर्णन जयप्रकाश करतात.

कोणतेही परिवर्तन यायचे असेल तर परिवर्तनाची प्रेरणा देणाऱ्या शक्तींची आवश्यकता असते. जयप्रकाशना सामान्यजनांतून परिवर्तन घडवून आणा–

वयाचे आहे. परंतु सामान्य व्यक्तींना प्रेरणा मिळाल्याशिवाय परिवर्तनाची गरज लक्षात येत नाही. परिवर्तन का व कसे हवे याचा नीट विचार करावा लागतो. अशी विचार करण्याची शक्ती असणारा श्रेष्ठींचा वर्ग हा असंघटित, विखुरलेला व उदासीन असल्यामुळे त्याला नेतृत्व स्वीकारता येत नाही. म्हणून समाजाभिमुख व गतिशील नेतृत्वाचा अभाव हा क्रांतीमधील एक अडसर आहे.

जे नेतृत्व क्रियाशील आहे ते केवळ सत्तालोलुप व राजकीय आहे. राजकारण करताना समाजहिताचे उद्दिष्ट समोर ठेवून काम करण्याऐवजी आपला स्वार्थ व सत्ताप्राप्तीसाठी हे नेतृत्व सर्व प्रकारच्या तडजोडी करणारे व भ्रष्ट बनले आहे. याचा एकूण परिणाम म्हणून समाजातील वरपासून खालपर्यंत सर्व स्तरांमध्ये सत्तास्थानी असणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांमध्ये 'भ्रष्टाचार' हा 'शिष्टाचार' बनला आहे.

राजकीय पक्षांची सत्तेसाठी अखंड स्पर्धा चालू असते. लोकशाहीचा स्वीकार केल्यामुळे निवडणुका अपरिहार्य ठरतात. सत्ता मिळवण्यासाठी व ती टिकविण्यासाठीही मतदारांची मर्जी संपादन करावी लागते. म्हणून राजकीय पक्षाचा पहिला व मगळचात महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे, ज्या मतदारांमुळे निवडणुकीत यश मिळते त्यांच्या शक्य तितक्या मागण्या मान्य करण्याचा प्रयत्न होय. मग त्यासाठी समाजातील इतर घटकांना दुखावले तरी चालते. सत्तेवर येण्यासाठी ज्या गटाचा उपयोग होतो अशा गटांची सत्ताधाऱ्यांकडून खुशामत चालते व सामाजिक गटांमध्ये कलह निर्माण होतो. सध्या असे दिसून येते की एका टोकाला सुशिक्षित मतदारांची उदासीनता आहे तेर दुसऱ्या टोकाला जात, संप्रदाय, धर्म इत्यादी आधारांवर तयार झालेल्या गटांची एकगठ्ठा मते देण्याची प्रवृत्ती व त्यातून निर्माण होणारा मतांचा राजकीय व्यापार सतत चालू आहे. या सर्वांचा एकूण परिणाम असा झाला आहे की सत्तेवर येऊनही राजकीय पक्ष जनहिताकडे दुर्लक्ष करतात.

भारतीय समाजात आर्थिक व सामाजिक दृष्टीने दुर्बल असलेल्यांची संख्या फार मोठी आहे. अशा लोकांसाठी सुधारणा घडवून आणणे आवश्यक असूनही केवळ सत्तेसाठीच नेतृत्व स्वीकारल्यामुळे सामाजिक व आर्थिक दृष्टीने दुर्बल असलेल्यांच्या हितासाठी कार्यक्रम राबवता येत नाहीत. अज्ञान, जातीयवाद व स्वार्थी व सत्तालोलुप नेतृत्व या सर्वांचा परिणाम म्हणून असे दिसून येते की सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणारे गट निवडणुकीत संघटितपणे मतदान करतात व म्हणून राजकीय दृष्ट्या बलवान वाटतात.

जयप्रकाशांना असे वाटते की लोकशिक्षणातून क्रांती घडून येईल. आजची व्यवस्था त्यांच्या दृष्टीने कुचकामाची आहे. शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे यांमधून शिक्षण घेऊन बाहेर पडणारे विद्यार्थी समाजजीवनाच्या बाबतीत उदासीन असलेले आढळतात. शिक्षण संस्थांचे चालक बहुतेककरून शिक्षणतज्ञ नसतात. एकप्रकारे फायदेशीर उद्योग म्हणून ते शिक्षण संस्था चालवतात. तसेच एक सत्तास्थान म्हणून ते संस्थांचा उपयोग करून गटबाजी व राजकारण-ही करतात. त्यामुळे केवळ शिक्षणाचे उद्दिष्ट समोर ठेवून शिक्षण संस्था चालवल्याचे क्वचितच दिसून येते. विशिष्ट जात, पंथ, धर्म, राजकीय पक्ष, हितसंबंध यांचे प्रतिनिधित्व शिक्षण संस्था करतात. विद्यार्थी हा अध्ययन करण्यापेक्षा परीक्षार्थी म्हणून क्रियाशील असतो. ज्ञानप्राप्ती हे उद्दिष्ट नसते. केवळ पदव्या व प्रशस्तिपत्रके मिळविणे हे उद्दिष्ट असते व याकरता सर्व मार्ग समर्थनीय आहेत असे परीक्षार्थी समजतो. शिक्षणक्षेत्रामधून अभ्यासू व गुणवान विद्यार्थ्यांपेक्षा आक्रमक वृत्तीच्या गुंड विद्यार्थ्यांना अधिक मान असतो व तो सर्व कार्यक्रमांतून पुढाकार घेत असतो. प्रचलित शिक्षणपद्धतीचे हे दोष आहेत.

शिक्षणक्षेत्रात शिक्षकाला महत्त्वाचे स्थान असले पाहिजे असे जयप्रकाश मानतात. शिक्षकाने सतत अध्ययन व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. संपत्ती व पद यांचा विचार न करता त्याने शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करावा. शिक्षकाच्या आत्मसंतुष्ट वृत्तीवर ते टीका करतात. शिक्षकाला विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवण्याचे काम करता येते म्हणून समाजव्यवस्थेमध्ये शिक्षकाचा दर्जा फार मानाचा आहे असे जयप्रकाश मानतात.

आपल्या समग्र क्रांतीच्या साधनांमध्ये युवाशक्ती व छात्रशक्ती यांच्यावर जयप्रकाश भर देतात. याकरता १९७७ साली त्यांनी छात्र–युवा संघर्ष वाहिनी ही संघटना स्थापन केली. या संघटनेने सत्तेच्या राजकारणापासून दूर असावे व समग्र क्रांतीच्या कार्याला वाहून घ्यावे ही जयप्रकाशांची भूमिका होती. या संघटनेने समाजातील कठीण समस्या सोडवण्याचे व्रत घ्यावे अशी त्यांची इच्छा होती. परंतु हे काम ज्यांनी हाती घ्यावयाचे ते छात्र हे निराश, निरुत्साही व भविष्यकालाविषयी उदासीन आहेत. वैफल्यग्रस्त विद्यार्थ्यांचे आव्हान स्वीकारण्यासाठी शिक्षणक्षेत्रात मूलभूत परिवर्तन व्हावयास हवे. १९७७ नंतर स्वतः जयप्रकाश हे कबूल करतात की छात्र–शक्तीला रचनात्मक कार्यात गुंतवण्यात त्यांना अपयश आले आहे.

जयप्रकाश नारायण यांच्या समग्र क्रांतीच्या संकल्पनेचे विश्लेषण करताना असे दिसून येते की त्यांच्या विचारांमागे ग्रामस्वराज्य, सर्वोदय, अहिंसा, तसेच

मानवाची भौतिक व आध्यात्मिक उन्नती यासारख्या उद्दिष्टांची कल्पना आहे. गांधी व विनोबा यांचे तत्त्वज्ञान ही त्यांच्या क्रांतीच्या कल्पनेची मूळ प्रेरणा आहे. महात्मा गांधींनी सात जीवनसूत्रे सांगितली आहेत–

नीतिविना नको धंदा
चारित्र्याविण शिक्षण
विवेकाविना नको भोग
मूल्यशून्य राजकारण
मानव्याविन नको विज्ञान
श्रमावीण नको धन
त्यागाविना नको पूजा...

जयप्रकाशांनाही क्रांतीच्या प्रक्रियेत ही सूत्रे स्वीकारून परिवर्तन अपेक्षित आहे. समग्र क्रांतीच्या प्रक्रियेत व्यावहारिक व आदर्शवादी, भौतिक व आध्यात्मिक, लोकशाही व अराजकता, अहिंसक बलप्रयोग, समाजनिष्ठा व व्यक्तिनिष्ठा यांचे एक विचित्र मिश्रण दिसून येते. व्यवहारात असे परस्परविरोधी मार्ग व उद्दिष्टे असलेली क्रांतीची प्रक्रिया कशी सुरू करावयाची हे सांगणे अवघड काम आहे.

समग्र क्रांतीमधून समाजाची भौतिक व आध्यात्मिक प्रगती होणे हे अपेक्षित आहे. केवळ विकास योजना आखून उद्योगीकरण व उत्पादन वाढ करून समाजातील खालच्या स्तरांवर असलेल्या सामाजिक व आर्थिक दृष्टीने दुर्बल लोकांची स्थिती सुधारणार नाही. म्हणून सामाजिक परिवर्तनाची गरज आहे व त्यासाठी तळापासून, व्यक्तींच्या अभिवृत्ती समाजाला पोषक होतील अशा पद्धतीच्या निर्माण करून, सत्ता सुशिक्षित व पात्र अशा व्यक्तींच्या हाती जाईल याची काळजी घ्यायला हवी. असे करण्याकरता एका अर्थाने समाजाची पुनर्रचना करणे भाग आहे. ज्यांचा क्रांतीच्या आदर्शांवर विश्वास आहे असे कार्यकर्ते तयार करायला हवेत. समाजाच्या तळाशी निःस्वार्थी व समर्पित कार्यकर्ते आणि सत्तास्थानांवर जनहित समोर ठेवून उदासीनता झटकून टाकून काम करणाऱ्या सुशिक्षित व्यक्ती, अशा दुहेरी प्रयत्नांतून समाजात आदर्श वाटावी अशी व्यवस्था प्रस्थापित होऊ शकेल व समग्र क्रांती फलद्रूप होईल.

* * *

समग्र क्रांतीचा राजकीय आशय

सुनील दाते

महात्मा गांधींच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून १९२१ साली जयप्रकाश नारायण, असहकाराच्या चळवळीत सामील झाले आणि येथून जेपींच्या सार्वजनिक जीवनाला प्रारंभ झाला. येथून पुढे जेपींनी केलेला प्रवास म्हणजे प्रचलित विचारधारांच्या माध्यमातून मानवी जीवनाच्या अंतिम उद्दिष्टांचा, ध्येयाचा व यथार्थतेचा वेध घेण्याचा जबरदस्त प्रयत्न होता. स्वातंत्र्य चळवळीकडून, साम्यवाद, समाजवाद, सर्वोदय या मार्गाने अखेरीस जेपी. समग्र क्रांतीच्या कल्पनेवर स्थिर झालेले दिसतात. मानवी जीवनातील गुंतागुंत, विविध अंगे व त्यांचे परस्परावलंबन हा समग्र क्रान्तीच्या संकल्पनेचा आधार आहे. ही एक अत्यंत व्यापक अशा स्वरूपाची संकल्पना आहे. या संदर्भात स्पष्टीकरण देताना जेपी म्हणतात की, 'क्रान्तिकारी चळवळीचा उद्देश आरंभी असलेल्या उद्देशाइतका मर्यादित न ठेवता, क्रान्तिकारी वातावरणाचा पूर्ण फायदा घेऊन त्याची व्याप्ती मानवी जीवनाच्या जास्तीत जास्त अंगांना स्पर्श करील इतकी वाढवणे आवश्यक असते. गांधीजींच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीचा, अस्पृश्यता, स्त्रीशिक्षण, अंधश्रद्धा इत्यादी गोष्टींवर जबरदस्त परिणाम झालेला होता.' 'तद्वतच' – बिहार चळवळीचा उल्लेख करून ते पुढे म्हणतात की- 'या संदर्भात माझी सूचना आहे की ही चळवळ केवळ विद्यार्थ्यांनी पुढे केलेल्या काही मागण्या किंवा काही राजकीय बदलापुरती मर्यादित न राहता मानवी संबंध व सामाजिक संघटना यांना स्पर्श करील इतकी व्यापक होणे आवश्यक आहे.' या अशा सर्वस्पर्शी क्रान्तीची कल्पना जेपींनी सप्तक्रान्तीच्या स्वरूपात स्पष्ट केलेली असून, राजकीय क्षेत्रातील परिवर्तन हा त्याचा एक अत्यंत महत्त्वपूर्ण भाग आहे.

वैचारिक अधिष्ठान

'मानवी स्वातंत्र्य' हे सर्वात आधारभूत मूल्य मानूनच जेपींनी आयुष्यभर त्याच्या प्रस्थापनेचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने 'स्वातंत्र्य' ही जीवनाची आमवती बनली आहे व अन्न किंवा तत्सम भौतिक गरजा, सत्ता, समृद्धी किंवा राज्याचे हित यांपैकी कोणत्याही कारणासाठी स्वातंत्र्याचा त्याग करण्याची त्यांची तयारी नाही. स्वातंत्र्याच्या प्रस्थापनेच्या प्रयत्नांत त्यांना जसजशी अर्थाची व्यापकता जाणवू लागली तसेतसे ते एका विचारसरणीकडून दुसऱ्या विचारसरणीकडे आकृष्ट होत गेले. मार्क्सवादाने भारतीय स्वातंत्र्याच्या संबंधात त्यांना नवीन दृष्टी दिली. केवळ परकीय सत्तेच्या जोखडाखालून मुक्तता झाल्यामुळे खरे स्वातंत्र्य मिळणार नाही तर देशासमोर ज्या अनंत समस्या आहेत, उदा० दारिद्र्य, उपासमार, निरक्षरता, सामाजिक विषमता इत्यादी– त्यांची सोडवणूक होणे आवश्यक आहे व यांतून मिळणारे स्वातंत्र्य खरे स्वातंत्र्य असेल या भूमिकेतून जेपी मार्क्सवादाकडे वळले. वैचारिक स्तरावर राज्याच्या विलयाची कल्पनाही त्यांच्या दृष्टीने व मानवी स्वातंत्र्याच्या दृष्टीने अत्यंत आदर्श अवस्था आहे असे त्यांचे मत बनले. राज्यविहीन समाजात खऱ्या अर्थाने व्यक्ती, स्वातंत्र्याचा उपभोग घेऊ शकेल व हा खरा स्वतंत्र समाज असेल ही कल्पना त्यांनी स्वीकारली.

समाजवादाकडे

परंतु काही वर्षातच त्यांचा मार्क्सवादाबाबत भ्रमनिरास झाला रशियात चाललेली सत्तास्पर्धा, त्यातून राज्ययंत्रणेची दिवसेंदिवस घट्ट होत जाणारी पकड, यांतून व्यक्तिस्वातंत्र्याची होत असलेली गळचेपी, स्वातंत्र्याचा विचार करण्याचे आश्वासन देणारी विचारसरणी असूनही भारतीय स्वातंत्र्य चळवळीपासून फटकून राहण्याचे भारतीय साम्यवाद्यांचे धोरण, यामुळे जेपी हळूहळू मार्क्सवादापासून दूर जाऊ लागले. परंतु स्वातंत्र्याच्या संदर्भात त्यांना जी व्यापक दृष्टी मिळाली त्याचा त्यांनी पुढे कायम पुरस्कार केल्याचे दिसते.

'साध्याबरोबर साधनांचाही विचार करणे जरूर आहे' हा गांधीजींचा विचार त्यांना पटला व साधनशुचितेचे तत्त्व मान्य करून सामाजिक विषमता, दैन्य, दारिद्र्य दूर करण्याचा मार्ग म्हणून जेपींनी समाजवादाची कास धरली. समाजवादी विचार व पद्धती जेपींना भारतीय संस्कृती व परंपरेशी सुसंगत वाटली व स्वातंत्र्य, लोकशाही व समाजवादावर निष्ठा ठेवणाऱ्यांची संघटना उभी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस पक्षातच

समाजवादी गटाची निर्मिती करून व स्वातंत्र्योत्तर काळात समाजवादी पक्षाची स्थापना करून जेपींनी समाजवादी चळवळ भारतात रूढ करण्यात मदत केली.

सर्वोदयाचा पुरस्कार

इतर समाजवादी देशांचे अनुभव, राजकीय पक्षपद्धतीतील दोष व त्यावर असणाऱ्या मर्यादा, शासनव्यवस्थेवरील मर्यादा, भारतातील परिस्थिती या सर्वच गोष्टींचा विचार केल्यानंतर आपल्या ध्येयप्राप्तीमाठी इतर काही पर्याय आहेत का याचा शोध घेण्याचा प्रयत्न जेपींनी केला. त्यांच्या मते ज्याप्रमाणे साम्यवादाला युरोपात यश मिळाले नाही, त्याचप्रमाणे समाजवादालाही यश मिळाले नाही याला अपवाद केवळ स्वीडनसारख्या स्कँडिनेव्हियन देशाचा. या देशात मर्यादित लोकसंख्या व शासनबाह्य संस्था, उदा० सहकारी संस्थांच्या पुढाकारामुळे समाजवादी विचाराला यश मिळाले. परंतु सर्वसाधारणतः समाजवादी विचार व पद्धतींची पिछेहाटच झाल्याचे त्यांचे मत आहे. स्वाभाविकपणेच ज्या गोष्टींचा इतरत्र अनुभव फारसा उपकारक नसेल तर आपण त्यांचा स्वीकार करताना पूर्ण विचारांतीच करणे श्रेयस्कर ठरेल. हा विचार करून जेपी समाजवादाला भारतीय परिस्थितीत काही पर्याय आहे का याचा विचार करू लागले व येथून ते सर्वोदयाकडे वळले.

पौर्वात्य देशांच्या व विशेषतः भारतासंबंधी विचार करताना जेपींना आपली ध्येये गाठण्याच्या प्रयत्नात काही नवीन पद्धती शोधण्याची गरज वाटली. कारण त्यांच्या मते युरोपियन किंवा पाश्चात्य विचार व व्यवस्थेचा (मार्क्सवादी किंवा समाजवादी) आधार औद्योगिक समाज आहे. परंतु आशिया खंडातील समाज हा प्रामुख्याने ग्रामीण व शेतीप्रधान आहे. युरोपियन देशांइतक्या प्रमाणात आशियाई समाज व्यवस्थेत भांडवलशाहीचा विकास झालेला नाही म्हणून आशियाई समाजवाद्यांना स्वतःच्या अनुभवातूनच आपली कार्यपद्धती उभी करावी लागेल. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व शांतता या उद्दिष्टांप्रत जाण्यासाठी इतर कोणत्याही विचारांपेक्षा समाजवादाचे तत्त्वज्ञानच आपल्याला अधिक साहाय्यभूत आहे असा त्यांचा विश्वास होता. परंतु आशियाई संदर्भात समाजवादाला सर्वोदयाची जोड दिली तरच अंतिम ध्येय प्राप्ती होईल असे अनुभवांती त्यांचे मत बनलेले होते. आणि म्हणूनच मार्क्सवादी विचाराच्या आधारे ध्येयाप्रत जाऊ इच्छिणारे जेपी सर्वोदयावर येऊन स्थिरावले.

लोकशाही : एक नैतिक विचार

वर स्पष्ट केलेल्या उद्दिष्टप्राप्तीच्या व सर्वोदयी मार्गाच्या संदर्भातच जेपी

लोकशाहीचा पुरस्कार करतात. त्यांच्या मते स्वातंत्र्य हा लोकशाहीचा आत्मा आहे. परंतु केवळ काही राजकीय अधिकार मिळविणे किंवा राजकीय कारभारात सहभागी होण्याची संधी मिळणे एवढाच मर्यादित आशय लोकशाहीला अभिप्रेत नाही. ही केवळ राजकीय संकल्पना नाही. तर मानवी जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारा हा विचार आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून, प्रामुख्याने पहिल्या महायुद्धानंतर, जेपींच्या मते लोकशाही कल्पना आर्थिक व सामाजिक न्यायाशी निगडित होऊ पाहाते आहे. पूर्वी आर्थिक व राजकीय असा भेद केला जात असे तो हळूहळू अस्तंगत होतो आहे. लोकशाही राज्यात आर्थिक, राजकीय, सामाजिक सर्वच क्षेत्रांत लोकशाही तत्त्वांचे महत्त्व मान्य करावे लागते. थोडक्यात म्हणजे जेपी लोकशाहीचा अत्यंत व्यापक अर्थ घेऊन तो केवळ एक शासनप्रकार न मानता एक जीवनमार्ग (way of life) म्हणूनच मान्य करतात व या संदर्भात प्रत्यक्षात लोकशाही व्यवस्था स्थापन करण्याच्या दृष्टीने व्यक्ती, समाज, राजकारण, राजकीय यंत्रणा या बाबतचे विचार व्यक्त करतात.

लोकशाहीचा प्रश्न जेपींच्या मते मूलतः नैतिक स्वरूपाचा आहे. राजकीय पक्ष, विधिमंडळ, निर्वाचन व्यवस्था, राज्यघटना या गोष्टी लोकशाही राज्यासाठी आवश्यक आहेतच परंतु केवळ या संस्था किंवा यंत्रणांमुळे लोकशाही येणार नाही. यासाठी व्यक्तीची, हे जीवनमूल्य स्वीकारण्याची मानसिक तयारी असणे आवश्यक आहे. सत्याबद्दल आस्था, हिंसेला विरोध किंवा हिंसेबाबत घृणा स्वातंत्र्यप्रेम, जुलूम जबरदस्ती व दडपशाहीच्या विरोधात उभे राहण्याचे धैर्य, सहकार्याची भावना, व्यापक समाजहितापुढे स्वहिताला गौणत्व देण्याची तयारी, सहिष्णुता, परमताचा आदर, समतेच्या तत्त्वावर विश्वास व मानवी जीवन व स्वभाव शिक्षणक्षम असल्याबद्दल विश्वास इत्यादी गुणांचा उल्लेख करून जेपी म्हणतात की हे गुण व्यक्तींच्या मते जन्मतःच असतात असे नाही तर व्यक्तीला या गुणांबाबत प्रशिक्षित करणे आवश्यक असते. या प्रशिक्षणाला अनुकूल वातावरण असणे आवश्यक असते. समाजातील परिस्थितीच अशी असावी की ज्यायोगे हे गुणसंवर्धन शक्य होईल. समाजाची मूल्यधारणा कुटुंबसंस्था, शैक्षणिक संस्था, नेते, लोकमत बनवणारी साधने यांद्वारे लोकशाहीला सुसंगत, अनुकूल व नैतिकदृष्ट्या सुदृढ असे वातावरण निर्माण करणे शक्य आहे. या कार्याचे स्वरूप राजकीय नसून शैक्षणिक आहे याचा जेपी आवर्जून उल्लेख करतात.

राजकीय क्रांतीच्या संदर्भात लोकशाहीचे महत्त्व स्पष्ट केल्यानंतर खऱ्या अर्थाने लोकशाही समाजव्यवस्था निर्मितीचा विचार स्पष्ट करताना जेपी

मानवी मनाच्या व प्रचलित व्यवस्थेमुळे त्यात निर्माण होणाऱ्या काही अप-प्रवृत्तींचा उल्लेख करतात. त्यांच्या मते सद्यःपरिस्थितीत मानवी जीवनावर भौतिकतेचा पगडा मोठ्या प्रमाणावर आहे. भौतिक गरजांनाच महत्त्वाचे स्थान प्राप्त होत आहे. त्यामुळे वैचारिक क्षेत्रातही मानवी जीवनाच्या भौतिक अंगाचेच महत्त्व वाढत आहे. कोणतीही विचारसरणी असो– भांडवलशाही, साम्यवादी किंवा समाजवादी–मानवाच्या दैनंदिन गरजा हाच त्यांचा केंद्रबिंदू आहे. आणि या गरजा प्रामुख्याने भौतिक स्वरूपाच्याच असतात. हा एकांगी विचार आहे. मनुष्य अधिक भौतिकवादी बनत गेला म्हणजे त्याच्या भौतिक सुखाच्या कल्पना व अपेक्षा वाढत जातात. तो अधिक भोगवादी बनतो. व यातून मानवी प्रश्न अधिक उग्र स्वरूप धारण करतात. मानवी गरजा या अमर्याद आहेत व त्यांची पूर्तता करण्याची आपली क्षमता मर्यादित आहे व यातूनच मानवी जीवनातील दुःखे निर्माण होतात.

केवळ भोगवादी विचारांवर आधारित किंवा केवळ भौतिक गरजांची पूर्तता करण्याच्या प्रयत्नांत मशगूल असणाऱ्या समाजात स्वातंत्र्य, समता या मूल्यांवर आधारित अशी लोकशाही व्यवस्था स्थापन होऊ शकत नाही. हा दोन जीवनमूल्यांमधला संघर्ष आहे. भौतिक गरजांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक वाटणाऱ्या वस्तू मिळविण्याचा प्रयत्न एकीकडे, तर मानवी जीवन शांत, समृद्ध व प्रगत बनविण्यासाठी आवश्यक ते स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न दुसरीकडे, या संघर्षात लोकशाही सापडलेली आहे. यातून कोणता पर्याय निवडायचा ते एखादी पार्लमेंटसारखी संस्थाही ठरवू शकेल. परंतु राजकीय नेत्यांनीच आपल्या व्यक्तिगत जीवनावरून जे उदाहरण घालून दिलेले असेल ते महत्त्वाचे ठरेल.

आज लोकशाही व्यवस्थेसमोरील सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे, खऱ्या अर्थाने व्यक्तीला स्वातंत्र्य कसे उपभोगता येईल हीच आहे व त्यातही प्रामुख्याने, नवोदित, मागासलेल्या आफ्रो–आशियाई देशांत तर ही समस्या फारच बिकट होऊन बसलेली आहे. लोकशाही व्यवस्था निर्माण करून व्यक्तींना स्वातंत्र्य दिले तर स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास अनुकूल परिस्थिती नसल्यामुळे, योग्य ते शिक्षण नसल्यामुळे, एकतर व्यक्ती उदासीन असते किंवा स्वातंत्र्याची संकल्पनाच स्पष्ट झालेली नसल्यामुळे मिळालेल्या संधीचा गैरफायदा घेते, दुरुपयोग करते. परिणामतः राज्ययंत्रणेचा हस्तक्षेप अपरिहार्य ठरतो व जेव्हा जेव्हा राजकीय यंत्रणेचा हस्तक्षेप वाढतो, तेव्हा तेव्हा व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतो हा अनुभव आहे. म्हणजेच व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित ठेवून त्याच्या गैरवापरास कसा प्रतिबंध करायचा हा लोकशाहीसमोरचा महत्त्वाचा

प्रश्न आहे. याचे उत्तर जेपींच्या मते राजकीय नसून नैतिक स्वरूपाच्या उपायांमधून मिळू शकेल.

स्वातंत्र्यावरोबरच जबाबदारीची जाणीव होणे आवश्यक आहे. स्वार्था-पोटी व्यक्ती आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा गैरफायदा घेतात. दुसऱ्यांच्या न्याय्य मागण्याही डावलतात, दुर्लक्ष करतात व सर्व आपले जीवन अधिक सुख-कारक, भौतिकदृष्टचा समृद्ध व्हावे म्हणून धडपड करतात. यातून भोगवादी दृष्टिकोणाचा जबरदस्त पगडा स्पष्ट होतो. परिणामतः अशा स्वार्थी लोकांमध्ये आपसात संघर्ष होण्याची शक्यता निर्माण होते व या ठिकाणी राज्याचा हस्तक्षेप होतो. अशा हस्तक्षेपामुळेच राज्यसंस्थेचे महत्त्व वाढत जाते व स्वातंत्र्याचा संकोच होऊन लोकशाहीलाच धोका निर्माण होतो. म्हणूनच गरजांवर स्वयंनियंत्रण, सामुदायिक हिताला प्राधान्य, इत्यादींचे शिक्षण व्यक्तीला देणे आवश्यक आहे व हे लोकशाही हा जीवनमार्ग म्हणून स्वीकार-ल्यासच शक्य होईल अन्यथा नाही. म्हणून यादृष्टीने देखील जेपी लोक-शाहीचा प्रश्न हा प्रामुख्याने नैतिक प्रश्न आहे असे मानतात.

या संदर्भात पुढे जेपी राज्यव्यवस्था व पद्धतींचा विचार करतात. प्रचलित राज्यव्यवस्था, जी प्रामुख्याने पाश्चात्त्य देशांमध्ये स्थिर झालेली आहे, ही केवळ व्यक्तिसमुच्चय करणारी संघटना बनलेली आहे. राजकीय व्यवस्था प्रामुख्याने व्यक्तिजीवनाच्या राजकीय अंगांशी संबंधित असली तरी देखील समाजातील इतर व्यवस्था व संघटनांपासून ती पूर्णतः वेगळी असू शकत नाही. संपूर्ण सामाजिक व्यवस्थेपासून राज्यसंस्था वेगळी काढणे, त्याचेच अवास्तव अवडंबर, स्तोम माजवणे हे मानवी स्वभाव व सामाजिक संघट-नांच्या तत्त्वाशी विसंगत आहे. याशिवाय अनेक गोष्टींबाबत राज्याच्या सत्तेवर काही मर्यादा आहेतच. व्यक्तीला आवश्यक असणाऱ्या गोष्टी केवळ राज्यसंस्थेवर विसंबून राहून प्राप्त करता येत नाहीत. केवळ कायदे करून परिवर्तन घडवून आणता येत नाही. व्यक्तीमध्ये गुणसंवर्धन करता येत नाही. यासाठी राज्यसंस्थेच्या कक्षेबाहेरील संस्थासंघटनांचे साहाय्य घ्यावे लागते. अशा परिस्थितीत लोकशाही व्यवस्थाच साहाय्यभूत ठरू शकते. ही लोकशाही खऱ्या अर्थाने लोकांना सहभागी करून घेणारी लोकशाही असावी. पाश्चात्त्य लोकशाही म्हणजे निर्वाचित अल्पजनांची सत्ता आहे. या पद्धतीत लोकांना शासनात सहभागी होण्याची खरी संधी प्राप्त होत नाही. खऱ्या लोकशाही व्यवस्थेत तशी संधी प्राप्त होत असते. लोक जितक्या जास्तीत जास्त प्रमाणात राजकीय व्यवस्थेत सहभागी होतील त्या प्रमाणात सर्वंकष, हुकूमशाही, एकाधिकारशाहीची पिछेहाट होऊन वास्तविक लोकशाही

व्यवस्थेची स्थापना होईल असा दृढ विश्वास जेपींना वाटतो. मानवी मूल्यांची जपणूक करणारी राजकीय व्यवस्था जेपींना अभिप्रेत आहे व ही व्यवस्था लोकशाही व्यवस्थेतूनच साकार होईल ही त्यांची भूमिका आहे. त्यांच्या मते राजकीय क्रांती म्हणजे केवळ निवडणुकांच्या पद्धतीत बदल किंवा पक्ष पद्धतीच्या स्वरूपात बदल एवढेच नव्हे तर त्यांत आपल्या उद्दिष्टांप्रत पोहोचण्याच्या प्रयत्नांना सुसंगत व्यवस्था निर्माण करणे हे अभिप्रेत असते. हे कार्य केवळ राजकीय स्वरूपाचे नसल्यामुळे केवळ राजकीय संस्थात्मक बदलातून ते साध्य होणार नाही. यासाठी मनुष्याच्या आचार, विचार, संवयी, दृष्टिकोण, त्याच्या अवतीभोवतीची परिस्थिती, त्यातून निर्माण होणारे दोष या गोष्टींमध्ये बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे. असा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात व सभोवतालच्या वातावरणात बदल घडवून आणण्याचे कार्य संपूर्ण क्रांतीचे अंतिम लक्ष्य आहे व त्या दिशेने केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून राजकीय परिवर्तन आवश्यक आहे.

या तत्त्वाधारावर जेपींनी भारतीय संदर्भात लोकशाही, संसदीय पद्धती यांच्यावरील मर्यादांची चर्चा करून खऱ्या अर्थाने लोकशाही समाजवादी रचनेच्या स्थापनेसाठी कोणते राजकीय परिवर्तन घडवून आणणे आवश्यक आहे याबाबत विवेचन केलेले आहे.

भारतातील सद्यःस्थितीचा विचार

स्वातंत्र्योत्तर कालात भारतीयांनी लोकशाही समाजवाद ही मूल्ये स्वीकारून, त्यानुसार राज्ययंत्रणा उभी करण्याचा प्रयत्न केला. परंतु जेपींच्या मते स्वातंत्र्य, समता, बंधुता व शांतता या ध्येयाप्रत जाण्यात या पद्धतीचा फारच मर्यादित उपयोग होऊ शकेल. कारण आपण ज्या गोष्टी स्वीकारल्या त्या पाश्चात्त्यांच्या अनुभवातून साकारलेल्या व तेथे वाढलेल्या आहेत. आपल्या समोर पाश्चात्त्यांचा आदर्श आहे व म्हणूनच त्यांचे केवळ अंधानुकरण करून आपले प्रश्न सुटणार नाहीत. आर्थिक मागासलेपणा, जातिव्यवस्थेसारखी शतकानुशतके चालत आलेली व श्रेणीबद्धतेचा पुरस्कार करणारी व अखेरीस विषमतेकडे नेणारी समाजरचना, लोकशाही संस्था व परंपरांचा अभाव, या कारणांमुळे भारतात (सर्वच नवोदित आशियायी आफ्रिकी देशांत) लोकशाहीला प्रतिकूल असेच वातावरण आढळते. याव्यतिरिक्त वास्तवापासून दूर असलेली पक्षपद्धती, राज्ययंत्रणेवर दिवसेंदिवस अधिकाधिक अवलंबून राहण्याची वृत्ती व यांतून निर्माण होणारी असहायता, आपल्या पूर्वपरंपरांचा पडलेला विसर यांमुळे खऱ्या अर्थाने लोकशाही विचार भारतात रुजलेलाच

नाही. जे दिसते ते केवळ भासमय आहे, हा लोकशाहीचा आभास आहे. म्हणून खऱ्या लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी यांतील दोषांचा गंभीरपणे विचार करून ते दोष निवारण्याचे प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. संपूर्ण क्रांतीच्या राजकीय अंगांचा विचार करताना जेपींना राजकीय व्यवस्थेमधील आमूलाग्र परिवर्तन अपेक्षित आहे. केवळ तात्कालिक काही सुधारणांवर त्यांचा भर नाही.

सद्यःस्थितीतील भारतीय राजकारणाचा विचार करताना जेपींनी पाश्चिमात्त्य संसदीय लोकशाहीच्या पद्धतीच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. त्यांच्या मते संसदीय लोकशाहीमध्ये, आधुनिक काळातील लोकशाहीतील मूलभूत दोष कायमच आहेत. प्रचलित पाश्चात्त्य लोकशाहीचा व्यक्तीचे मत हा आधार आहे. प्रौढ सार्वत्रिक मताधिकाराचा विचार एकेकाळी कितीही क्रान्तिकारक वाटत असला तरी प्रत्यक्षात असे दिसते की यामुळे व्यक्तीला खऱ्या अर्थाने राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळत नाही. उलट प्रौढ सार्वत्रिक मताधिकाराने व्यक्तींचे अण्वीकरण (ॲटोमायझेशन) केले असून या चुकीच्या तत्त्वावरच राज्याचा डोलारा उभा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. राज्य म्हणजे अशाप्रकारे केवळ व्यक्तींच्या मतांची बेरीज नव्हे. यात व्यक्तींचे संघटनही होत नाही व त्यांच्यात समुदायाची जाणीवही होत नाही. यात केवळ व्यक्तींचे प्रतिनिधित्व होते. परंतु तेदेखील बरेचदा भ्रामक असते.

संसदीय लोकशाहीतील सरकार प्रातिनिधिक असते हा दावा जेपींच्या मते भ्रामक आहे. कारण बरेचदा अल्पमताधारे अधिकारावर आलेली सरकारे राज्ययंत्रणेवर नियंत्रण ठेवतात. मिळालेली मते व जिंकलेल्या जागा यांच्यात व्यस्त प्रमाण असते. परंतु जिंकलेल्या जागांच्या आधारे सत्ता मिळते व यामुळे लोकशाहीचा जो खरा आधार, व्यक्तीचे मत, याला गौणत्व प्राप्त होते. यासाठी मतदानाच्या पद्धतीत बदल घडवून आणणे, निर्वाचन यंत्रणा, मतदार संघाचे स्वरूप यांत बदल करणे अशा सूचना केल्या जातात. परंतु हे बदल केवळ वरवरचे आहेत. यातून मूलतः काही बदल घडून येईल असे वाटत नाही.

लोकसंघटनेच्या नावाखाली असत्य भाषण, खोटी आश्वासने, भावनिक आवाहन इत्यादी गोष्टी केल्या जातात, ज्यांतून लोकांची दिशाभूल होते आणि या सर्वांमागे राष्ट्रहितापेक्षा व्यक्तिगत स्वार्थ, सत्ताकांक्षा महत्त्वाची असते. या पुढारीपणामुळे लोकशिक्षण, जनजागरण इत्यादी गोष्टींना काही महत्त्व दिले जात नाही.

या पद्धतीतून शेवटी सत्तेचे केंद्रीकरण होते. मतदारांतून प्रतिनिधी, प्रतिनिधिसभांतून कार्यकारी समिती (मंत्रिमंडळ), मंत्रिमंडळातून त्याचा प्रमुख

पंतप्रधान, यांच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण होत जाते व ज्यांच्या मताच्या आधारावर सत्ता प्राप्त झालेली असते असे मतदार व सत्ताधीश यांच्यामध्ये फार मोठी पोकळी निर्माण होते. या दोन टोकांमध्ये ज्या संस्था असतात (स्थानिक स्वराज्य संस्था) त्यांचे राष्ट्रीय संस्थांवर प्रभावीपणे नियंत्रण नसते. कारण तशी कोणतीच व्यवस्था या पद्धतीत नाही. त्यामुळे सामान्य माणूस सत्तेच्या राजकारणाच्या कक्षेबाहेरच असतो. त्याचा, धोरण ठरविणे, निर्णय घेणे या प्रक्रियांशी सुतराम संबंध येत नाही व आलाच तर तो फार जुजबी असतो व राज्यकर्त्यांना, नेत्यांना आवश्यक वाटतो तेव्हाच असतो. राज्याचे प्रश्न लोकमताधारे न सोडवता राजकीय पक्ष, सत्ताधीश, नेते, हितसंबंधी गट यांच्याकडून स्वहिताच्या दृष्टीने सोडवण्याचा प्रयत्न होतो. या अतिकेंद्रित व्यवस्थेत नोकरशाही प्रभावी बनण्याचाही धोका असतो. खरे सत्ताधारी नोकरशहाच बनून जनप्रतिनिधींचे स्थान नाममात्र बनण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. कारण प्रतिनिधी तात्पुरते येत असतात. नोकरशाही व्यवस्था व त्यातील अधिकारी–कर्मचारी वर्ग कायम स्वरूपाचा असतो.

संसदीय लोकशाहीची निर्वाचन पद्धती त्याचबरोबर संसदीय लोकशाहीत व अपरिहार्य मानली गेलेली पक्षपद्धती. ही जेपींच्या मते दोषपूर्ण आहे निवडणुकांबद्दल जेपी म्हणतात की या निवडणुका अत्यंत खर्चिक असल्यामुळे समाजातील धनिकांची त्या मक्तेदारी बनतात व आपल्या धनाच्या साहाय्याने राज्ययंत्रणेवर नियंत्रण ठेवण्याचे त्यांचे प्रयत्न सामान्यांच्या हितसंबंधांना धक्का पोहोचवतात. याशिवाय राजकीय पक्ष म्हणून जे संघटन या पद्धतीत अपरिहार्यपणे पुढे येते या संस्थादेखील सामान्यांच्या हिताचे फारसे काही कार्य करत नाहीत. राष्ट्रहितापेक्षा पक्षहिताला प्राधान्य दिले जाते व प्रत्येक प्रश्नाचा पक्षीय दृष्टीने विचार केला जातो. यातून समाजाच्या विघटनालाच उत्तेजन मिळते. राजकीय सत्ता मिळवणे हेच पक्षांचे ध्येय असल्यामुळे येनकेन प्रकारेण ते साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो व यातून भ्रष्टाचाराला प्रारंभ होतो. लोकशिक्षणापेक्षा जवळ असणारी संघटना, पैसा व प्रचार साधनांचा वापर करून पक्षीय दृष्टिकोण लोकांपुढे ठेवण्यात केला जातो. हे सर्व एकांगी आहे. या राजकीय पक्षांवर विशिष्ट हितसंबंधी गटांचे वर्चस्व असते. त्यामुळे पक्षांचे नियंत्रण हे गटच करीत असतात. पक्ष लोकांना जबाबदार नसतात, परंतु त्यांच्या मतांच्या साहाय्याने सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करतात व एकदा सत्ता मिळाल्यानंतर राज्य चालविण्याच्या इतर प्रक्रियांमध्ये लोकांना सहभागी करून घेण्याची त्यांना गरज वाटत नाही. पक्षीय पद्धतीतील दोषांमुळेच जेपींनी पक्षविरहित व्यवस्थेची शिफारस केलेली आहे.

संसदीय लोकशाहीत आढळून येणारे हे सर्व दोष भारतीय राजकीय क्षेत्रात दिसतातच. त्याशिवाय इतरही काही दोषांचे स्वरूप जेपींनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या मते भारतीय लोकशाही यंत्रणेचे स्वरूप उलट्या पिरॅमिडसारखे आहे. पाश्चात्त्य लोकशाहीच्या अंधानुकरणातून ही समस्या निर्माण झालेली आहे. भारतीय लोकशाहीचा आधार अत्यंत संकुचित असा आहे. केवळ सर्व प्रौढांना सार्वत्रिक मताधिकार दिल्याने आपण लोकशाहीला व्यापक आधार दिलेला आहे असे समजणे चूक आहे. हे सर्व मतदार परस्पर संबंध नसलेल्या वालूकणांप्रमाणे आहेत. यांच्यात संघटन, सुसंवादित्व व सामर्थ्य आणणे आवश्यक आहे. आजच्या भारतीय लोकशाहीचा आधार असणारा घटकच ठिसूळ, असहाय व परावलंबी आहे. त्याच्या हाती अत्यंत मर्यादित शक्ती आहेत व वरच्या पातळीवर मात्र सत्तेचे केंद्रीकरण होत आहे. स्थानिक पातळीवरील संस्थांपेक्षा – ज्यांत जास्तीत जास्त लोकांना सहभागी होण्याची संधी आहे – केवळ प्रतिनिधी असणारी संसद अधिक सामर्थ्यशाली बनलेली आहे. हे चित्र बदलणे आवश्यक आहे. भारतीय जनतेला लोकशाही व्यवस्थेचे खरे फायदे मिळायचे असतील तर हा पिरॅमिड सुलटा करणे आवश्यक आहे. या लोकशाही व्यवस्थेचा पाया भक्कम व व्यापक करणे जरूर आहे.

यासाठी लोकशाही व्यवस्थेला व्यापक स्वरूप देणे आवश्यक आहे. कनिष्ठ पातळीवर अधिक सशक्त व सुदृढ संस्थांची स्थापना करून त्यांच्या आधारे वरिष्ठ पातळीवरील संस्थांची रचना केली तरच या संस्था टिकून राहतील. कारण आधारभूत संस्था वळकट असतील तर लोकशाहीची इमारत शाबूत राहील अन्यथा अगदी अल्पशा धक्क्याने देखील हा सर्व डोलारा कोसळण्याची भीती आहे. आपल्या लोकशाहीचा जो आधार आहे प्रौढ मतदार, हाच असंघटित आहे व आपल्या यंत्रणेत सर्वांत कच्चा दुवा आहे. आणि याच आधारावर आपली सर्व शासनयंत्रणा उभी आहे. आज स्थिती अशी आहे की सामान्य मतदार शासनावर कोणताच प्रभाव पाडू शकत नाही व परिणामतः त्याचे अनेक प्रश्न सुटत नाहीत. आपल्या नागरिकांच्या समस्या सोडवण्याचे सामर्थ्य नसलेल्या यंत्रणेला जर उद्या कोणी धक्का देऊन ती मोडण्याचा प्रयत्न करील तर लोक त्याचे स्वागतच करतील व परिणामतः या देशातील लोकशाही संपुष्टात येईल. आफ्रो–आशियाई क्षेत्रांतील नवोदित राष्ट्रांत ही प्रक्रिया सुरू झाल्याची जाणीव करून देऊन जेपी असा इशारा देतात की भारतही या बाबतीत अपवाद होणार नाही. लोकशाही यंत्रणेच्या आधारशिला वळकट करण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून जेपी लोकांमध्येच या विचाराचा प्रसार करणे, त्यांचे संघटन करणे, त्यांना सत्तेत सहभागी करून घेऊन जबाबदाऱ्या

उचलण्याची जाणीव करून देणे इत्यादी उपायांचा पुरस्कार करतात. केवळ ठराविक काळानंतर 'मतदान करणे' एवढेच काम करणारा नागरिक त्यांना अभिप्रेत नाही तर जो जागरूकपणे आपले, आपल्या समाजाचे हित विचारात घेईल, स्वतंत्रपणे आपली भूमिका ठरवून राज्यकर्त्यांवर दडपण आणील असा नागरिक त्यांना अभिप्रेत आहे.

राजकीय परिवर्तनाची दिशा

व्यक्ती, सामाजिक संघटन, राजकीय व्यवस्था इत्यादींबाबत वैचारिक विवेचन व सहपरिस्थितीतील दोष किंवा व्यवस्थेच्या मर्यादांचा विचार करून जेपी राजकीय क्षेत्रातील आमूलाग्र परिवर्तनाची अपरिहार्यता स्पष्ट करतात व त्यांच्यासमोर असणाऱ्या आदर्शांचे स्पष्टीकरण देतात. या संदर्भात ते सामुदायिक समाज व सहभागी लोकशाहीचा पुरस्कार करतात व प्राचीन काळी भारतात अस्तित्वात असणाऱ्या समाजव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याचा आग्रह धरतात. त्यांच्या मते आज प्राचीनकालीन समाजव्यवस्थेचा केवळ सांगाडा शिल्लक आहे.

'समाजहित' (Good of the Community) हा उद्देश असणारी पूर्वीची एकात्म, हितसंबंधांबाबत जागरूक असणारी, सामाजिक जबाबदारी स्वीकारून त्या चौकटीत व्यक्तीला स्वातंत्र्य उपभोगण्याची संधी देणारी व्यवस्था आज अस्तित्वात नाही. उद्योगीकरणामुळे समाजाचे ग्रामीण व शहरी असे कृत्रिम विभाजन झालेले असून यातूनच अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. या संदर्भात जेपींनी राज्यविषयक मांडलेल्या कल्पनांचे स्पष्टीकरण थोडक्यात पुढीलप्रमाणे देता येईल–

१) सहभागी लोकशाही

प्रचलित लोकशाही व्यवस्थेतील दोष लक्षात घेता या पद्धतीला खरी लोकशाही म्हणताच येत नाही. कारण यात लोकांचा सहभाग कोठेच दिसत नाही. तशी संधीच त्यांना मिळत नाही. म्हणून जास्तीत जास्त लोक जास्तीत जास्त प्रमाणात राज्ययंत्रणेत सहभागी करता येतील अशी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे व त्यासाठी प्राचीन स्थानिक स्वशासनाच्या पद्धतीचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. खऱ्या अर्थाने जनतेचे राज्य यायचे असेल तर त्याचा विकास तळापासून झाला पाहिजे. या संस्थांचा, त्यांच्या कार्याचा परिचय व त्यांच्या कार्यात सहभागी होण्याची संधी अगदी कनिष्ठ स्तरावरील व्यक्तीलाही प्राप्त झाली पाहिजे. तळापासून स्वराज्याचा विकास झाला पाहिजे व यासाठी आपण ग्रामराज्यांची कल्पना स्वीकारणे आवश्यक आहे.

ग्रामस्वराज्य

राजकीय क्षेत्रात लोकशाही संस्थांची पाळेमुळे खोलवर रुजणे आवश्यक आहे. त्यासाठी पूर्वीच्या ग्रामपंचायतीसारख्या संस्थांचे पुनरुज्जीवन करणे, खऱ्या अर्थाने ग्राम स्वशासित होणे आवश्यक आहे. राजकीयदृष्ट्या ग्राम एका व्यापक समाजाचा घटक बनावा. गावाचा कारभार केवळ या संस्था चालवणार नाहीत तर गावकरी या प्रक्रियेत भाग घेतील. लोकच पुढाकार घेऊन अशी ग्रामराज्ये निर्माण करतील. सरकारी यंत्रणेद्वारे किंवा बाह्यशक्तीद्वारे ही ग्रामराज्ये स्थापन होणार नाहीत. आजच्या परिस्थितीत ग्रामपंचायती आहेतच परंतु त्यांचे नियंत्रण राज्य विधिमंडळाकडून होते. ही परिस्थिती बदलणे आवश्यक आहे. जेपींच्या मते ही ग्रामराज्ये स्वायत्त असतील, यांत कोणत्याही परकीय शासनाला स्थान असणार नाही. ग्राम पातळीवर अनेक रचनात्मक कार्ये यांच्याकडून केली जातील व भारतीय गणराज्यांच्या या आधारभूत शिला असतील. व्यक्तिस्वातंत्र्य व सामुदायिक विकासाचा या संस्था आदर्श असतील. प्रामाणिक व निष्ठावान सामाजिक कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांतूनच ग्रामराज्याची कल्पना साकार होईल. शहरी क्षेत्रातही मोहल्ला किंवा भागाच्या स्तरावर अशा प्रकारची व्यवस्था उभी करता येईल. या सर्वांत कनिष्ठ पातळीवरील संस्थेला बरेच अधिकार असतील व जसजसे आपण वरिष्ठ पातळीवर जाऊ तसतसे राजकीय संस्थेचे अधिकार मर्यादित होत जातील.

गांधीजींची मध्यानुवर्ती वर्तुळांची समाजरचना ही जेपींना आदर्श वाटते व त्याचा प्रारंभ ग्रामपातळीपासून करता येईल व प्राथमिक समूहातून जिल्हा, प्रांत, राष्ट्र व अखेरीस विश्वपातळीवर एकसंध समाजाची उभारणी करता येईल असा त्यांचा विश्वास आहे. या विभिन्न पातळीवरील संस्था व संघटना परस्पर संबंधित असतील व एकातून दुसरी, त्यातून तिसरी अशा तऱ्हेने अप्रत्यक्ष निर्वाचनाच्या पद्धतीने त्यांची निर्मिती करता येईल अशा तऱ्हेची योजना त्यांनी मांडलेली आहे.

विकेंद्रीकरण

लोकशाही शासनव्यवस्थेचा अपरिहार्य भाग म्हणून विकेंद्रीकरणाचे तत्त्व जेपींना महत्त्वपूर्ण वाटते. पाश्चात्त्य लोकशाहीमध्ये अखेरीस सत्तेचे केंद्रीकरण आहे व त्यामुळे जरी बाह्यात्कारी ही राज्ये प्रभावी वाटत असली, त्यांना अनेक क्षेत्रांत मिळालेले यश आपल्याला नेत्रदीपक वाटत असले तरी खऱ्या अर्थाने पश्चिमी राष्ट्रांत व्यक्ती-स्वातंत्र्य घडत आले असे म्हणता

समग्र क्रांतीचा राजकीय आशय

मराठी ग्रंथ संग्रहालय वर्धा
२८६८
२३९०

येत नाही. अतिकेंद्रित समाजव्यवस्था, राज्यसंस्था व उद्योगीकरणातून आलेली अतिशहरीकरणाची प्रक्रिया यातून या देशात व्यक्तीचे जीवन साचेबंद व एकसुरी बनलेले दिसते. ही सगळी प्रगती केवळ भौतिक गरजांच्या भोवतीच घोटाळताना दिसते. पाश्चात्त्य जगात विकसित झालेली कोणतीही विचारसरणी–भांडवलशाही, साम्यवाद, समाजवाद–व्यक्तिजीवनाच्या भौतिक अंगास प्राधान्य देताना दिसते. आणि भारतासाठी हा मार्ग यासाठी स्वीकारता येत नाही कारण कालांतराने आपल्याला याच प्रश्नांना तोंड द्यावे लागेल.

यामुळे आज व्यक्ती अतिराज्यवादाची शिकार बनलेली आहे. व्यक्ती म्हणून समाजात तिला काही महत्त्वपूर्ण स्थान उरलेले नाही. अतिकेंद्रीकरणामुळे जरी वरवर एकात्मता जाणवत असली तरी त्याखाली परस्परविरोधी शक्तींचे अस्तित्व कायमच आहे व अवसर मिळताच त्या शक्ती नव्या जोमाने उफाळून वर येतात हा अनुभव आहे. म्हणून खरी लोकशाही व्यवस्था निर्माण करायची असेल व व्यक्तीची प्रतिष्ठा व समाज-भावना दोन्हींची जपणूक करायची असेल तर सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक ठरते. विकेंद्रित व्यवस्थेमध्ये प्रत्येक स्तरावरील संस्थेस तिच्या कुवतीप्रमाणे सत्ता मिळेल व त्या पातळीवर स्वतंत्रपणे कार्य करण्याच्या अनुभवातून आपले प्रश्न सोडवण्याची क्षमता तिच्यात येईल. विविध स्तरांवर राहणाऱ्या लोकांना स्वशासनाची संधी मिळाल्यास त्यांची वैशिष्ट्ये जतन करण्याची संधी मिळेल. आज ज्याप्रमाणे प्रत्येकजण आपल्या विशिष्ट हितसंरक्षणासाठी संघर्षाला तयार होतो, ती स्थिती येणार नाही. म्हणजेच पर्यायाने या व्यवस्थेमधून शांततामय सह-जीवनाचा मार्ग निघेल व राष्ट्र अधिक सामर्थ्यवान, एकात्म व प्रभावी बनेल. विकेंद्रीकरणामुळे केंद्र दुर्बळ बनेल व सर्वत्र अंदाधुंदी माजेल ही टीका जेपींना मूर्खपणाची वाटते. कारण विकेंद्रीकरणात वर उल्लेखल्याप्रमाणे प्रत्येक स्तरावरील संस्थांना त्यांच्या कार्यक्षमतेच्या प्रमाणात अधिकार देण्याचा विचार असल्यामुळे केंद्रीय पातळीवर आवश्यक ते अधिकार केंद्रशासनाकडे राहाणारच आहेत.

२) सामुदायिक समाज

जेपींना अभिप्रेत असणाऱ्या राजकीय व्यवस्थेत सामुदायिक समाजाची निर्मिती ही आवश्यक आहे. त्यांच्या मते सध्या समुदायाची भावना लोप पावली असून व्यक्तीचे समाजातील स्थान केवळ संदर्भहीन वालुकाकणासारखे आहे. व्यक्ती आज समाजाचा यांत्रिक भाग बनली आहे. आज समाज व्यक्तींचे केवळ अस्तित्व दाखवतो. त्यांच्यातील साहचर्य, बंधुभाव, हितसंबंध जपण्याची वृत्ती,

जबाबदारीची जाणीव या गोष्टी लोप पावल्या आहेत. धर्म, जात, व्यवसाय, भाषा, रूढी, परंपरा यांमुळे अनेकविध गट समाजात अस्तित्वात आलेले आहेत. परंतु त्यांच्यात एकात्म भावनेचा अभाव आहे. आज व्यक्तीचे जीवन एकांगी बनलेले आहे. यांतून मार्ग काढणे आवश्यक आहे. सामुदायिक समाज, व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा, गुणधर्माचा, समाजातील स्थानाचा विचार करून प्रत्येक व्यक्ती समाजाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असल्याची भावना व्यक्तीमध्ये निर्माण करतो व प्रत्येक व्यक्तीला समाजाचा सजीव घटक बनवून समाज म्हणजे एक 'सेंद्रिय संघटन' ही कल्पना वास्तवात आणतो.

व्यक्ती ही आपल्या व्यक्तिगत जीवनाचे केन्द्र असते. परंतु समाजजीवनात ती एकरूप होऊन एका समुदायाची भावना निर्माण होणे यातच व्यक्तीचा विकास व अंतिम हित असते. ग्राम किंवा खेडे हे जेपींच्या मते या सामुदायिक समाजाचा मूलभूत घटक आहे. म्हणून ग्रामीण स्तरावर खऱ्या अर्थाने सामुदायिक समाजाची कल्पना साकार होऊ शकेल.

३) पंचायत राज्यपद्धतीचा पुरस्कार

भारतातील प्रचलित लोकशाहीची चिकित्सा करून व संपूर्ण क्रान्तीच्या संदर्भात अपेक्षित अशा राजकीय परिवर्तनाची दिशा स्पष्ट केल्यानंतर ही तत्त्वे प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने जेपींना पंचायती राज्यपद्धती आदर्श वाटते: विकेन्द्रीकरण, सहभागी लोकशाही व सामूहिक समाज यांच्या स्थापनेच्या प्रयत्नांत आपण पुन्हा पाश्चात्त्यांची उधारउसनवारी करण्याची गरज नाही. प्राचीन भारतीय राजकीय व्यवस्थेतच आपल्याला या सर्व गोष्टी सापडतात. सामुदायिक जीवन व स्वविकासाची परंपरा भारताला नवी नाही. फक्त गरज जर कशाची असेल तर आज त्यांचे पुनरुज्जीवन करण्याची.

पूर्वीच्या काळी असणाऱ्या पंचायती, खेड्यांचा खऱ्या अर्थाने कारभार चालवीत. सामान्यत: मान्यता व मतैक्य यातून या पंचमंडळींची निवड होत असे. त्यामुळे आज निवडणुकांमुळे जी गटबाजी, फूट आपल्याला दिसते ती त्याकाळी नव्हती. या संस्थांना त्या क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्ती व त्यांचे संबंध याबाबत भरपूर अधिकार होते व त्यांचा वापरही होत असे. केन्द्रसत्ता केवळ लक्ष ठेवीत असे. अशाप्रकारचा ग्रामीण समाज हा पंचायती राज्यपद्धतीचा आधार असेल.

या समाजाचे स्वरूप स्वयंशासित, स्वयंपूर्ण व शेती व उद्योग यांत संतुलन राखणारा असा असेल. ग्रामीण व नागरी दोन्ही क्षेत्रांत आवश्यक ते परिवर्तन घडवून आणून त्यादृष्टीने नवसमाजाची उभारणी करता येईल व यासाठी

त्रिस्तरीय यंत्रणेची उभारणी करणे सोईस्कर ठरेल. ग्रामपातळीनंतर गट पातळीवर व नंतर जिल्हा पातळीवर अशी यंत्रणा उभी करता येईल. ग्राम-पातळीपासून जिल्हास्तरापर्यंत निर्वाचित संघटनाच कार्यकारी संघ म्हणून काम करतील. परंतु राज्य (प्रान्त) व राष्ट्र पातळीवरील निर्वाचित संघटना मात्र स्वतंत्र कार्यसमित्यांची निर्मिती करतील व या कार्यकारिणी आपल्या संबंधित सभांना जबाबदार राहतील. प्रत्येक स्तरावरील संघटना कनिष्ठ स्तरावरील संघटनांचे एकात्म रूप असेल. याबाबतीत जेपी मूलस्तर सोडल्याम इतरत्र अप्रत्यक्ष निर्वाचनाच्या तत्त्वाचा पुरस्कार करतात.

राज्य व प्रांत पातळीवर पंतप्रधान व मुख्यमंत्री अशी पदे न राहता प्रत्येक स्तरावरील कार्यसमितीचा अध्यक्ष असेल व इतर सभासद या समित्यांच्या निर्णयाबाबत संयुक्तपणे जबाबदार असतील. अशा प्रकारे जेपींनी त्यांना अभिप्रेत असणाऱ्या राज्ययंत्रणेचा आराखडाच दिलेला आहे.

१९५८ सालानंतर भारतात पंचायती राज्याची कल्पना प्रत्यक्षात आण-ण्याचा प्रयोग सुरू झाला. यात विकेंद्रीकरण, व्यक्ती व समाजाचा विकास इत्यादी कल्पना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करण्यात आलेला असला तरी देखील जेपींना या योजनेत अनेक त्रुटी जाणवल्या व त्या त्यांनी आपल्या लिखा-णातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या मते या प्रयोगाला सुरुवात झाली ही स्वागतार्ह गोष्ट असली तरी यात व्यक्तीचा माणूस म्हणून विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने फारसा प्रयत्न नाही. यामागे कोणतेही सामाजिक तत्त्वज्ञान नाही, समुदायाची कल्पना सुस्पष्टपणे मांडलेली नाही, तसेच शेती व औद्योगिक समाजात संतुलन स्थापन करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश नाही व अखेरीस याचे उद्दिष्ट भौतिकवादाभोवतीच घोटाळत राहणारे आहे. तो केवळ विकासकार्ये करणे व लोकांना अधिकाधिक सुखसोई उपलब्ध करून देणे व राज्याचे स्वरूप अधिक कल्याणकारी करणे एवढाच आहे. यातून लोकशाही शासनव्यवस्थेला बळकटी आणणारा, स्वातंत्र्य, समता, बंधुता व शांतता या मूल्यांना मानणारा माणूस निर्माण होणे शक्य नाही. ही केवळ प्रशासकीय सुधारणा ठरेल. व्यक्तीच्या संदर्भात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे यामुळे शक्य होणार नाही.

यासाठी सर्वप्रथम जनशिक्षण आवश्यक आहे. राजकीय पक्षांना पंचायती यंत्रणेत पक्ष म्हणून सहभागी होऊ देऊ नये, कारण पक्ष म्हणून ज्या संघटना येतात त्या आपल्यावरोवर हितसंबंधांचे ओझे घेऊन येतात, म्हणून ग्राम-पंचायतींच्या निवडणुकांत पक्षांना भाग घेण्याची संधी देऊ नये. या निवडणुका शक्यतो एकमताने किंवा सहमतीने व्हाव्यात. राज्यशासनाचे या संस्थांच्या

दैनंदिन कामावर नियंत्रण असू नये. अशा प्रकारच्या अनेक सूचना व सुधारणा जेपी या संदर्भात सुचवतात. या बाबतीतही अत्यंत तपशीलवार असे लिखाण जेपींनी वारंवार केलेले आढळते.

समारोप

संपूर्णक्रांतीच्या संकल्पनेच्या संदर्भात राजकीय अंगांत आवश्यक ते परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने जेपींनी केलेल्या विवेचनाचा व विचाराचा हा सारांश. या विचारधारेच्या विकासकाळात जेपी पुष्कळच क्रियाशील राहिलेले आपल्याला दिसतात. राष्ट्रीय चळवळीतील त्यांचा सहभाग, काँग्रेस समाजवादी दलाच्या स्थापनेत पुढाकार घेऊन समाजवादाच्या दिशेने जाण्याचा त्यांचा प्रयत्न, स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारणाचे स्वरूप व त्यातून आलेली उद्विग्नता आणि राजकारणसंन्यास घेऊन रचनात्मक कार्यासाठी स्वतःस वाहून घेण्याचा त्यांचा निर्णय, खऱ्या सर्वोदयाच्या दिशेने सुरू झालेल्या प्रवासातील महत्त्वाची चळवळ म्हणून भूदान व ग्रामदान चळवळीत त्यांनी केलेले परिश्रम, बंधुभाव व शांतता यांसाठी डाकूंच्या शरणागतीसाठी त्यांनी केलेले कार्य व अखेरीस १९७० सालानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत, सर्वसामान्य व्यक्तीचे स्वातंत्र्य महत्त्वपूर्ण मानून व राजकारण संन्यास घेतलेला असूनही उतारवयात चळवळीचे नेतृत्व करण्यात त्यांनी केलेले कार्य या सर्वच गोष्टी त्यांच्या वैचारिक विकास-धारेशी सुसंगत अशाच आहेत असे म्हटले पाहिजे. राजकीय क्षेत्रात जेपी केवळ विचारवंत म्हणून नव्हे तर नेते व कार्यकर्ते म्हणूनही महत्त्वाचे आहेत आणि म्हणूनच त्यांच्या विचाराचे मोल नाकारता येत नाही.

जेपींचे राजकारणविषयक विचार व एकंदरीतच त्यांची संपूर्ण क्रांतीची कल्पना यावर अनुकूल व प्रतिकूल विचार मांडलेले दिसतात. जेपींच्या समर्थकांना त्यांचे विचार अत्यंत मूलभूत, वास्तववादी व परिपक्व वाटतात व यामागे त्यांचा सार्वजनिक जीवनातील अनुभव, अनेक चळवळींचे त्यांनी केलेले परिशीलन व लोकशाही व स्वातंत्र्य यांवर असणारी त्यांची अव्यभिचारी वैचारिक निष्ठा या गोष्टी आहेत. संपूर्ण क्रांती म्हणजे केवळ स्वप्नरंजन नव्हे तर सद्यःपरिस्थितीत राष्ट्राच्या जीवनात निर्माण झालेल्या अपप्रवृत्तींचा मुकाबला करणारी सामर्थ्यवान चळवळ आहे व तिचे वाहक युवक आहेत, नवीन पिढीवर जेपींनी टाकलेला विश्वास अनाठायी नाही तर पूर्ण विचारांती टाकलेला आहे, अशा तऱ्हेचे विचार जेपींच्या समर्थकांकडून मांडले जातात.

या उलट जेपींच्या विरोधकांना जेपी स्वप्नाळू, आदर्शवादी, अतिनैतिक व स्वयंकेंद्रित असे वाटतात. जेपींची वैचारिक गहनता, प्रभावी व्यक्तिमत्व, सार्व-

जनिक क्षेत्रात राहूनही शुद्ध व सचोटीचे आचरण या गोष्टी असूनदेखील जेपी आपल्या मागे फारसे पाठिराखे व सहकारी उभे करू शकले नाहीत व म्हणून संपूर्ण क्रांती ही केवळ जेपींची चळवळ आहे, व्यक्तिशः ते तिचे केंद्रबिंदू आहेत, त्यांच्या माघारी ही चळवळ पुढे चालवेल असा सामर्थ्यवान नेता नाही हे त्यांचे अपयश आहे असे त्यांच्या टीकाकारांचे मत आहे.

साम्यवादी विचाराचा पगडा असणाऱ्या जेपींच्या टीकाकारांच्या मते जेपींनी सांगितली, ती क्रान्ती नव्हेच. उलट त्यांचे विचार व वृत्ती क्रान्ती विरोधीच असून यातून काहीच साधणार नाही. जेपींच्या चळवळीस कामगार-शेतकरी वर्गाचा पाठिंबा फारसा मिळू शकला नाही. त्यांच्या मागे काही पांढरपेशा मध्यवर्गीय विचारवंतांचीच गर्दी असून त्यांच्या चळवळीवर उजव्या जातीयवादी पक्ष व संघटनांचा जबरदस्त प्रभाव आहे. त्यांच्या मते हा उजव्या प्रतिगामी शक्तींनी योजनापूर्वक केलेला कटच आहे. या हितसंबंधी लोकांना बरोबर घेऊन आमूलाग्र परिवर्तन कसे घडवून आणता येईल हा त्यांचा मुख्य प्रश्न आहे. भूदान, ग्रामदान यासारख्या चळवळींत भाग घेऊन, किंवा नक्षलवाद्यांच्या विरोधात आमनेसामने येऊन जेपींनीं खऱ्या प्रखर क्रान्तिकारी चळवळींना मोडता घातला आहे, असा या गटातील टीकाकारांचा आक्षेप आहे. शिवाय केवळ विद्यार्थी किंवा युवक हेच क्रान्तीचे वाहक कसे होऊ शकतात हाही टीकाकारांच्या दृष्टीने एक प्रश्नच आहे.

जेपींच्या विचारांवर व त्यांच्या संपूर्ण क्रांतीच्या दिशेने जाण्यासाठी कराव्या लागणाऱ्या चळवळींवर टीका करणाऱ्यांत १९७० ते ७७ या काळात सत्तास्थानी असणाऱ्या राजकारण्यांचा एक वर्ग आहे. त्यांच्या मते जेपींची चळवळ (बिहार व गुजरात) हे निव्वळ राजकारणच होते. राजकारणातून आपली निवृत्ती जाहीर करूनही जेपी आयुष्यभर राजकारणच करीत राहिले हा त्यांचा आक्षेप आहे. जेपी फॅसिस्ट आहेत, त्यांच्या विचारांत काही अर्थशास्त्रीय तथ्य नाही, त्यांचे विचार म्हणजे अराजकाला आमंत्रणच होय, त्यांची प्राचीनकालीन भारतीय संस्थांच्या पुनरुज्जीवनाची कल्पना कालबाह्य आहे; प्रचलित राजकीय व्यवस्थेतील भ्रष्टाचारविरोधी जेपींनीं उघडलेली आघाडी, ते भ्रष्टाचारी लोकांच्या सहकार्यानेच चालवीत आहेत, राजकीय क्षेत्रातील अवनतीस, अनैतिकतेस, भ्रष्टाचारास सर्वच राजकीय पक्ष व नेते यांचा हातभार लागलेला असताना त्यांच्यातीलच काहींच्या पाठिंब्यावर जेपी जी लढाई करू इच्छितात हे केवळ ढोंग आहे. बिहार किंवा गुजरातमधील चळवळीचे लक्ष्य तत्कालीन सत्तारूढ पक्षाचे शासन होते ते घालवून त्या जागी दुसऱ्या पक्षाचे शासन प्रस्थापित करणे एवढाच मर्यादित उद्देश या चळवळीमध्ये होता,

यांत फारसे क्रान्तिकारी काही नव्हते, म्हणूनच थोड्या फार कालावधीनंतर थोडे फार बदल झाल्यानंतर या चळवळी थंडावल्या; हे जेपींच्या विचाराचे नसले तरी त्यांच्या राजकारणाचे निश्चितपणे अपयश आहे असा या टीकाकारांचा सूर आहे.

संपूर्ण क्रान्तीची कल्पना अत्यंत संदिग्ध असून यात कोणतेही वैचारिक सूत्र नाही. जेपींनी सांगितलेल्या पद्धती व प्रत्यक्ष चळवळीमध्ये वापरलेल्या पद्धती यांत फार मोठी तफावत आहे. ही चळवळ खऱ्या अर्थाने लोकशाही स्वरूपाची राहिलीच नाही. रीतसर निवडून आलेल्या प्रतिनिधींवर दडपण आणून त्यांना आपली पदे सोडावयास लावणे याला लोकशाही कसे म्हणता येईल असा प्रश्न उपस्थित करून संपूर्ण क्रान्तीला संपूर्ण अपयश आले आहे या टोकापर्यन्त टीकाकारांनी मजल मारलेली आहे.

अशारीतीने अत्यंत अनुकूल व प्रतिकूल मतमतांतराच्या गदारोळात आपल्याला संपूर्ण क्रांतीची संकल्पना अडकून बसल्याचे आढळून येते. संपूर्ण क्रांतीची कल्पना व प्रत्यक्षात त्या दिशेने झालेल्या चळवळी याला काळाचा संदर्भ आहे. आज घटकेला या संबंधांत कोणताही अनुकूल किंवा प्रतिकूल निष्कर्ष काढणे अशक्य आहे. कारण ' संपूर्ण क्रांती ' हा एक विचार आहे असे मानले तर त्यात घेतलेल्या भूमिका व त्यामागील तर्क यांचा पद्धतशीरपणे विचार होणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व शांतता ही जी ध्येयचतुःसूत्री या विचारामागे आहे याबद्दल मतभेद होण्याचे काही कारण नाही. विशिष्ट काळात ज्या पद्धती हाताळल्या गेल्या त्यांवर त्या काळाच्या मर्यादा आहेतच ही गोष्ट दृष्टीआड करता येत नाही. जेपींनी राजकीय परिवर्तनाबाबत घेतलेली भूमिका, प्रचलित लोकशाही पद्धतीतील दोष व त्या अनुषंगाने त्यांनी सुचविलेली उपाययोजना, हा एक विचारच आहे. या सर्व गोष्टी विशिष्ट कालावधीतच साध्य होतील असे समजणे बरोबर नाही. जेपींनी जे आदर्श मानले ते साध्य करण्याबाबत कालमर्यादांचा विचार करणे अयोग्य आहे. आदर्शप्राप्तीसाठी अशी कालमर्यादा निश्चित करता येत नसते. आतापर्यंत अनेक विचारवंतांनी आपल्या विचारांतून असे आदर्श मांडले परंतु कोणीही त्याबाबतची कालमर्यादा निश्चित करू शकलेले नाही हे सत्य आहे. या अर्थाने जेपी आदर्शवादी असतीलही परंतु ते स्वप्नाळू निश्चितच नाहीत. कारण या आदर्शाप्रत जाण्याच्या मार्गाबाबत व त्यांच्या मर्यादांबाबत त्यांना जाणीव होती. या संबंधात एकच उदाहरण पुरेसे आहे. सहभागी लोकशाही प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने जेपींनी प्राचीन भारतीय परंपरांच्या पुनरुज्जीवनाचा आग्रह धरला परंतु त्याचवेळी त्यांनी प्राचीन काळात ' भारतीय

खेडी ' ज्या स्वरूपात होती ती जशीच्या तशी किंवा प्राचीनकालीन व्यवस्था जशीच्या तशी प्रस्थापित करण्याची भूमिका घेतलेली नाही. प्राचीन काळी अस्तित्वात असणारी ' स्वयंपूर्ण ग्राम ' ही कल्पना त्यांना आदर्श वाटत नाही, प्राचीन काळातील खेड्यांचा एकाकीपणा त्यांना अमान्य आहे. त्यांना सामुदायिक समाजाचा ग्राम हा घटक मान्य आहे परंतु प्राचीन काळी खेड्यांना असलेली स्वायत्तता, स्वयंपूर्णता व एकाकीपण नष्ट करून, त्यांना एकत्रित करून परस्परावलंबी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण घटकाचे स्थान देणे आवश्यक आहे असे जेपींना वाटते.

विकेंद्रीकरणाबाबतची त्यांची भूमिका देखील वास्तववादीच आहे. विकेंद्रीकरणातून दुर्बल केंद्र त्यांना अभिप्रेत नाही. लोकशाही व्यवस्थेचा त्यांनी आपल्या समोर ठेवलेला आदर्श व त्यासाठी लोकशिक्षणाची आवश्यकता, या संदर्भात राज्ययंत्रणेच्या, सत्ताधाऱ्यांच्या असणाऱ्या मर्यादा व राजकीय क्षेत्राबाहेर यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांची त्यांना असलेली जाणीव, ही त्यांची वैचारिक परिपक्वताच स्पष्ट करतात. भूदान, ग्रामदान या चळवळींमध्ये त्यांना दिसलेली भावी परिवर्तनाची दिशा व तत्त्वे व त्याचबरोबर साध्य-साधनांची सांगड घालण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न, त्यांच्या विचाराची बैठक पुरेशा प्रमाणात स्पष्ट करतात. प्रतिदिन नीतिमूल्यांचा ऱ्हास होणारी परिस्थिती आज आपल्यासमोर असताना, नैतिकतेचा आदर्श आपल्यासमोर ठेवणारा विचार आपल्याला नकोसा वाटणे हे आपले मानसिक व वैचारिक दौर्बल्यच आहे. म्हणून त्यावर टीकाप्रहार केले जाणार हे स्पष्ट आहे.

संपूर्ण क्रांती यशस्वी झाली की अयशस्वी झाली हा प्रश्न या ठिकाणी गैरलागूच आहे, कारण आता तर कोठे त्यासंबंधी विचार सुरू झालेला आहे. हा एक विचार आहे या दृष्टीनेच त्याचे परिशीलन होणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात तो आणताना कोणता कार्यक्रम कसा राबवायचा, कोणाची मदत घ्यायची, कोणाची नाकारायची, कोणत्या मागण्या व तात्कालिक उद्दिष्टे समोर असावीत हे सर्व त्या त्या संबंधित काळातील परिस्थितीवर अवलंबून राहील. परंतु त्या सर्व कृतींचा आधार मात्र मानवी मूल्यांची जपणूक करणारी व्यवस्था निर्माण करणे हा असेल हे निश्चित. संपूर्ण क्रांतीचा विचार संकल्पनेच्या पातळीवर जरी आपल्याला परिवर्तनाचा आकृतीबंध निर्माण करून देऊ शकला तरी सद्यःस्थितीत एवढे पुरेसे आहे असे वाटते.

* * *

लोकसमित्या

व. रा. मुळे

लोकशाहीच्या प्रक्रियेत 'लोक' हरवून जातात व 'शाही' प्रस्थापित होते. मग ती शाही कधी व्यक्तीची, कधी गटाची तर कधी पक्षाची निर्माण होते. लोकांना सार्वभौमत्वाचा प्रत्यय क्वचितच येतो. किंवहुना, येतच नाही. लोकांचे सार्वभौमत्व हा लोकशाहीचा आत्मा नष्ट होऊन लोकशाहीच्या संस्थात्मक ढाच्याला महत्त्व प्राप्त होऊन बसते. जनसत्तेच्या प्रतिष्ठापनेसाठी लोकशाहीच्या प्रक्रियेस पूरक म्हणून व संपूर्ण क्रांतीच्या वाहक म्हणून लोकसमित्यांची कल्पना पुढे आलेली आहे.

संसदीय लोकशाहीत अल्पजनसत्तेकडे झुकण्याची प्रवृत्ती दिसून येते. प्रातिनिधिक लोकशाहीत संसदेचे सार्वभौमत्व केवळ लाक्षणिक अर्थाने न स्वीकारल्यामुळे संसदेकडून लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेणारे कायदे केले जाऊ शकतात. प्रातिनिधिक लोकशाहीत पक्षसंघटना प्रबळ झाल्यामुळे सत्तेचे दुहेरी केंद्रीकरण होते. एकतर पक्षांतर्गत केंद्रीकरण होत असते. कारण पक्षसंघटना बलवान करण्यासाठी नेतृत्व, पक्षाची शिस्त व कार्यक्रमाबाबत एकसूत्रीपणा या गरजा लक्षात घेऊन पक्षसंघटनेत केंद्रीकरण अपरिहार्य ठरते. दुसरे, पक्ष संघटना जेव्हा प्रातिनिधिक संस्थांमध्ये भाग घेते तेव्हा या प्रातिनिधिक संस्थांमध्ये अपरिहार्यपणे केंद्रीकरणाच्या प्रवृत्ती निर्माण होतात. संसदीय सत्ता म्हणजे बहुमताच्या पक्षाचे धोरण राबवणे व बहुमताच्या पक्षाचे धोरण म्हणजे पक्षसंघटनेत ज्या मूठभर लोकांच्या हाती सत्ता असते त्यांनी ठरवलेले धोरण; आणि हे मूठभर लोक जर मंत्रिमंडळातही असतील तर त्यांच्या हाती शासन व पक्षसंघटना यांवर संपूर्ण नियंत्रणाच्या अधिकाराचे केंद्रीकरण होणे या स्वरूपात लोकशाही राबवलेली दिसते.

लोकसमित्यांची रचना हा याला पर्याय आहे. पर्याय याकरता की यात प्रक्रिया उलटवून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचा प्रयत्न आहे. लोकशाही यशस्वी

होण्यासाठी लोकांनी निर्णय घेण्यात सहभागी होणे आवश्यक आहे. त्यांना निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत कसे गुंतवता येईल हा यातील विचाराचा मुख्य धागा आहे. यात धोरणातील मुसंगती किंवा परिवर्तनासाठी समन्वय अमान्य केलेला नाही. परंतु हा समन्वय स्थानिक पातळीवर, प्रादेशिक पातळीवर अथवा राष्ट्रीय पातळीवर घडवून आणण्यासाठीही निर्णय घेण्याच्या प्रक्रियेची सुरुवात लोकांच्या सहभागाने स्थानिक पातळीवरून झाली पाहिजे यावर भर देण्यात आला आहे. राजकारणातील अधिकारशाहीच्या प्रवृत्ती, मग त्या पक्ष संघटनतील असोत वा शासनातील असोत, दूर करण्याकरता लोकसमित्यांची रचना व कार्यपद्धती यांत अपरिहार्यपणे स्थानिक पातळीवर सर्व लोकांचा सहभाग व निर्णय घेण्याचे त्यांचे स्वातंत्र्य यांवर भर आहे.

लोकसमित्यांची रचना

खेड्यांपासून ते लोकसभा मतदार संघापर्यंत समित्यांची निर्मिती करण्याची योजना आहे. ग्रामसमिती ही खेड्यातील सर्व लोकांनी एकत्र येऊन निवडावयाची आहे. निवडणूक बहुमताने न होता ती सर्वसंमतीने व मतदान न घेता करावयाची आहे. ग्राम लोकसमितीत ५ ते १५ सभासद असावेत. त्यांनी आपला संयोजक निवडायचा आहे. ग्रामसमितीची बैठक १५ दिवसांनी होईल व आमसभेची म्हणजे सर्व ग्रामस्थांची बैठक महिन्यातून एक वेळ होईल. ग्राम लोकसमिती हा आधारभूत घटक मानून पंचायत लोकसमिती तयार होईल. त्यात ग्रामसमितीचे संयोजक व २ प्रतिनिधी मिळून ११ ते १५ पर्यंत सभासद असतील. पंचायत समिती आपला संयोजक निवडील. महिन्यातून कमीत कमी एकदा पंचायत समितीची बैठक घेतली जाईल. पंचायत समित्यांमधून ब्लॉक समिती तयार होईल. ब्लॉक समितीत पंचायत समितीचे प्रत्येकी एक संयोजक व चार प्रतिनिधी मिळून १०० सभासद असतील. दोन महिन्यांतून एकदा ब्लॉक समितीची बैठक होईल. विधानसभाक्षेत्र लोकसमितीत पंचायत समितीचे संयोजक व प्रत्येकी ४ प्रतिनिधी असे १५० सभासद असतील व लोकसभा निर्वाचनक्षेत्र लोकसमितीत पंचायत समितीचे संयोजक व चार प्रतिनिधी मिळून ५०० ते ७५० सभासद असावेत अशी कल्पना आहे. वर्षातून एकदा त्यांची बैठक बोलावली जाईल. त्यात निर्वाचित एम. एल. ए व एम. पी. यांचाही समावेश करता येईल.

शहरातून शेजार हे तत्त्व स्वीकारून १०० ते २०० घरांचे मूळ घटक मानून त्यातील सर्व नागरिकांनी एकत्र येऊन आपली लोकसमिती कायम करण्याची कल्पना आहे. त्यानंतर वॉर्ड, विधानसभा, निर्वाचनक्षेत्रसमिती,

लोकसभा निर्वाचनक्षेत्रसमिती तयार करताना त्यांचे स्वरूप ग्रामीण भागातील समित्यांसारखेच असेल.

सर्व घटक समुदायांना, तसेच निरनिराळ्या वर्गांना, जमातींना, तरुणांना, स्त्रियांना, हरिजन, आदिवासी, मुसलमान इ. घटकांना लोकसमित्यांवर सर्व स्तरांवर प्रतिनिधित्व दिले जावे याची काळजी घ्यावयाची आहे. प्रतिनिधी निवडताना ती व्यक्ती समाजकार्यात रस घेणारी व विशुद्ध आचरणाची असावी व राजकीय हितसंबंध वर्ज्य मानणारी असावी अशी कल्पना आहे.

लोकसमित्यांची कार्ये

लोकसमित्यांचे मुख्य कार्य प्रशासनावर व सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे हे आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी प्रतिनिधींवर अंकुश ठेवण्याची गरज आहे आणि लोकांचे सहकार्य असल्याशिवाय नवी समाजरचना निर्माण करता येत नाही या दोन तत्त्वांवर लोकसमित्यांची आवश्यकता प्रतिपादन करण्यात आली आहे. सरकारवर अंकुश ठेवताना लोकसमित्या केवळ संघर्षाची भूमिका घेणार नाहीत. अन्याय व गैरकारभार यांविरुद्ध संघर्षाची भूमिका घेणे अपरिहार्य असेल तर लोकसमित्यांनी तसे अवश्य करावे परंतु संपूर्ण क्रांतीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरता त्यांनी संघटन, शिक्षण व विधायक आणि रचनात्मक कार्यक्रमही स्वीकारणे आवश्यक आहे.

लोकसमित्यांची कल्पना प्रशासन व पक्षीय राजकारण यांच्याशी समांतर अशी तिसरी शक्ती म्हणून केलेली आहे. पक्षीय राजकारणातून केंद्रीकरणाच्या व बेजबाबदार प्रवृत्ती वाढतात. यांना लोकशक्ती लोकसमित्यांमार्फत आळा घालील. हे काम लोकशिक्षण, लोकजागृती, संघटन, सामाजिक व आर्थिक परिवर्तन यांच्याद्वारे घडवून आणण्याची कल्पना आहे. लोकसमित्यांमध्ये उदार-मतवादी व परिवर्तनास अनुकूल असणारे घटक यावेत अशा प्रकारचे विशेष प्रयत्न केले पाहिजेत. लोकसमित्यांचे उद्दिष्ट म्हणून पुढील गोष्टींवर भर देण्यात आला आहे –

१. न्यायाधिष्ठित, शोषणरहित व मुक्त समाजव्यवस्था घडवणे.
२. सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत मूलभूत बदल घडवून आणणे व त्याकरता विधायक कार्य करणे.
३. लोकांना राजकीय प्रक्रियेत प्रत्यक्ष भाग घेण्यास प्रवृत्त करणे.
४. राजकीय व आर्थिक क्षेत्रांत स्वावलंबन व विकेंद्रीकरण यांवर भर देणे.
५. सार्वजनिक जीवनाचे शुद्धीकरण करणे.

ही उद्दिष्टे पूर्ण करण्याकरता लोकसमित्यांना पक्षीय राजकरणापासून मुक्त ठेवले पाहिजे व याकरता पुढील तरतुदी आवश्यक मानलेल्या आहेत--

१. लोकसमितीचे सभासद म्हणून अशी कोणतीही व्यक्ती निवडू दिली जाणार नाही, जी राजकीय पक्षात अधिकारावर असेल.

२. राजकीय पक्षात सभासद असणारी कोणतीही व्यक्ती लोकसमितीत संयोजक अथवा पदाधिकारी असणार नाही.

३. राजकीय पक्षाची सभासद असणारी व्यक्ती लोकसमित्यांतून प्रतिनिधी म्हणून पाठवता येणार नाही.

लोकसमित्यांची कल्पना अशाप्रकारे प्रशासन व प्रतिनिधी यांना पूरक शक्ती म्हणून केलेली आहे. यांत येणाऱ्या सभासदांनी पक्षनिष्ठ भूमिका न घेता राजकीय संस्थांना भ्रष्टाचारापासून मुक्त करण्याची भूमिका घ्यावी व त्याकरता लोकशक्ती संघटित करावी अशी कल्पना आहे. लोकसमितीच्या सभासदांनी जात, धर्म, वर्ग अशा भेदभावापासून मुक्त असले पाहिजे व सत्तेपासून अलिप्त राहून राजकारण केले पाहिजे. सामान्य माणसाच्या हिताची जपणूक करणे हे लोकसमित्यांचे मुख्य कार्य आहे.

लोकसमित्यांचे कार्य ग्रामीण व शहरी भागातून काही अंशी भिन्न राहील. ग्रामीण भागाकरता पुढील गोष्टींवर भर देण्यात आला आहे –

१. जमीनधारणा कायद्यांची अंमलबजावणी करणे व शेती सुधारणेचा कार्यक्रम ठरवणे.

२. दुर्बल घटकांच्या विकासाच्या योजना अमलात आणणे, रोजगार हमी योजना राबवणे, किमान वेतन मिळवून देणे व शेतकऱ्यांना कर्ज व सवलती मिळवून देणे.

३. प्रौढ शिक्षण व माहिती देणे.

४. कुटुंब कल्याण व कुटुंब नियोजन, स्त्रियांच्या सामाजिक परिस्थितीत सुधारणा, सामाजिक मूल्यांत परिवर्तन, पिण्याच्या पाण्याची तरतूद, अस्पृश्यता निवारण हे कार्यक्रम राबवणे.

शहरांमधून व्यावसायिकांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे व्यावसायिक नीतिमत्ता वाढवण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच सामाजिक हिताकरता कायदे कसे राबवून घेता येतील यावर शिक्षित लोकांनी व कायद्याच्या अभ्यासकांनी व व्यावसायिकांनी लक्ष देण्यावर भर आहे. लोकसमित्यांना अशा

लोकांनी पूर्ण वेळ अथवा फुरसतीचा वेळ उपलब्ध करून द्यावा अशी अपेक्षा आहे.

भ्रष्टाचाराच्या विविध स्वरूपांचा अभ्यास करून ते दूर करण्याकरता संघर्ष करण्यावर भर देण्यात आला आहे. भ्रष्टाचाराची पुढील पाच रूपे नमूद करण्यात आली आहेत–

१. काम करून घेण्यासाठी लाच देणे.
२. काम लवकर व्हावे म्हणून लाच देणे.
३. बेकायदेशीर कार्य लपवण्याकरता लाच देणे.
४. काम केल्यावर बक्षिसी म्हणून स्वेच्छेने पैसे देणे.
५. जाती, नातीगोती व राजकीय हितसंबंधांच्या आधारावर सवलती मिळवून देणे.

भ्रष्टाचार दूर करण्याकरता लोकसमित्यांनी अहिंसक प्रतिकार, प्रशासकीय सुधारणा, कायद्यात सुधारणा, व्यवस्थात्मक बदल, या मार्गांचा अवलंब करावा व त्याकरता दडपण आणावे असे सुचवण्यात आले आहे.

लोकसमित्यांचे परीक्षण

लोकसमित्यांच्या निर्मितीमध्ये स्थानिक पातळीपासून ते राष्ट्रीय पातळी–पर्यंत पिरॅमिड पद्धतीची रचना आहे. यात ग्रामसमिती अथवा वार्डसमिती वगळता लोकांच्या प्रत्यक्ष सहभागाऐवजी वरच्या स्तरावरील समित्यांचे सभासद कनिष्ठ स्तरावरील समित्यांकडून निवडून देण्याचे तत्त्व स्वीकारलेले आहे. केंद्रीकरणाच्या प्रक्रियेविरुद्ध विकेंद्रीकरणाची प्रक्रिया पूर्णत्वाला नेण्या-करता आवश्यक असलेला जनतेचा सहभाग अशा प्रकारे मर्यादित आहे. लोक-समितीत लोकांचा आपल्या प्रतिनिधीशी सुसंवाद असेल असे म्हटले तर हीच गोष्ट प्रस्थापित व्यवस्थेत घडवून आणता येत नाही काय असा प्रश्न निर्माण होतो. परंतु लोकांचा निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सहभाग असावा असे म्हटले तर लोक-समित्यांमार्फत हे कार्य पूर्णपणे साध्य होत नाही असे दिसून येते. एकंदरीत लोकशाहीत जनतेचा सहभाग हा गुंतागुंतीचा प्रश्न आहे व तो तसाच शिल्लक राहतो.

लोकसमित्यांवर आधारलेली लोकशाही प्रत्यक्ष असावी की अप्रत्यक्ष अथवा प्रातिनिधिक असावी ? नवमानवतावाद्यांनी यावाबत प्रत्यक्ष लोकशाहीचा पुरस्कार केला आहे. परंतु विकेंद्रीकरणाची प्रक्रिया जिल्ह्यापलीकडे जाऊ

शकत नाही हे ते मान्य करतात. स्थानिक समस्यांचा विचार नागरिकांनी एकत्र येऊन करण्यावर त्यांचा भर आहे. जयप्रकाश नारायण यांना ही भूमिका मान्य असावी.

लोकसमित्यांची संघटना पक्षनिष्ठेच्या तत्त्वापासून वेगळी ठेवली पाहिजे असे मानून त्यांची रचना करण्यात आली आहे. लोकसमित्या संघटित करताना मात्र पक्षसंघटना कितीही अनिष्ट असल्या तरी व्यावहारिक दृष्ट्या त्यांचे अस्तित्व गृहीत धरून विचार केलेला दिसतो. लोकसमित्या पक्षनिरपेक्ष असाव्यात हा उद्देश अशा परिस्थितीत साध्य होईल काय ? एकदा पक्षसभासदांना समितीत प्रवेश दिल्यानंतर स्थानिक पातळीवर का होईना, तेथे राजकारण शिरणार नाही कशावरून ? हा अर्थातच प्रयोगांती सिद्ध होणारा मुद्दा आहे. परंतु आजघटकेला राजकीय पक्षांतील मतभेद लोकसमित्यांत येण्याची शक्यता अधिक सयुक्तिक वाटते. परंतु जर राजकीय पक्षाचे सभासद लोकसमित्यांत घेतले नाहीत तर ते कमी उपद्रवकारक ठरण्याची शक्यता नाही. अशा स्थितीत लोकसमित्या सर्वसमावेशक असणार नाहीत आजच्या संदर्भात कदाचित अशा लोकसमित्यांची कार्यक्षमता राजकीय कार्यकर्त्यांच्या अभावी कमी होईल. राजकारणापासून दूर राहण्याच्या प्रयत्नांत त्या दिशाहीन होण्याचीही शक्यता आहे.

या शंकांना असे उत्तर देता येईल की स्थानिक पातळीवर नागरिकांशी संबंधित प्रश्न इतक्या प्राथमिक गरजेचे असतात की त्यांत राजकारण येण्याची शक्यताच नाही. पण असे राजकारण आल्यामुळेच ग्रामपंचायत व नगरपालिका यांसारख्या संघटना स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून अकार्यक्षम व भ्रष्टाचाराचे मूळ बनलेल्या आहेत. राजकारणी लोकांना लोकसमित्यांमधून महत्त्व नसावे या कल्पनेमागे उद्देश हा आहे की लोकसमित्यांचे प्रमुख कार्य सर्व स्तरांवर, शासनावर व प्रशासनावर अंकुश ठेवण्याचे असावे. याकरता तक्रारींना प्रसिद्धी देणे, लोकमत संघटित करणे, भ्रष्टाचार दूर करणे, माहिती प्रसिद्ध करणे व स्थानिक लोकसमित्यांचे समन्वय करणे ही लोकसमित्यांची प्रमुख कार्ये आहेत.

लोकसमित्या राजकीय पक्षांपासून अलिप्त ठेवण्यामागे राजकीय पक्षांविषयी कटुता व भीती व्यक्त होते. लोकांना संघटित करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले असता राजकीय पक्षांबद्दल दिसून येणारी ही भीती चमत्कारिक वाटते. लोकसमित्यांत राजकीय सभासदांना प्रवेश दिल्यानंतर जर लोकसमित्या चर्चेपेक्षा कार्यक्रमावर भर देणाऱ्या संस्था बनल्या तर राजकीय कार्यकर्त्यांकडून भीती बाळगण्याचे कारण असणार नाही असे वाटते.

लोकसमित्यांच्या रचनेमध्ये भ्रष्टाचार निर्मूलनाचे उद्दिष्ट साध्य करणे हे विशेष महत्त्वाचे मानले गेले आहे. भ्रष्टाचारात राजकारणी, प्रशासक व व्यापारी यांची भागीदारी आहे असे जयप्रकाश नारायण म्हणतात. भ्रष्टाचार शासन व लोक यांचा जेथे संबंध येतो तेथे निर्माण होतो व आजची राज्य-यंत्रणा विशाल व व्यापक स्वरूपात नियंत्रण करणारी असल्यामुळे ती 'परमिट-लायसेन्स राज' या भ्रष्ट स्वरूपात आज आढळून येते. लोकसमित्या भ्रष्टाचार थांबवू शकतील तर सामर्थ्यवान बनतील. त्यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध सातत्याने झगडा द्यावयाचा आहे. भ्रष्टाचाराची प्रकरणे पक्षनिष्ठेच्या नावाखाली आज दडपली जातात ती उघडकीस आणणे व कायद्यातील पळवाटा बुजवण्यासाठी मोहीम सुरू करणे हे त्यांचे महत्त्वाचे कार्य आहे. प्रशासनावर त्यामुळे लोक-समित्यांचा वचक बसेल व जेथे राजकारणाच्या जोरावर भ्रष्टाचार लपवण्याचा प्रयत्न होईल तेथे लोकसमित्या सत्याग्रह व अहिंसात्मक प्रतिकार या मार्गाने संघर्ष करतील.

भ्रष्टाचाराने पोखरलेली व्यवस्था बदलणे हा संपूर्ण क्रांतीचा एक महत्त्वाचा भाग आहे. भ्रष्टाचार जरी वरिष्ठ पातळीवरून चालत असला तरी सामान्य माणसाला त्याची झळ सोसावी लागते व म्हणून स्थानिक पातळीवरून भ्रष्टाचाराला आळा घालण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत व भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचे शिक्षण लोकांना दिले गेले पाहिजे. शहरांतील लोकांनी यात पुढाकार घ्यावयाचा आहे.

आपल्या येथे ज्या परंपरा ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून चालत आलेल्या आहेत त्यांत लोकांविषयी बेपर्वाईची वृत्ती असणारा प्रशासक वर्ग ही सर्वांत वाईट गोष्ट आहे. हा वर्ग पूर्वीच्याच परंपरा बाळगून आहे व तो लोकहिताऐवजी आपली कातडी बचावण्याचे धोरण कसे स्वीकारतो हे आणीबाणीच्या अतिरेकांच्या घटनांमधून व भ्रष्टाचाराची प्रकरणे ज्या तत्परतेने कोर्टातून काढून घेण्यात आली त्यातून आता स्पष्ट झाले आहे. या वर्गाला दिलेल्या सवलती व संरक्षण यांचा वापर सरकार चालवण्यात आपले विशिष्ट हितसंबंध गुंतलेले आहेत असे समजून झालेला आहे. याचा परिणाम म्हणजे नोकरशाहीच्या पोलादी चौकटीत कोणत्याही प्रकारची गतिशीलता नाही व लोकांच्या गरजे-प्रमाणे बदलण्याची भावना नाही. नोकरशाहीवर जी अनेक नियंत्रणे बसवण्याची गरज आज जाणवत आहे, त्यात गैरकारभाराची सार्वजनिक चौकशी व शहानिशा यांचे अत्यंत महत्त्व आहे. याची सुरुवात लोकसमित्यांमार्फत करता येईल.

लोकसमित्यांचे आणखी एक कार्य हे राजकीय शिक्षणाचे आहे. याचे स्वरूप समजून घेताना लोकसमित्यांनी विधायक व टीकात्मक अशा दोन्ही प्रकारचे कार्य करावयाचे आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. स्थानिक पातळीवर गरजा निश्चित करणे व त्यांची मागणी करणे, प्रशासनाशी स्थानिक गरजा भागवण्याकरता सहकार्य करणे व प्रशासनातील गैरकारभारावर टीका करणे, वरिष्ठ प्रातिनिधिक संस्थांचे उमेदवार निश्चित करणे व प्रतिनिधीस परत बोलावणे, कायदा राबवणे व त्यात आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती करणे या स्वरूपात विधायक व टीकात्मक भूमिका परस्परपूरक आहेत व परस्परविरोधी नाहीत असे म्हणता येईल. प्रशासनाच्या कार्यात सहभागी होणे व निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत भागीदारी यामधून स्थानिक पातळीवर राजकीय शिक्षण प्रत्येक व्यक्तीला मिळू शकेल. लोकसमित्यांमध्ये निवडणुकीची प्रक्रिया वर्ज्य असल्यामुळे यामध्ये हितसंबंधी गट वा व्यक्ती सत्ता आपल्याजवळ केंद्रित करून तिचा स्थानिक पातळीवर वापर करू शकतील याची शक्यता जरी सर्वस्वी नाकारता येत नसली तरी संस्थात्मकदृष्ट्या वरीचशी कमी करण्यात येऊ शकते. अर्थात लोकसमित्यांमध्ये कशा प्रकारचे कार्यकर्ते येतील, त्यांचा शिक्षणाचा दर्जा काय असेल व त्यांची नैतिक मूल्ये कशा स्वरूपाची असतील यावर हे अवलंबून राहील. याहीपेक्षा कार्यकर्त्यांची घोषित उद्दिष्टांबाबत बांधिलकी कितपत ते स्वतः होऊन मानतील यावर बरेचसे अवलंबून असेल. कार्यकर्ते हे नेहमी राजकारणात भाग घेणारेच असतात हे एकांगी विधान अमान्य केल्यास लोकसमित्यांमध्ये पक्षीय राजकारणापासून दूर राहणारे कार्यकर्ते मिळू शकतील. त्यांच्या शिक्षणाचा दर्जा वाढवण्याचे प्रयत्न कदाचित करावे लागतील. शिक्षण म्हणजे केवळ औपचारिक शिक्षण असे मानण्याचे कारण नाही. राजकारणातील सत्तास्थान वर्ज्य मानल्यामुळे नैतिक मूल्यांच्या बाबतीत लोकसमिती राजकीय पक्षापेक्षा निर्दोष असण्याची शक्यता आहे.

राजकीय शिक्षणाचे आणखी एक स्वरूप स्थानिक विकासाच्या योजना आखण्याचे असू शकेल. आज ही जबाबदारी शासनावर सोपवण्यात आलेली असून ती वरून लादण्यात येते. स्थानिक स्वराज्य संस्थांना मर्यादित अधिकार आहेत व या अधिकारांच्या कक्षेत व तुटपुंज्या साधनसंपत्तीवर स्थानिक विकासाचा कार्यक्रम त्यांना हाती घ्यावा लागतो. लोकसमित्या या स्वावलंबनावर भर देणाऱ्या संघटना असतील व शासनावर अवलंबून राहण्याऐवजी त्या सहकारितेच्या तत्त्वावर उद्योगधंद्यापासून ते सार्वजनिक हिताच्या सोयी उपलब्ध करून देण्यापर्यंत सर्वच प्रकारच्या योजना आखू शकतील.

राजकीय मूल्यांच्या बाबतीत शिक्षणाद्वारे क्रांती घडवून आणण्याचे उद्दिष्ट लोकसमित्यांमार्फत साधायचे आहे. याकरिता लागणारे कार्यकर्ते नवीन समाजरचनेवर भर देणारे असतील. परंपरागत अशा मूल्यांचा त्याग करून त्यांनी समता व व्यक्तिस्वातंत्र्य तसेच सहकार्य या मूल्यांवर भर द्यावयाचा आहे. विषम समाजव्यवस्था, ज्यात धर्म, जात, लिंगभेद, आर्थिक हितसंबंध यांवर भर दिला जातो, बदलणे हे या कार्यकर्त्यांचे मुख्य उद्दिष्ट राहील. विकेंद्रित अर्थव्यवस्था– ज्यामध्ये कुटीरोद्योग, लघूद्योग, स्वतःचा रोजगार, जमिनीचे पुनर्वाटप, ग्रामविकास हे समाविष्ट असतील– उभी करण्याकरिता लोकसमित्या प्रचार कार्य करतील व प्रशासनाला सहकार्य करतील किंवा गैरकारभाराचे स्वरूप उघडकीस आणतील. येथे पुन्हा लोकसमित्या किती कार्यक्षम असतील हे त्यांतील कार्यकर्त्यांच्या शिक्षणावर व नैतिक मूल्यांवर अवलंबून असेल.

लोकसमित्यांची कल्पना जयप्रकाश नारायण यांनी मानवेन्द्रनाथ राय यांच्याकडून व राय यांनी ती रशियन राज्यक्रांतीपूर्व सोव्हियट संघटनांमधून स्वीकारलेली आहे. रशियन राज्यक्रांतीपूर्व सोव्हियट संघटना या लोकसमित्यांची मूळ कल्पना दर्शविणाऱ्या आहेत. या संघटना उत्पादनाच्या क्षेत्रांत कारखाने व सामुदायिक शेतांवर तसेच उपभोक्त्यांच्या क्षेत्रांत– प्रादेशिक तत्त्वावर आजही अस्तित्वात आहेत कारखान्यातून व काम करण्याच्या ठिकाणी सर्व कामगारांनी एकत्र येऊन आपल्या प्रश्नांचा विचार करणे व निर्णय घेणे हे त्यांचे स्वरूप होते. रशियन राज्यक्रांतीत व तत्पूर्वी या संघटनांचे स्वरूप, सरकारशी प्रतिस्पर्धी अशी जनशक्तीवर आधारलेली संघटना, अशा प्रकारचे होते. राज्यक्रांती घडवून आणण्यात कामगार व सैनिकांच्या सोव्हियट संघटनांचा मोठा हातभार होता. आज या संघटना शासनाच्या प्रक्रियेत मूळ घटक म्हणून अस्तित्वात आहेत. पण त्यांच्यावर कम्युनिस्ट पक्षाचे नियंत्रण असल्यामुळे त्या विकेंद्रित लोकशाहीच्या प्रतीक आहेत असे म्हणता येत नाही. चीनमधील सांस्कृतिक क्रांतीमध्ये अशा संघटनांनी प्रशासनातील गैरकारभाराला आळा घालण्याचे काम केले आहे.

भारतीय राज्यव्यवस्थेत लोकसमित्यांचे स्वरूप या प्रकारचे असेल काय हा वादग्रस्त प्रश्न आहे. सरकारला प्रतिस्पर्धी संघटना म्हणून लोकसमित्या उभ्या केल्या तर त्यांचे उद्दिष्ट एकतर समाजक्रांती घडवून आणणे आहे असे मानावे लागेल नाहीतर प्रशासन व सरकार यांच्यावर दडपण ठेवणारी शक्ती म्हणून त्यांचे अस्तित्व मान्य करावे लागेल. या स्वरूपात त्यांचे अस्तित्व सरकार सहन करील काय असा प्रश्न उपस्थित होतो. लोकसमित्या समाजक्रांतीचे साधन

बनल्या नाहीत तर सरकारशी त्यांचा अनेक प्रश्नांवर संघर्ष घडून येऊ शकतो व कोणाचे श्रेष्ठत्व मान्य करायचे हा वादाचा मुद्दा ठरू शकेल.

या गुंतागुंतीची सोडवणूक करण्याकरता असे सांगण्यात येते की लोकसमित्या प्रादेशिक किंवा राष्ट्रीय पातळीवर संघटित करण्यात येऊ नयेत. आज अस्तित्वात असलेली प्रातिनिधिक व्यवस्था या स्तरावर चालू राहावी. फक्त स्थानिक पातळीवर स्थानिक स्वराज्यसंस्थेऐवजी लोकसमिती संघटित केली जावी. निवडणुकीच्या प्रक्रियेतून येणारी गटबाजी, पक्षनिष्ठा, सत्तेचे राजकारण यांमुळे स्थानिक प्रश्नांची सोडवणूक होऊ शकत नाही. लोकांच्या गाऱ्हाण्यांकडे लक्ष दिले जात नाही, सत्तेचे केंद्रीकरण होते व लोकसार्वभौमत्व हे केवळ प्रातिनिधिक सार्वभौमत्व या स्वरूपात शिल्लक राहते. हे आजच्या प्रक्रियेतील दोष लोकसमित्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जागी कार्य केल्यामुळे दूर होऊ शकतील. परंतु हे आज शक्य नसल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांवर नियंत्रण ठेवणे, त्यांचा गैरकारभार उघड करणे, प्रशासनाचे दोष शोधून काढणे, प्रतिनिधींना जाब विचारणे या स्वरूपाची टीकात्मक कार्ये लोकसमित्या करू शकतील. यांचे महत्त्व कमी आहे असे मानण्याचे कारण नाही. भ्रष्टाचाराला आळा बसवून, आहेत त्या संस्थांना कार्यप्रवण केले तरी लोकसमित्यांनी महनीय कार्य केले असे समजण्यास जागा आहे.

लोकसमित्यांची विधायक बाजू महत्त्वाची आहे. योग्य प्रतिनिधी निवडून देण्यासाठी लोकमत जागृत करणे, राजकीय शिक्षण देणे, स्थानिक प्रश्नांमध्ये लक्ष घालण्यास प्रत्येक नागरिकाला प्रवृत्त करणे, आपल्या कक्षेत येणाऱ्या खेड्यात व वार्डात विकासकार्यांची योजना आखणे व स्वयंसेवी तत्त्वांवर त्या राबवणे या स्वरूपात लोकसमित्यांचे कार्य यशस्वी करता येणे शक्य आहे. परंतु राजकीय पक्षांचे यावाबत धोरण व अधिक महत्त्वाचे म्हणजे शासनाचे धोरण लोकसमित्यांचे कार्य यशस्वी होण्यास निर्णायक ठरू शकेल.

* * *

भारतीय राष्ट्रवादाचा आध्यात्मिक आशय

सौ. शशिकला जोशी

जयप्रकाश नारायण यांनी भारतीय राष्ट्रवादाविषयीच्या आपल्या कल्पना १९६२ साली दादाभाई नौरोजी व्याख्यानमालेतून दिलेल्या भाषणातून स्पष्ट केलेल्या आहेत. त्यांची भारतीय राष्ट्रवादाची कल्पना आक्रमक व संकुचित राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारी नाही. मानवसमाजाचा एक घटक म्हणून त्यांचा राष्ट्रवाद राष्ट्रांतर्गत लहान समुदायाच्या स्वायत्ततेवर भर देणारा आहे. या समुदायातून व्यक्तींचे संबंध सामाजिक न्याय व बंधुत्व या संकल्पनांवर तयार झालेले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत राष्ट्रांनी आपले तंटे नैतिक व आंतरराष्ट्रीय कायद्यांना अनुसरून सोडवावेत यावर जयप्रकाश नारायण भर देतात. या भूमिकेतून त्यांनी काश्मीर, गोवा, चीन व पाकिस्तान यांच्या संदर्भात भारत सरकारच्या धोरणावर केलेली टीका एक वादाचा विषय होता. परंतु त्यांच्या विचारांची एकंदर बैठक समजून घेतल्यानंतर त्यांचा अनाग्रही व मानवतेवर आधारलेला राष्ट्रवाद हा सुसंगत असल्याची जाणीव होते.

जयप्रकाश नारायण यांच्या दृष्टीने भारतापुढे तीन मूलभूत समस्या आहेत. १. राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रीयत्वाची भावना. २. राष्ट्रीय समुदायाची उभारणी. ३ भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध.

१. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न

राष्ट्र या संकल्पनेचा विचार करताना जयप्रकाश नारायण पुढील गोष्टींवर भर देतात–

१. राष्ट्र ही संकल्पना मुळात 'जमात' या संकल्पनेचे उत्क्रांत रूप आहे. राष्ट्रवाद व सांस्कृतिक विकास यांचा परस्पर संबंध नाही. सांस्कृतिक विकासाबरोबर राष्ट्रीयत्वाची भावना दुर्बल होते.

२. राष्ट्रीयत्वाची भावना राष्ट्रनिर्मितीसाठी आवश्यक आहे. परंतु तिचे नेमके स्वरूप काय आहे हे सांगणे कठीण आहे. त्याबद्दल एकवाक्यता आढळत नाही.

३. भावनिक आधारावर तयार झालेले राष्ट्र व कायदेशीर मान्यता असलेले राष्ट्र या वेगळ्या गोष्टी आहेत. कायदेशीर राष्ट्राकरता (१) स्वतःचा प्रदेश (२) राज्य व राजकीय ऐक्य (३) इतर राष्ट्रांची त्याला राष्ट्र म्हणून मान्यता, या तीन गोष्टींची गरज असते. कायदेशीर राष्ट्रांतर्गत भावनिक आधारावर तयार होणारी अनेक राष्ट्रे असतील.

४. ऐतिहासिक दृष्ट्या राष्ट्रांचे दोन वर्ग पडतात. १. युरोपातील राष्ट्रे. ही फ्रेंच राज्य-क्रांती व औद्योगिक क्रांती यांतून निर्माण झालेल्या शक्तींनी तयार झाली. ही स्वयंभू अथवा मूळ राष्ट्रे होती. २. या राष्ट्रांच्या वर्चस्वाखाली असलेल्या प्रदेशांतून व वसाहतींमधून प्रतिक्रियात्मक रूपाने तयार झालेली राष्ट्रे.

भारताची राष्ट्र या रूपाने कल्पना करताना तिसरा व चौथा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. ब्रिटिश सत्तेच्या वर्चस्वाखाली भारतीय राष्ट्रीयत्वाची भावना जन्माला आली. ब्रिटिश सत्ता नसती तर संपूर्ण भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेची कल्पना करण्याची शक्यताही नसती. ब्रिटिशांच्या वर्चस्वाला विरोध करण्याकरता निरनिराळे भाषिक प्रांत व त्यांतील लोक एकत्र आले. एरव्ही ते एकमेकांपासून वेगळे राहिले असते. सांस्कृतिक ऐक्याची आपण कल्पना करतो. परंतु हे सांस्कृतिक ऐक्य भारताला एक राष्ट्र बनवण्यास कधी समर्थ ठरले नाही. फ्रेंच राज्यक्रांतीतून निर्माण झालेली शक्ती राजेशाही व सरंजामशाही यांना मारक ठरली. त्यातून लोकसार्वभौमत्वाची कल्पना आली. औद्योगिक क्रांतीतून सरंजामशाही व्यवस्था संपुष्टात आली. भांडवलशाही बरोबर एक नवीन मध्यम वर्ग वाढला व आक्रमक राष्ट्रवाद निर्माण झाला. अशा प्रकारच्या शक्ती भारतामध्ये स्वयंभूरीत्या निर्माण होण्याची मुळातच शक्यता नव्हती. त्यामुळे भारतीय राष्ट्रवाद ब्रिटिश साम्राज्याचे फलित आहे असे म्हणावे लागेल.

भारतीय राष्ट्रवादाला अशाप्रकारे ऐतिहासिक संदर्भ आहे. शिवाय स्वातंत्र्याबरोबर भारताचे विभाजन झाले हेही विसरता येत नाही. भारत व पाकिस्तान ही अनुक्रमे हिंदू व मुस्लिम राष्ट्रे बनली नाहीत. द्विराष्ट्रवादाचे विषारी तत्त्वज्ञान देशाच्या विभाजनाला कारणीभूत झाले पण त्याने प्रश्न सुटू शकला नाही. हिंदू व मुसलमान हे भारतामध्ये एकत्र राहिले. पाकिस्तानची

निर्मिती कोणताच प्रश्न सोडवू शकली नाही व केवळ ऐतिहासिक मूर्खपणाचे प्रतीक ठरली असे जयप्रकाश सांगतात,

परंतु या सर्व गोष्टींतून ते असे प्रतिपादन करतात की भारताची सीमारेषा हा केवळ ऐतिहासिक योगायोग आहे. या सीमेविषयी आपण भावनावश होणे किंवा त्याला पावित्र्याची कल्पना जोडणे हे चुकीचे आहे. ब्रिटिश सत्तेमुळे भारतीय राष्ट्रीयत्वाची भावना आली व ही सत्ता जाताना देशाचे विभाजन झाले. परंतु ब्रिटिश सत्ता आली नसती तर अखंड हिंदुस्थानची शक्यता कमी राहिली असती व राष्ट्राचे स्वरूपदेखील वेगळे राहिले असते.

जयप्रकाश नारायण असे मानतात की भारतीय मनाला एका व्याधीने ग्रासलेले आहे. देशाचे विभाजन होण्यातून जी वेदना, जो राग व जे वैफल्य निर्माण झाले त्याला अधिक चांगली दिशा देण्याकरता आपण इतिहासाकडे अधिक निरामय दृष्टीने पाहण्यास शिकले पाहिजे.

एकंदरीत राष्ट्र म्हणजे फार मोठी किंवा चांगली कल्पना आहे असे जयप्रकाश मानीत नाहीत. ते राष्ट्राची उणेची बाजू म्हणून पुढील तीन गोष्टींचा उल्लेख करतात–

१. ऐक्य निर्माण करण्याची शक्ती : जमात भावना व स्थानिकवाद यातून उत्क्रांत झालेला राष्ट्रवाद.
२. राष्ट्रांतर्गत सुसभ्य समाजाची वाढ होणे.
३. ममतेची वाढ होणे; ही ममता आर्थिक, सामाजिक, राजकीय स्वरूपाची असेल.

राष्ट्राच्या उणेच्या बाजूत पुढील तीन गोष्टींचा समावेश होतो–

१. विभाजनाची शक्ती, राष्ट्राराष्ट्रांतील फरक तीव्रतर होतात.
२. राष्ट्राराष्ट्रांतील संघर्ष व द्वेषाची भावना.
३. शोषण, युद्ध वगैरे.

जयप्रकाश नारायण यांच्या दृष्टीने राष्ट्रवादाचे दोष दूर करण्याकरता त्याला मानवतेचा आधार देण्याची गरज आहे. त्यांचे विचार गांधी व टागोर यांच्या कल्पनांशी अधिक जुळणारे आहेत.

२. राष्ट्रीय समुदायाची उभारणी

स्वतंत्र भारताची रचना करताना गांधींच्या विचारांचा राजकीय पक्षांना विसर पडावा याचा जयप्रकाश नारायण यांना मोठा खेद होतो. भारतीय नीति-

मूल्ये गांधींच्या विचारांमधून प्रकर्षाने आढळतात व त्यांचाही नवी व्यवस्था निर्माण करताना विचार झाला नाही. नेहरूंनी भारतीय आध्यात्मिकतेचा उपहास केला व भारताच्या तुलनेने पाश्चात्त्य देशांतून अधिक आध्यात्मिकता आढळते असा दावा केला. कदाचित हा दावा खरा असेल. परंतु भारतीय मनाला नेहमीच आध्यात्मिक मूल्यांचे आकर्षण वाटलेले आहे हे मान्य केले पाहिजे. खुद्द नेहरूंनी हे मान्य केले आहे की आजच्या वैज्ञानिक युगात विज्ञानावर आध्यात्मिकतेचे नियंत्रण नसेल तर मानवजातीकरता विज्ञान हे संहारक ठरू शकेल. केवळ विज्ञान कोणती व्यवस्था किंवा तत्त्वज्ञान निर्माण करू शकत नाही. विज्ञान व आध्यात्मिकता एकमेकांना पूरक आहेत. कारण आध्यात्मिकता विज्ञानाचा उपयोग मानव जीवनाच्या हिताकरता कसा करावा हे सांगते.

जीवनाविषयीच्या सर्व भारतीय तत्त्वज्ञानामधून मानवाच्या समन्वित विकासाच्या कल्पनेचा पुरस्कार केलेला आहे. व्यक्तीच्या जीवनाच्या दोन कक्षा आहेत. एक त्याची स्वतःची, एकान्तिक, आध्यात्मिक शोध घेणारी पारमार्थिक बाजू व दुसरी त्याची सामाजिक जीवनाची बाजू. भारतीय तत्त्वज्ञानात सामाजिक बाजूकडे सदैव दुर्लक्ष झाले आहे असे जयप्रकाश नारायण यांना वाटत नाही. परंतु त्यात व्यक्तीच्या पारमार्थिक बाजूवर अधिक भर देण्यात आला आहे व विशेषकरून असे राष्ट्रीय अवनतीच्या काळात अधिक घडून आले असे त्यांना वाटते. भारतीय जीवनपद्धतीचा हा विशेष जयप्रकाश नारायण महत्त्वाचा मानतात व ऐहिक जीवनातील सुखसमृद्धीबरोबर आध्यात्मिक शोध चालू राहण्यावर ते भर देतात.

भारतीय जीवनाचा आदर्श, धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार संकल्पनांतून व्यक्त झालेला आहे. यातील अर्थ व काम या ऐहिक सुखसमृद्धीच्या कल्पना आहेत. धर्म ही सामाजिक जबाबदारीची कल्पना आहे व धर्माच्या नियंत्रणाखाली अर्थ व काम ही साध्य केली जावी हे योग्य आहे. जयप्रकाश नारायण मोक्षाची कल्पना देताना आध्यात्मिक विकासाला एक विशिष्ट अर्थ देतात. व्यक्तीने स्वतःला इतरांबरोबर एकरूप करून घेणे, आपल्या सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडणे याला ते आध्यात्मिकता अशी संज्ञा देतात व याची सर्वात विकसित अवस्था म्हणजे मोक्ष आहे. माणसाच्या आध्यात्मिक विकासाची व्याप्ती जास्तीत जास्त लोकांशी एकरूप होण्यातून वाढत जाते. कुटुंब, समुदाय, प्रांत, राष्ट्र, जग हे एकापेक्षा एक अधिक अशा चढत्या पायऱ्या आहेत, ज्यांतून त्याचा आध्यात्मिक विकास होत जातो. जयप्रकाश नारायण धर्माला आधुनिक संदर्भ देऊन असे प्रतिपादन करतात की

माणसाने वाढत्या प्रमाणात सामुदायिक जीवनात एकरूप होणे व शेवटी मानव समाजाशी एकरूप होऊन, जगाचा नागरिक बनणे हा धर्म आहे.

व्यक्तीप्रमाणेच सामाजिक पुनर्रचनेकरता आध्यात्मिकतेची गरज आहे असे जयप्रकाश नारायण प्रतिपादन करतात. उद्योग, व्यवसाय, व्यापार या क्षेत्रांतील संघटनांची उभारणी नैतिक मूल्यांवर करणे आवश्यक आहे. भौतिक मूल्ये महत्त्वाची आहेत– आपल्याला जगण्यासाठी भाकरी मिळाली पाहिजे. परंतु आपण केवळ स्वतःच्या भाकरीपुरता विचार करीत असू तर ही भौतिकता आहे. आपण इतरांकरता भाकरीचा विचार करीत असू तर ती आध्यात्मिकता आहे. भारतीय संस्कृतीत ही आध्यात्मिकता चालत आलेली आहे असे जयप्रकाश मानतात. विज्ञान व आध्यात्मिक मूल्ये यांची सांगड घालणे हे भारतीय संस्कृतीला अधिक सहजसाध्य आहे असे त्यांना वाटते.

या आध्यात्मिक मूल्यांपैकी एक महत्त्वाचे मूल्य म्हणजे मानवी स्वातंत्र्य हे आहे. जयप्रकाश नारायण यांच्या दृष्टीने हे मूल्य इतके महत्त्वाचे आहे की ज्या समाजात ते नाकारलेले असेल अशा समाजात माणूस हा पशुवत् आहे असे ते मानतात. अशाप्रकारेच व्यक्तीचा पूर्ण विकास शक्य व्हावा अशी व्यवस्था निर्माण करणे हे सामाजिक उद्दिष्ट असले पाहिजे. व्यक्तीची समाजाशी एकरूपता हे एक आणखी मूल्य आहे. ही मूल्ये भौतिक समृद्धीवर भर देणाऱ्या देशांमधून, औद्योगिक व मोठ्या शहरांतून आढळत नाहीत असे जयप्रकाश सांगतात. अशा समाजात मानवी जीवन वैफल्यग्रस्त आहे. माणसाची एकांगी वाढ झाली आहे व त्याचे व्यक्तिमत्व हे खुरटलेले आहे. शहरांमधून गर्दी आढळते परंतु माणसे एकमेकांना ओळखत नाहीत, ते एकमेकांच्या सुखदुःखाचे वाटेकरी नाहीत. असा समाज हुकूमशहाच्या तालावर नाचू शकतो आणि हुकूमशहा हे सर्वकष राज्यांतून व लोकशाही राज्यांतूनही आढळतात. जयप्रकाश नारायण अमेरिकन समाजाला, व्यक्तीला स्वातंत्र्य असलेला समाज मानण्यास तयार नाहीत; कारण व्यक्तीच्या नावाने व तिच्या जीवनावर परिणाम करणारे महत्त्वाचे निर्णय, तिला न विचारता व तिला अंधारात ठेवून घेण्यात येत असतात.

माणसाच्या सर्वांगीण विकासाकरता, तसेच त्याच्या आध्यात्मिक मूल्यांना जपण्याकरता माणसाचा, त्याच्या भोवतालच्या समुदायाशी निकट संपर्क असणे आवश्यक आहे. आध्यात्मिक मूल्ये वाढण्याकरता दुसऱ्यांविषयी जिव्हाळा, सहकार्य आणि देव-घेव, सहानुभूती अशा गुणांची जोपासना झाली पाहिजे. याकरता लहान समुदायांमधून माणसांनी राहणे आवश्यक आहे असे जयप्रकाश

मानतात. असा समुदाय फार मोठा किंवा फार लहान असू नये व तो केवळ औद्योगिक किंवा केवळ शेतीवर अवलंबून असणारा असू नये. माणसाच्या समतोल विकासाकरता त्याचे भूमीशी सान्निध्य आवश्यक आहे व त्याबरोबरच त्याचे जीवनमान उंचावणे व विविधता असणे याचीही गरज आहे. मोठ्या समुदायात माणूस अगतिक व एकाकी होतो तर छोट्या समुदायात तोचतोपणा कंटाळवाणा ठरतो. भारतातील ग्रामीण जीवनाची पुनर्रचना करताना या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत असे जयप्रकाश सांगतात.

मुंबईसारख्या मोठ्या शहरांचा प्रश्न या दृष्टीने चिंताजनक आहे. परंतु अशा शहरांची बेसुमार वाढ थांबवणे व शहराचे विभाग पाडून प्रत्येक विभागाला आपला विकास करण्याकरता स्वायत्तता देणे हे उपाय जयप्रकाश नारायण यांना व्यवहार्य वाटतात. असे केले असता या विभागांतील लोक स्वयंनिर्णय घेऊन आपला विकास करू शकतील व सामुदायिक भावना वाढीला लागेल असे त्यांना वाटते. अशा परिस्थितीत शहरांतून भेडसावणारे शिक्षणाचे, घरांचे, आरोग्याचे प्रश्न अधिक व्यावहारिकरीत्या सोडवता येतील.

जयप्रकाश नारायण या स्थानिक समुदायांना पिरॅमिड पद्धतीने जोडण्याची कल्पना स्वीकारतात. स्थानिक पंचायतीपासून ते तालुका, जिल्हा, प्रांत, राष्ट्र व जागतिक पातळीवर निरनिराळ्या स्तरांवर हे समुदाय आपल्या विकासाकरता जोडले जातील व यातून समन्वित सामुदायिक जीवन साधता येईल असे त्यांना वाटते.

आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्यामुळे आपल्याला अशा स्वरूपाचे समुदाय उभे करता येणार नाहीत हे जयप्रकाश नारायण मान्य करीत नाहीत. ८० टक्के तंत्रज्ञानाचा भाग हा विकेंद्रित व्यवस्थेत वापरता येईल व स्थानिक, तालुका व जिल्हा पातळीवर उद्योगधंदे विकसित करता येतील. केवळ २० टक्के भाग हा राज्यस्तरावर उद्योगधंदे उभे करण्यासाठी वापरावा लागेल. माणसाला यांत्रिक संस्कृतीचा भाग बनवण्याऐवजी आपण यंत्राला मानवी मूल्यांकरता राबवले पाहिजे असे जयप्रकाश नारायण यांना वाटते. या दृष्टीने आपण विचार करावा व युरोप-अमेरिकेप्रमाणे केवळ मोठ्या उद्योगधंद्यांकडे धाव घेऊ नये असे त्यांना वाटते.

३. भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध

जागतिक समुदायात राष्ट्राराष्ट्रांचे संबंध आध्यात्मिक मूल्यांवर आधारावयाचे असतील तर राष्ट्रांतर्गत सामाजिक पुनर्रचना आध्यात्मिक मूल्यांवर झाली पाहिजे असे जयप्रकाश नारायण प्रतिपादन करतात. या दृष्टीने भारताने

गांधींची भूमिका सोडून दिली आहे व पाश्चात्त्य धर्तीवर राष्ट्रवादाचा स्वीकार केला आहे असे त्यांना वाटते. साम्यवाद्यांचे उदाहरण घेऊन ते असे प्रतिपादन करतात की त्यांनी मर्यादित स्वरूपात का होईना जागतिक पातळीवर सर्व माणसांच्या ऐक्यापासून सुरुवात केली परंतु त्यांचे आजचे वर्तन राष्ट्रांतर्गत ऐक्य देखील निर्माण करू शकत नाही. भारताने आपला आध्यात्मिकतेचा वारसा चालवण्याकरता अंतर्मुख होऊन व्यक्तिगत व सामुदायिक पातळीवर पुनर्रचना करण्याची गरज आहे असे त्यांना वाटते.

भारताचे जगाशी असलेले संबंध दुहेरी स्वरूपाचे आहेत. (१) भारतीय सरकारचे इतर राष्ट्रांच्या सरकारांशी असलेले संबंध (२) भारतातील लोकांचे इतर राष्ट्रांतील लोकांशी असणारे संबंध. सरकारच्या पातळीवर सर्व राष्ट्रांशी मैत्री व सहकार्याचे संबंध ठेवण्याचे अधिकृत धोरण असूनही याबाबतीत भारत सरकारचे धोरण सुसंगत राहिलेले नाही व ते सत्याला सोडून आहे असे जयप्रकाश नारायण प्रतिपादन करतात. ते तिबेट व हंगेरी यांच्या बाबतीत भारत सरकारच्या धोरणाचे उदाहरण देतात व या दोन्ही बाबतीत भारत सरकारची भूमिका सत्यापलाप करण्याची होती असे मांगतात.

जागतिक समुदायाचा घटक म्हणून आपली भूमिका पार पाडताना शेजारच्या राष्ट्रांशी आपले संबंध सुधारण्याची गरज आहे व त्याकरता मूलभूत दृष्टिकोण बदलण्याची गरज आहे असे जयप्रकाश नारायण यांना वाटते. या दृष्टीने आग्नेय आशिया व ईशान्य आशियातील राष्ट्रांशी आपले अधिक निकटचे संबंध ठेवण्याची गरज आहे. कॉमनवेल्थमध्ये राहण्यास आपला पूर्वी विरोध होता पण आता तसा नाही हे ते नमूद करतात. जागतिक ऐक्य साध्य करण्याकरता भारताने अशा राष्ट्रसंघांशी सहकार्य वाढवावे असे त्यांना वाटते. अशे राष्ट्रसंघ हे लष्करी सहकार्य व संरक्षणाकरता निर्माण न करता जागतिक सहकार्याकरता निर्माण व्हावेत असा त्यांचा आग्रह आहे.

दुसऱ्या स्तरावर म्हणजे राष्ट्राराष्ट्रांतील लोकांच्या पारस्परिक संबंधांवर जयप्रकाश नारायण यांचा अधिक भर आहे. व्यापारी संघटना, सांस्कृतिक संघटना, शिक्षण संस्था यांच्या माध्यमाने लोक हे संबंध वाढवू शकतील व असे करताना सरकारच्या धोरणाचा अडथळा येऊ नये असे ते प्रतिपादन करतात. हे सहकार्य तांत्रिक शिक्षण, यंत्रसामग्री, आर्थिक मदत, शेजारच्या लोकांच्या संस्कृती व भाषेचा अभ्यास या माध्यमाने व्हावा असे त्यांना वाटते.

राष्ट्राराष्ट्रांतील तंटे कसे सोडवावेत याविषयी जयप्रकाश नारायण आपली भूमिका भारत सरकारच्या भूमिकेपासून वेगळी असल्याचे नमूद करतात.

सैनिक शक्तीचा वापर करून गोव्याचे भारतात विलीनीकरण हे भारताच्या शांततेच्या धोरणास अनुसरून नाही व तसे केल्यामुळे भारताची नैतिक बाजू दुर्बल झाली आहे असे त्यांना वाटते. पाकिस्तान व चीनशी भारताचे संबंध सुधारण्याकरता वाटाघाटी व सामोपचाराची तसेच देवघेवीची भूमिका स्वीकारली पाहिजे असे त्यांना वाटते. काश्मीरचा तंटा, तसेच भारत–पाकिस्तान समस्या संघराज्याचा स्वीकार करून सोडवता येईल असे मत ते व्यक्त करतात. चीनशी सीमातंटा हा केवळ एकांगी भूमिका घेऊन सोडवता येणार नाही व याकरता मध्यस्थ नेमून हा तंटा सोडवावा असे त्यांना वाटते. थोडक्यात भारताने आपले तंटे शांततेच्या मार्गानेच सोडवले पाहिजेत हा त्यांचा आग्रह आहे. यात लोक शांतिसेनेसारख्या स्वायत्त व स्वतंत्र संघटना स्थापन करून सहभागी होऊ शकतात.

अशा प्रकारे जयप्रकाश नारायण यांचा राष्ट्रवाद हा मानवतेच्या मूल्यांवर भर देणारा व त्यांवर आधारलेला आहे. व्यक्तीला केंद्र व व्यक्तीचे हित हे उद्दिष्ट मानून एकाहून एक अधिक व्यापक अशा मध्यानुवर्ती समुदायांची ते कल्पना करतात. यात राष्ट्र हा अंतिम समुदाय नसून तो अधिक व्यापक अशा मानव समुदायाचा एक घटक आहे. या समुदायांचे एकमेकांशी असलेले संबंध हे पूरक संबंध आहेत. या समुदायांची परिणती मानव समाजाच्या ऐक्यातून होते असे जयप्रकाश मानतात. आध्यात्मिकताही जयप्रकाश नारायण यांच्या दृष्टीने व्यक्तीचे समुदायात व लहान समुदायाचे मोठ्या समुदायात विलीनीकरण होणे यात आहे, पण त्यात स्वत्व कायम राहते. भारतीय राष्ट्रवाद हा आक्रमक होणे हे त्यांच्या दृष्टीने भारतीय मूल्ये, परंपरा व वृत्तीशी विसंगत आहे.

* * *

संपूर्ण क्रांतीचे मार्ग व तंत्र

रमेश ढोबळे

१. क्रांतीची आवश्यकता

जयप्रकाश नारायण यांना संपूर्ण क्रांतीची आवश्यकता का वाटते याचा विचार करणे हे क्रांतीचा मार्ग व तंत्र समजून घेण्याकरता उपयुक्त ठरते. जॉन लॉक या तत्त्वज्ञाने सतराव्या शतकात, शासनाविरुद्ध लोकांना क्रांती करण्याचा अधिकार असतो असा विचार मांडला. समाजाने शासनाची निर्मिती विश्वस्त म्हणून केली आहे. लोकांचे जीवित, स्वातंत्र्य व संपत्ती यांना संरक्षण देणे हे विश्वस्त संस्थेचे कार्य आहे. हे प्राथमिक कार्य पार न पाडता जर कायदेमंडळ त्याला विरोधक असे अन्यायकारक कायदे करीत असेल व कार्यकारिणी या कार्याशी विसंगत अशाप्रकारे जुलमी वर्तन करीत असेल तर लोक व शासन यांच्यातील विश्वासाचे वातावरण संपले व अशा परिस्थितीत शासनाचे आदेश पाळण्याची लोकांची जबाबदारीही संपली. अशा परिस्थितीत शासन बदलून नवीन शासन आणण्याचा लोकांना अधिकार आहे. स्वातंत्र्य, जीवित व संपत्ती हे नैसर्गिक किंवा मूलभूत हक्क आहेत. ते हिरावून घेण्याचा हक्क शासनाला पोचत नाही. राज्याच्या सत्तेला यामुळे मर्यादा आहेत व राजसत्तेला लोकांची संमती मिळत राहणे हे आवश्यक आहे.

लॉकचे उपरोक्त विचार संपत्तीचा अपवाद वगळता जयप्रकाश नारायण यांना मान्य असल्याचे दिसते. लोकशाहीत सत्तेला संमतीचा आधार असला पाहिजे ही कल्पना संपूर्ण क्रांतीच्या मुळाशी आहे. परंतु हा अधिकार केवळ घटनेच्या तांत्रिक चौकटीत मर्यादित न राहता तो लोकांना राबवता कसा येईल हा महत्त्वाचा प्रश्न आहे. समाज बदलण्याकरता व प्रगतीकरता ही संमतीची कल्पना एक हत्यार बनावे अशी जयप्रकाश नारायण यांची कल्पना आहे. एरव्ही, समाज हा स्थितीशील व मृतवत् होईल. विद्यापीठे व वृत्तपत्रे

आपले विचार स्पष्टपणे मांड शकणार नाहीत. शासन हे लोकांनी निवडून दिलेले असले तरी त्यात भ्रष्टाचार व विकृती मोठ्या प्रमाणात निर्माण होतील. केंद्रीकरणामुळे स्थानिक स्वायत्तता व उपक्रमशीलता यांचा सतत संकोच होत राहील. जनतेचे मूलभूत प्रश्न हाताळण्यास असमर्थ असलेल्या शासनाविरुद्ध क्रांती करण्याचा लोकांचा हक्क अबाधित आहे. एवढेच नव्हे, तर ते लोकांचे कर्तव्य आहे.

अशारीतीने लोकांचा विश्वास गमावणाऱ्या शासनाविरुद्ध क्रांती अपरिहार्य व अटळ आहे असे जयप्रकाश मानतात. परंतु निवडणुकीच्या माध्यमाने बहुमताचा दावा करणारे शासन हे विश्वसनीय नाही असे कशावरून म्हणता येईल ? या प्रश्नाचे उत्तर जयप्रकाश भ्रष्टाचारात शोधतात. निवडणुकांपासून भ्रष्टाचाराची सुरुवात होते. दहशत, लाचलुचपत, संकुचित व जातीय वृत्तींना आवाहन, निवडणूक यंत्रणेतील व्यक्ती निःपक्ष नसणे व राजकारण्यांकडून सत्तेचा बेकायदेशीर वापर या सर्व गोष्टींमुळे लोकशाहीतील पाळेमुळे विषारी बनली आहेत व अशाप्रकारे निवडून आलेले शासन हे प्रातिनिधिक होण्याचा दावा करू शकत नाही. शिवाय भारतातील निवडणुकांमधून निवडून आलेले प्रतिनिधि हे लोकांच्या बहुमताने निवडून आलेले आहेत हा दावा तर अजिबात टिकणारा नाही. एवढेच नव्हे तर ते निवडणुकीत भाग घेणाऱ्या मतदारांच्या बहुमताचाही दावा करू शकत नाहीत. अशा परिस्थितीत अशा शासनाने दिलेले आदेश व केलेले कायदे हे लोकहिताकरता आहेत अथवा नाहीत हे विचारपूर्वक ठरवावे लागेल.

सत्तेचे केंद्रीकरण हे शासनात व पक्षामध्येही दिसून येते. शासनातील केंद्रीकरणामुळे मध्यवर्ती सत्ता बलवान होते व स्थानिक स्वायत्तता संपुष्टात येते. लोकांची सत्ता प्रतिनिधींकडे व तेथून ती मंत्रिमंडळाकडे केंद्रित होते. परंतु मंत्रिमंडळाची जबाबदारी प्रतिनिधींशी व प्रतिनिधींची जबाबदारी लोकांशी असावी ही कल्पना मात्र राबवण्यात येत नाही. संसदीय पद्धतीचा वापर करताना सत्तेचे केंद्रीकरण व शासनाची लोकांशी जबाबदारी या दोन्ही गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या आहेत. परंतु असे होत नसल्यामुळे संसदीय पद्धतीचे भारतात विडंबन होत आहे.

पक्षांतर्गत लोकशाहीचा अभाव हे दुसरे दुखणे आहे. पक्षाची शिस्त व पक्षनेतृत्व या नावाखाली पक्षांतर्गत खुली चर्चा व मतभेद दडपून टाकण्यात येतात व पक्षाचे धोरण म्हणजे काही व्यक्तींचे आदेश एवढ्यापुरते त्याचे स्वरूप मर्यादित होते. अशा पक्षाच्या हाती सत्तेची सूत्रे गेल्यामुळे लोकांना विचारून, त्यांना विश्वासात घेऊन, त्यांची टीका सहन करून व त्यातील योग्य

मुद्द्यांचा स्वीकार करून धोरण आखावयाचे असते ही गोष्ट विसरण्यात आलेली आहे. राजकीय पक्षामध्ये सत्तेचे केंद्रीकरण नेत्यांच्या हाती होणे अपरिहार्य आहे असा दावा केला जातो. तसे असल्यामुळे जयप्रकाश पक्षनिष्ठ लोकशाही व त्यावर आधारलेली संसदीय लोकशाही ही खरी लोकशाही आहे याबद्दल साशंक आहेत. एकंदरीत ही प्रक्रिया बदलण्यावर त्यांचा संपूर्ण क्रांतीत भर आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात पक्ष व शासन दोन्हीही लोकाभिमुख होण्याऐवजी लोकपराङ्मुख झालेल्या आहेत असे जयप्रकाश यांना वाटते. शासनातील भ्रष्टाचार हा कमालीचा वाढल्यामुळे लोकांचे हित हा मुद्दा बाजूला पडलेला आहे. त्यांचे स्वातंत्र्य, जीवित व वित्त यांची असुरक्षितता सारखी वाढत आहे. नोकरशाही उदासीन बनली असून राजकारणी लोकांचे प्रशासनावर नियंत्रण व प्रशासनाचा हितसंबंधाकरता वापर या चिंतनीय बाबी बनल्या आहेत. परंतु जर प्रशासन हे कार्यक्षम, निःपक्ष व सचोटी असणारे नसेल तर मग शासनाची विश्वासार्हता कशावर टिकून राहील ? नोकरशाहांनी अशा परिस्थितीत राजकारण्यांचे वर्चस्व नाकारणे हा एकच उपाय शिल्लक राहतो. जयप्रकाश जेव्हा सैन्याला किंवा पोलिसांना असे आवाहन करतात की त्यांनी वरिष्ठांच्या आज्ञा पाळताना त्या कायद्याला अनुसरून आहेत किंवा नाहीत यांचा विचार करावा तेव्हा ते बंडाला प्रोत्साहन देत नसून राजकारणी लोकांनी सत्तेचा गैरवापर करण्याकरता राज्याच्या दंडशक्तीचा आधार घेऊ नये एवढेच पाहात आहेत. त्यांचे हे आवाहन निःपक्ष समजल्या जाणाऱ्या सर्वच प्रशासकीय नोकरवर्गाला आहे. एरव्ही, सत्ताधाऱ्यांच्या स्वार्थसाधनेसाठी राज्ययंत्रणा राबविली जाणार हे निश्चितच आहे.

२. संपूर्ण क्रांतीकरता मार्ग

संपूर्ण क्रांतीची अशाप्रकारे आवश्यकता आहे हे लक्षात घेतल्यानंतर क्रांतीचा मार्ग कोणता असावा, प्रक्रिया कशी असावी, पुढाकार कोणी घ्यावा, कोणते तंत्र व कोणती यंत्रणा वापरावी हे प्रश्न निर्माण होतात. या संबंधात आपल्या देशाच्या संदर्भात तसेच इतर संदर्भातही विचार झाला आहे. त्यातून स्थूलमानाने असे दिसून येईल की समाजक्रांती घडवून आणण्यासाठी तीन मार्गांचा अवलंब केला जातो: १. हिंसात्मक क्रांती २. लोकशाही घटनात्मक मार्ग ३. अहिंसात्मक प्रतिकाराचा व संघर्षाचा मार्ग. यांतील पहिला व दुसरा मार्ग यांच्यावर जयप्रकाश यांनी आक्षेप घेतलेले आहेत व ते वर्ज्य केलेले आहेत संपूर्ण क्रांतीसाठी तिसरा मार्ग हा योग्य आहे असे त्यांचे प्रतिपादन आहे.

आपल्या पूर्वायुष्यात जयप्रकाश यांचा हिंसात्मक क्रांतीच्या मार्गावर विश्वास होता. स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात भूमिगत राहून चळवळ करणे याचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव होता. रशिया व चीन येथील साम्यवादी क्रांतीचा त्यांच्या मनावर प्रभाव होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पक्षीय राजकारणाचे, उबग आणणारे अनुभव घेतल्यानंतर, वैधानिक मार्गाने क्रांती घडवून आणता येते यावरील त्यांचा विश्वास उडून गेला. साम्यवाद्यांचा भारतातील अनुभव व जागतिक साम्यवादी चळवळीचे एकंदर स्वरूप यांच्या चिंतनातून हिंसात्मक मार्गाने क्रांती घडवून आणता येईल याचीही शक्यता त्याना वाटेनाशी झाली. अशाप्रकारे अनुभव व चिंतन यांतून जयप्रकाश या निष्कर्षाला आलेले दिसतात की संपूर्ण क्रांतीचा मार्ग हा घटनात्मक सुधारणा व हिंसात्मक क्रांती या दोन्हीं पासून वेगळा राहील.

जयप्रकाश हे पक्षीय राजकारण, संसदीय शासनपद्धती व घटनात्मक उपाययोजना यांचे कठोर टीकाकार आहेत. पक्षीय राजकारणातून भ्रष्टाचार बोकाळतो, सत्ताकारणापुढे लोकहिताकडे संपूर्ण दुर्लक्ष होते व लोकानुवर्ती सत्ता येण्याऐवजी लोकांच्या नावाने सत्तेचा स्वार्थाकरता राजकारणी लोकांकडून वापर होतो हे त्यांनी जवळून पाहिले व अभ्यासले आहे. संसदीय पद्धतीत एक प्रभावी विरोधी पक्ष निर्माण करण्याचे त्यांचे स्वप्न समाजवादी पक्षातील अंतर्गत कुरबुरीमुळे भंग पावले व त्यातून पक्षीय राजकारणाबद्दल उपरती निर्माण झाली. याला पर्याय म्हणून ते विधायक चळवळीकडे वळले व सर्वोदय चळवळ हे त्यांचे आशास्थान बनले. परंतु सर्वोदय चळवळही क्रांतिकारक बनू शकत नाही व शेवटी ती प्रस्थापित सत्तेला आव्हान देण्यात अयशस्वी ठरली असे दिसून आल्यामुळे ते पुन्हा राजकारणात आले. त्यांची संपूर्ण क्रांतीची कल्पना या गुंतागुंतीच्या प्रक्रियेतून निर्माण झालेली आहे.

केवळ विधायक उपाययोजना करून कायदेशीर मार्गाने समाजक्रांती घडवून आणता येते का ? जयप्रकाश नारायण याचे उत्तर निःसंदिग्धपणे देत नाहीत. परंतु एका लेखात त्यांनी याबाबतीत आपली निराशा झाल्याचे नमूद केले आहे. हा निष्कर्ष भारतातील व इतर देशांतील अनुभवावर आधारलेला आहे असे ते म्हणतात. परंतु ते हे मान्य करतात की सर्वंकष राज्यापेक्षा वैधानिक व्यवस्था ही समाजक्रांती घडवून आणण्याच्या दृष्टीने सोयीची आहे. त्यांचा या पद्धतीने क्रांती घडवून आणण्याला खरा विरोध दिसतो, तो एका भूमिकेतून आलेला आहे. समाजक्रांती म्हणजे केवळ सामाजिक व आर्थिक हिताची कल्पना नव्हे. एरव्ही आधुनिक कल्याणकारी राज्य हे क्रांतिकारक मानले जाईल. क्रांतीमध्ये आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांतून सत्तेचे

स्वरूप बदलण्याची कल्पना आहे. सत्तेचे केंद्रीकरण हे भांडवलशाही व समाजवादी दोन्ही व्यवस्थांमध्ये आढळून येते. म्हणून अमेरिका व सोव्हियट संघराज्य दोन्हींमध्ये व्यवस्थात्मक क्रांती घडून आली पाहिजे हा त्यांचा महत्त्वाचा मुद्दा आहे. संपत्तीवर आधारलेले मानवी संबंध अशा प्रकारे बदलले पाहिजेत ज्यामुळे आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट होईल व शोषणरहित व्यवस्था निर्माण करता येईल. हे होण्यासाठी व्यवस्थेत बदल करणे आवश्यक तर आहेच, पण व्यक्तिगत व सामाजिक जीवनमूल्ये व नीतिमूल्ये देखील बदलली पाहिजेत. सत्तेची कल्पना या संदर्भात बदलेल.. परंतु अशी क्रांती घडवून आणण्याचे माध्यम संसद किंवा राजसत्ता नाही. क्रांतीचे खरे वाहक लोक आहेत व क्रांती, मग ती हिंसात्मक असो अथवा अहिंसात्मक असो, लोकांनी घडवून आणावयाची आहे.

सर्वोदय चळवळीतील, लोकांनी स्वेच्छेने बदल घडवून आणण्याची कल्पना जयप्रकाश नारायण यांना महत्त्वाची वाटते. परंतु सर्वोदय चळवळ भूदान, ग्रामदान व संपत्तिदान अशा स्वरूपाचे कार्यक्रम राबवण्याकरता शासनावर अवलंबून राहिली याचा त्यांना खेद होतो. सर्वोदय चळवळीत शासनाशी संघर्ष घेण्याच्या प्रश्नावर फूट पडली. कारण शासनाचे धोरण हे प्रस्थापित हितसंबंध टिकवण्याचे राहिले व सर्वोदयवादी कार्यकर्त्यांमध्ये अशा शासनाविरुद्ध प्रतिकाराची भूमिका घेण्याबाबत मतभेद होते. सर्वोदयातील शासनाशी सहकार्य करण्याची भूमिका घेणारे, जयप्रकाश यांचे विरोधक त्यांच्यावर अशी टीका करू लागले की ते सत्तेच्या राजकारणात सहभागी झाले आहेत व त्यांच्या गांधीवादावरील निष्ठेबद्दलही शंका व्यक्त करण्यात आली. गांधींनी स्वातंत्र्यपूर्वकाळात सत्याग्रह, असहकार, सविनय अवज्ञा यांसारख्या तंत्रांचा अवलंब केलेला होता तो परकीय सरकारविरुद्ध समर्थनीय असला तरी निवडणुकीतून आलेल्या वैधानिक शासनाविरुद्ध या तंत्रांचा वापर करणे चुकीचे आहे अशी भूमिका त्यांच्या विरोधकांनी घेतली.

वस्तुतः जयप्रकाश यांच्या दृष्टीने क्रांतीकरता केवळ हिंसा अथवा अहिंसा हे दोनच पर्याय, मार्ग म्हणून शिल्लक राहतात. यांपैकी हिंसात्मक क्रांतीचा मार्ग त्यांना अमान्य आहे कारण त्यातून अपेक्षित उद्दिष्ट पूर्ण होणार नाही. या ठिकाणी हे लक्षात घेणे आवश्यक आहे की जयप्रकाश यांचा हिंसात्मक क्रांतीला असलेला विरोध हा केवळ नैतिक भूमिकेवरून नाही. समाजव्यवस्था बदलली पाहिजे हा त्यांचा आग्रह आहे व ती शांततेच्या मार्गाने बदलली नाही तर हिंसक मार्गाने बदलेल. परंतु हिंसक मार्गाने क्रांतीची वाटचाल होणे हे क्रांतीची उद्दिष्टे पूर्ण होण्याकरता श्रेयस्कर नाही हा जयप्रकाश यांचा खरा आक्षेप आहे.

हिंसाचारावर आधारलेली क्रांती ही प्रस्थापित व्यवस्था मोडून टाकण्यात यशस्वी होते हे फ्रान्स व रशियातील समाजक्रांतींत दिसून येते. परंतु मोडलेल्या व्यवस्थेऐवजी सामाजिक पुनर्रचना करण्याकरता जी उद्दिष्टे क्रांतिकारकांनी जाहीर केली होती ती पूर्ण झाल्याचे दोन्ही क्रांत्यांच्या इतिहासातून दिसून येत नाही. नक्षलवाद्यांच्या अथवा कम्युनिस्टांच्या हिंसात्मक क्रांतीच्या आवाहनाला जयप्रकाशांचे हे उत्तर आहे. यात क्रांतिकारकांच्या प्रामाणिकतेविषयी शंका नाही परंतु ते रक्तरंजित क्रांतीच्या अपरिहार्यतेमध्ये केवळ अगतिक घटक बनलेले आहेत असा जयप्रकाश यांचा दावा आहे.

आपल्या नावाजलेल्या 'फेस टु फेस' या लेखात हिंसात्मक क्रांतीविरुद्ध असलेल्या आपल्या मुद्दयांचे जयप्रकाश यांनी स्पष्ट विवेचन केलेले आहे. हे मुद्दे पुढीलप्रमाणे चार आहेत.

१. राजकीय हिंसाचार हा क्रांतिकारक अथवा प्रतिक्रांतिकारकही असू शकतो.

२. क्रांतिकारकांच्या इच्छेप्रमाणे क्रांती घडून येत नसते.

३. रक्तरंजित क्रांती विध्वंस करू शकेल पण पुनर्निर्माण करू शकणार नाही.

४. रक्तरंजित क्रांतीतून सत्ता केवळ अधिक हिंसक अशा गटाकडे जाते परंतु लोकांच्या हाती येत नाही.

१. नक्षलवाद्यांच्या हिंसाचारामुळ प्रतिहिंसाचार हा प्रस्थापित हित-संबंधांकडून केला जातो व यातून कोण यशस्वी होईल हे सांगता येत नाही असे जयप्रकाश यांना वाटते. यातून फॅसिस्ट हुकूमशाही निर्माण होईल व लोकांचे प्रश्न सुटणार तर नाहीतच परंतु त्यांचे दैन्य व दुःख यात वाढ होईल याची त्यांना भीती वाटते.

२. क्रांती यशस्वी होण्याकरता सामाजिक व ऐतिहासिक परिस्थितीही अनुकूल असावी लागते. भारतामध्ये रक्तरंजित क्रांती घडून येण्यास अनुकूल परिस्थिती नाही. उदाहरणार्थ, तेलंगाणातील कम्युनिस्ट चळवळीनंतर अशा प्रकारची क्रांती घडवून आणण्याचे प्रयत्न अयशस्वी ठरले आहेत. शिवाय अशी क्रांती अल्पकालावधीत घडून येते हा समज चुकीचा आहे.

३. अशी क्रांती यशस्वी होणे याचा अर्थ स्पष्ट करणे आवश्यक आहे. एक व्यवस्था नष्ट करणे एवढ्यापुरते क्रांती यशस्वी झाली असे विधान मर्यादित करता येईल. परंतु त्यावरोबर येणारा सत्तासंघर्ष, यादवी व भाऊबंदकी यांचा विचार केल्यानंतर नवी व्यवस्था निर्माण करण्यात कितपत यश आले याचा

विचार करणे आवश्यक आहे. फ्रेंच राज्यक्रांतीची समता, स्वातंत्र्य, बंधुत्व ही उद्दिष्टे क्रांतिकारकांना साध्य करता आली नाहीत. रशियन राज्यक्रांतीचे 'सर्व सत्ता कामगार व शेतकऱ्यांच्या सोव्हियट्सकडे' देण्याचे उद्दिष्ट कधी पूर्ण झाले नाही.

४. क्रांत्यांमधील मध्यवर्ती प्रश्न हा सत्तेशी निगडित असतो. क्रांतिकारकांमध्ये लोकांच्या नावाने सत्तेचा वापर जो जास्तीत जास्त कठोरपणे करील अशा गटाच्या हाती सत्ता केंद्रित होते. बंदुकीच्या नळीतून आलेली सत्ता लोकांच्या हाती नसते, कारण बंदुका बाळगणारे सैन्य हे संघटित हिंसाचार घडवून आणणाऱ्या गटाच्या हाती असते. अशा परिस्थितीत प्रत्येक क्रांतीनंतर हितसंबंधी गट व शोषक वर्ग निर्माण होतो व लोकांच्या पदरी गुलामगिरी येते.

हिंसाचारावर आधारलेल्या क्रांतीवर जयप्रकाश नारायण जे आक्षेप घेतात त्यांचे स्वरूप तात्त्विक आहे. क्रांतीनंतर सत्तेचे स्वरूप बदलत नाही. सत्ता लोकांच्या हाती येत नाही. ती एका गटाकडून दुसऱ्या गटाकडे जाते. क्रांतिकाळातील असंघटित हिंसाचाराला आळा घालण्यासाठी संघटित हिंसाचाराचा अवलंब करावा लागतो. याकरता यंत्रणा उभ्या कराव्या लागतात. या यंत्रणेवर नियंत्रण लोकांचे नसते. ज्यांचे असते ते लोकांना जबाबदार नसतात. लोक हे गुलामच राहतात व क्रांतीची उद्दिष्टे साध्य होत नाहीत. अशा स्वरूपाची क्रांती ही एकाएकी घडून येणारी नसते किंवा ती स्थिर स्वरूपाचीही नसते. यामुळे भारताकरता हिंसाचारावर आधारलेली क्रांती अनुपयुक्त आहे.

३. संपूर्ण क्रांतीकरता अनत्याचारी संघर्षाचा मार्ग

समाजक्रांतीकरता हिंसाचाराचा मार्ग यशस्वी ठरू शकतो हे अमान्य केल्यानंतर फक्त अनत्याचारी क्रांतीचा मार्ग शिल्लक राहतो. जयप्रकाश नारायण असे प्रतिपादन करतात की हा मार्ग राज्याकडून सुधारणा घडवून आणण्यापासून वेगळा करता येतो. यात क्रांतीकरता पुढाकार राजसत्ता घेत नसून लोक घेतात व राज्याचे कायदे हे नंतर तयार होतात व ते क्रांतीचे अनुगामी असतात. अनत्याचारी क्रांतीत लोकमत बदलण्यावर व वैचारिक परिवर्तन घडवून आणण्यावर भर आहे. नवीन विचार व मूल्ये स्वीकारण्यासाठी लोकांना प्रवृत्त करणे, त्यावर आधारलेला कार्यक्रम त्यांच्यापुढे ठेवून तो स्वेच्छेने अमलात आणण्यासाठी त्यांना तयार करणे व याकरता मोठ्या प्रमाणावर जनशक्ती संघटित करणे यातून समाजक्रांती घडून येते. याच्या

जोडीला अहिंसक, अनत्याचारी असहकाराचा गरज पडेल तेथे वापर व्हावा व अहिंसक प्रतिकार केला जावा अशी कल्पना यात केलेली आहे. अशा प्रकारची क्रांती फलद्रूप होण्यास कदाचित वेळ लागेल परंतु ती चिरस्थायी असेल. सत्याग्रहाचा मार्ग अखेरचा मार्ग असेल व सामान्यपणे मतपरिवर्तन व वैचारिक बदल यांवर भर देण्यात येईल. वैधानिक मार्गाने अथवा हिंसेने होणाऱ्या बदलापेक्षा या पद्धतीने बदल अधिक लवकर घडून येतात असे जयप्रकाश सांगतात.

समाजक्रांतीकरता या ठिकाणी जयप्रकाश दोन गोष्टी गृहीत धरतात. एकतर लोकशाही राज्यावर समाज परिवर्तनाकरता सर्वस्वी अवलंबून राहता येत नाही. परंतु लोकशाही व्यवस्थेच्या अभावी त्यांना अभिप्रेत अशी समाज–क्रांती घडवून आणता येणार नाही. दुसरे, समाज क्रांतीकरता क्रांतीकारकांनी लोकांमध्ये जाऊन काम करणे, त्यांना शिक्षण देणे व त्यांचे मतपरिवर्तन करणे, त्यांना संघटित करणे व समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेत त्यांना सक्रिय भाग घ्यायला लावणे या गोष्टी आवश्यक आहेत. परंतु अशाप्रकारच्या विधायक कार्याच्या जोडीला जेथे जरूर पडेल तेथे अनत्याचारी असहकाराच्या मार्गाने दडपण आणणे हे समर्थनीय आहे.

शांतता, विधायक कार्यक्रम, लोकशिक्षण व अनत्याचारी संघर्ष हे जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांतीच्या मार्गाचे गुणविशेष आहेत. समाज बदलण्याकरता माणूस बदलायला हवा व माणसात बदल घडवून आणण्याकरता त्याला नवे विचार व नवी मूल्ये स्वीकारण्यास तयार करायला हवे. जे हे काम आपल्या शिरावर घेतील ते क्रांतीचे अग्रदूत होतील. परंतु अशा स्वरूपात क्रान्ती घडवून आणण्याकरता सुसंस्कृत मनोवृत्तीची माणसे तयार करणे हे आवश्यक आहे. आणि शेवटी हा एकंदरीत योग्य शिक्षणाचा प्रश्न आहे. जयप्रकाश नारायण यांना शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे याकरता आवश्यक वाटते.

४. संपूर्ण क्रांतीचे तंत्र

लोकजागृती

संपूर्ण क्रांतीचे तंत्र हे अनत्याचारी मार्गाने समाजपरिवर्तन घडवून आणण्याशी संबंधित आहे. राज्य व राज्याचे कायदे यांवर भिस्त ठेवण्यास जयप्रकाश यांचा तात्त्विक विरोध आहे. कारण त्यातून राज्यवाद व अधिकारशाही यांची नकळत वाढ होत असते. याला कल्याणकारी राज्य हे अपवाद

नाही. अनुभवाच्या आधारेही ते राज्याकडे व्यापक अधिकार देण्याच्याविरुद्ध आहेत. कारण लोकहिताकरता म्हणून केलेले अनेक कायदे प्रत्यक्षात रावबले गेलेले नाहीत. हे कायदे का रावबले गेले नाहीत याचे कारण सांगताना ते असे प्रतिपादन करतात की या कायद्यांना रावबून घण्याला प्रस्थापित हितसंबंध, राजकारणी लोकांचे हितसंबंध व नोकरशाहीचे हितसंबंध हे आड आले व रावबणारी यंत्रणाच या ठिकाणी कायदे पाळून घेण्याबाबत निरुत्साही राहिली. ज्या दुर्बल किंवा मागासलेल्या घटकांकरता कायदे तयार करण्यात आले ते जागरूक किंवा संघटित नसल्यामुळे कायद्यांच्या अंमलबजावणीकरता दडपण आणण्यास असमर्थ होते व यामुळेही कायदे अमलात आले नाहीत. याचा अर्थ असा होतो की लोकशाही व्यवस्थेतदेखील लोकांच्या हिताकरता आपोआप, संघर्ष न करता बदल होतील असे समजणे व्यर्थ आहे. याकरता, ज्यांना हे परिवर्तन घडून यावेसे वाटते त्यांनी, एकीकडे, लोकांना त्यांचे हक्क व स्वातंत्र्य जपण्याकरता संघटित केले पाहिजे व दुसरीकडे, सरकारवर कायद्यांची अंमलबजावणी करण्याकरता या संघटित जनशक्तीचे दडपण आणले पाहिजे. जयप्रकाशांनी पुरस्कारलेल्या लोकसमित्यांचे कार्य अशा प्रकारचे आहे.

स्वावलंबन

लोकशाहीत लोकांनी राजसत्तेवर विसंबून राहू नये व अधिकात अधिक प्रमाणात त्यांनी स्वावलंबी व्हावे याचा जयप्रकाश पुरस्कार करतात. या धोरणाला अनुसरून ते आर्थिक व राजकीय क्षेत्रांत व्यापक प्रमाणावर विकेंद्रीकरण करण्यावर भर देतात. मोठे उद्योगधंदे हे सत्तेचे केंद्रीकरण घडवून आणणारे आहेत व ते खाजगी क्षेत्रात असतील तर भांडवलदारांच्या हाती सत्ता केंद्रित होईल व राष्ट्रीयीकरण केले तर नोकरशाही व राजकीय नेते यांच्या हाती सत्ता केंद्रित होईल. कोणत्याही परिस्थितीत् आर्थिक व राजकीय सत्तेचे केंद्रीकरण हे लोकशाहीकरता मारक आहे. याकरता अधिकाधिक प्रमाणात उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण करण्यात यावे व मध्यम, छोटे व कुटीर उद्योगधंद्यांवर भर देण्यात यावा यावर जयप्रकाश भर देतात.

राजकीय क्षेत्रात राजकीय पक्षांमध्ये असेच सत्तेचे केंद्रीकरण आढळून येते. त्यामुळे आपले प्रश्न सोडवण्याकरता लोकांनी राजकीय पक्ष व नेते यांच्यावर विसंबून राहू नये. याकरता त्यांनी स्वयंस्फूर्त व स्वायत्त संघटना निर्माण कराव्या. या संघटना मानवी जीवनातील विविध गरजांशी व प्रश्नांशी संबंधित असतील व त्या राजकीय पक्षांपासून दूर राहतील. त्यांचे कार्य आपल्या सभासदांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करणे असेल. या संघटना निवडणूका

लढवणार नाहीत व सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त असतील. पण त्या शासनावर व राजकीय पक्षांवर दडपण आणण्याचे काम करतील व म्हणून संपूर्णपणे राजकारणापासून मुक्त असणार नाहीत. अशा प्रकारच्या संघटना उभ्या करण्याची जबाबदारी शिक्षित व बुद्धिजीवी वर्गावर आहे व या वर्गाने आपल्या निष्ठा कोणत्याही पक्षाकडे गहाण टाकू नयेत असे जयप्रकाश यांना वाटते.

भ्रष्टाचाराविरुद्ध मोहीम

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय जीवनातील बहुतेक क्षेत्रांतून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचा शिरकाव झालेला आहे असे जयप्रकाश मानतात. ही नैतिक अवनती राष्ट्रनिर्मितीकरता मारक आहे व म्हणून नैतिक मूल्यांवर भर देण्याकरता शक्य त्या सर्व मार्गांचा वापर केला पाहिजे. यातून भ्रष्टाचाराविरुद्ध मोहीम सुरू करण्याची गरज जयप्रकाश यांना वाटते. जे या मोहिमेत भाग घेतात त्यांच्यावर स्वतः भ्रष्टाचार न करण्याची नैतिक जबाबदारी येऊन पडते. ज्यांच्याविरुद्ध ही मोहीम हाती घेतली जाते त्यांच्यावर लोकमताचे दडपण आल्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो. गुजरात व बिहारमधील आंदोलनामध्ये भ्रष्टाचार हा महत्त्वाचा प्रश्न होता. जयप्रकाश यांच्या दृष्टीने बिहार आंदोलन हे विशिष्ट पक्षाविरुद्ध किंवा व्यक्तीविरुद्ध नव्हते. शासनात निर्माण झालेल्या भ्रष्टाचारी प्रवृत्तीविरुद्ध लोकमत जागृत करणे या आंदोलनाचा मुख्य उद्देश होता. निवडणुका, कायदेमंडळ, मंत्रिमंडळ, नोकरशाही, पक्षीय राजकारण व आर्थिक जीवन यांचे भ्रष्ट स्वरूप एकंदर समाजजीवन दूषित करणारे आहे. अशा शासनामुळे लोकांचे प्रश्न सुटू शकत नाहीत. गुजरात किंवा बिहारमधील आंदोलन एकीकडे नैतिक संकेतांनी मर्यादित करण्याचा प्रयत्न जयप्रकाशांनी केला व दुसरीकडे या चळवळींना पाठिंबा देऊन त्यांचे महत्त्व वाढवले. या संदर्भात बिहारमधील मंत्रिमंडळ व कायदेमंडळ विसर्जित करून नव्याने निवडणुका घेण्याच्या मागणीत नैतिक आशय होता. त्याबरोबरच एक सर्वांगीण ज्वलंत प्रश्नावर बोट ठेवून लोकमत संघटित करण्याचा प्रयत्न होता.

लोकशिक्षण

सामाजिक क्षेत्रात अशाच प्रकारच्या स्वयंस्फूर्त संघटनांचे कार्य महत्त्वाचे आहे. राज्याकडून सामाजिक सुधारणा घडून येऊ शकतात व कायदा हे त्याकरता उपयुक्त साधन आहे याविषयी जयप्रकाश यांना शंका आहे. जातीयता, हुंडापद्धती, अस्पृश्यता यांसारख्या सामाजिक प्रश्नांची पाळेमुळे एवढी खोलवर

गेली आहेत की केवळ कायदे करून अथवा ते अंमलात आणूनदेखील त्यांची सोडवणूक करता येत नाही. याकरता लोकशिक्षण व सामाजिक दडपण या दोन्हींची गरज आहे. या गोष्टी राज्याच्या कक्षेबाहेर ठेवणे हे व्यावहारिक दृष्टचाही आवश्यक आहे. कारण राज्यसत्तेच्या माध्यमाने होणारे बदल एक जुलूम नष्ट करताना नवीन अन्याय निर्माण करीत असतात.

लोकांच्या जागरूकतेच्या अभावी सत्ताधारी भ्रष्ट होतात. याकरता लोकशाहीत प्रसिद्धीची सर्व माध्यमे, वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरचित्रवाणी यांना सरकारी नियंत्रणापासून मुक्त करण्याची जरूर आहे. अशाच प्रकारे सत्ताधाऱ्यांच्या भ्रष्ट आचरणावर अंकुश ठेवण्याकरता लोकआयुक्त किंवा लोकपाल यांच्यासारख्या संस्था निर्माण केल्या पाहिजेत. न्यायालयीन स्वातंत्र्य हे अबाधित राहिले पाहिजे. मूलभूत हक्कांचा संकोच होऊ नये हे डोळ्यांत तेल घालून पाहिले पाहिजे. लोकशाहीचे महत्त्व व्यक्तिस्वातंत्र्य टिकवून ठेवण्यात आहे व नागरिकांना आपल्या स्वातंत्र्याचा जास्तीत जास्त वापर कसा करता येईल याचा विचार केला जाणे आवश्यक आहे. याकरता कायदेपंडित व सुबुद्ध नागरिक यांच्या संघटना पाहिजेत.

लोकशिक्षण व जनसंघर्ष या दोन तंत्रांचा वापर करताना विधायक व प्रतिकारात्मक अशा कार्यक्रमांचाही विचार जयप्रकाश व्यापक स्वरूपात करतात. त्यांची भूदान–ग्रामदान चळवळ ही लोकशिक्षणाद्वारे व विधायक कार्यक्रम स्वेच्छेने स्वीकारावयास लावून समाजक्रांती घडवून आणण्याची होती. प्रतिकारात्मक कार्यक्रम हा बिहार आंदोलनात स्वीकारण्यात आला. दोन्ही कार्यक्रमांवर गांधीवादाची स्पष्ट छाप आहे. बिहार आंदोलनाच्या काळात विद्यार्थ्यांना शिक्षण सोडून चळवळीत भाग घेण्याचे आवाहन, आंदोलन अहिंसक पद्धतीने चालवावे याविषयी घेण्यात आलेली काळजी, सरकारला पर्यायी अशा जनता सरकारांची स्थापना, या सर्व कार्यक्रमांची मांडणी स्वातंत्र्यपूर्व काळातील असहकार व सविनय अवज्ञा आंदोलनाची आठवण करून देणारी आहे.

व्यवस्थात्मक बदल चिरस्थायी होण्याकरता मूल्ये बदलण्याची गरज आहे ही जयप्रकाशांची भूमिका शेवटी मूल्यात्मक सहमतीच्या कल्पनेपाशी येते. कोणताही समाज टिकून राहण्यासाठी मूल्ये, हक्क, कर्तव्ये, आचार व जीवनपद्धती यांच्या बाबतीत सर्वसामान्य सहमती असणे आवश्यक आहे असे जयप्रकाश सांगतात. सामान्यपणे सहमती ही समाजात स्थैर्य व सातत्य आणणारी असते व असहमती ही परिवर्तनाकरता उपयुक्त असते असे समजले

जाते. परंतु जयप्रकाश असे प्रतिपादन करतात की भारतीय संदर्भात आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की प्रगती करावयाची असेल तर मूल्यात्मक सहमती आणणे हे अपरिहार्य ठरले आहे. लोकशिक्षण व जनसंघर्ष या दोन्हींचे उद्दिष्ट अशा प्रकारे मूल्यात्मक सहमती घडवून आणणे आहे.

संपूर्ण क्रांतीचे तंत्र हे व्यक्तीचे स्वातंत्र्य व स्वेच्छा यांना कमीत कमी इजा पोचवून व्यवस्थात्मक बदल घडवून आणण्याचे तंत्र आहे. यात दडपणाला वाव आहे पण हिंसा व अत्याचाराला वाव नाही. हे दडपण नैतिक मूल्यांतून आलेले असावे व त्यातून व्यक्तीच्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन करण्यात यावे यावर जयप्रकाश नारायण भर देतात.

* * *

समस्या व भवितव्य

वि. सी. जोशी

१. व्यक्ती व व्यवस्था यांतील बदल

जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांतीची कल्पना व्यक्ती व व्यवस्था यांत सातत्याने बदल घडवून आणण्याची आहे. यात व्यवस्था ही प्राथमिक समजावयाची अथवा व्यक्ती ? बदल घडून येईल तो अगोदर व्यवस्थेत घडून येईल अथवा व्यक्तीमध्ये ?

हा प्रश्न गांधीवाद्यांना अप्रस्तुत वाटतो. कारण त्यांची भूमिका ही आहे की व्यक्तीची मनोवृत्ती बदलल्याशिवाय संस्थांमध्ये बदल घडवून आणणे टिकाऊ स्वरूपाचे नसते. कायदे हे कागदावरच राहतात व त्यांचे पालन करण्याऐवजी ते मोडण्याकडेच अधिक प्रवृत्ती दिसून येते. त्यामुळे समाज परिवर्तनाची प्रक्रिया ही व्यक्तीपासून सुरू झाली पाहिजे हा त्यांचा आग्रह असतो.

हा प्रश्न मार्क्सवाद्यांनाही अप्रस्तुत वाटतो. कारण त्यांच्या दृष्टीने माणसाच्या जाणिवा, उत्पादनाच्या शक्ती व उत्पादनाचे संबंध यांतून निर्माण होतात. अर्थव्यवस्था ही एकंदर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व्यवस्थेचे मळ आहे व त्या दृष्टीने चिरस्थायी स्वरूपाचे बदल हे संस्थात्मक व विशेष करून अर्थसंबंधातील बदल असावयास पाहिजेत.

संपूर्ण क्रांतीची कल्पना ही अतिरेक टाळून समन्वय घडवून आणण्याची कल्पना आहे. व्यक्ती व संस्था यांचे परस्परावलंबन व परस्पर प्रभाव करण्याची शक्ती लक्षात घेतली तर संस्थात्मक बदल घडवून आणण्याकरता विशिष्ट मनोवृत्ती घडवणे व त्यादृष्टीने लोकमत तयार करणे यावर संपूर्ण क्रांतीत भर दिलेला आहे. परंतु केवळ शिक्षण व स्वेच्छा यांवर भर दिलेला नसून हे परिवर्तन घडवून आणण्याकरता नव्या संस्था निर्माण करणे व कायदे तयार

करणे यांचे महत्त्व नाकारलेले नाही. या परस्परांवर प्रभाव पाडणाऱ्या संस्था व प्रवृत्ती यांच्या संदर्भातच संपूर्ण क्रांतीच्या प्रक्रियेचे वर्णन करता येईल.

२. क्रांती व हिंसाचार

एकदा अशा प्रकारची भूमिका घेतल्यानंतर हिंसाचार, रक्तपात, सक्ती व जुलूम हे क्रांतीचे अविभाज्य घटक आहेत ही कल्पना नाकारणे क्रमप्राप्त ठरते. या दृष्टीने ज्यांना हिंसा – अहिंसा यांचे वावडे नाही त्यांना या प्रश्नावर वेळ घालवणे व्यर्थ वाटते. परंतु केवळ उद्दिष्ट चांगले असून चालत नाही, तर त्याकरता वापरलेली साधने देखील चांगली असावीत अशी भूमिका न घेणे यातून उद्दिष्ट चांगले असेल तर त्याच्या पूर्तीसाठी सर्व भल्या–बुऱ्या मार्गांचा अवलंब करणे हे समर्थनीय ठरू शकते. सामान्यपणे मेकॅव्हली व मार्क्स ही भूमिका स्वीकारतात. याउलट गांधींनी साधनशुचितेचा आग्रह धरलेला आहे. याला प्राचीन परंपरेचा आधार आहे ज्याचे मूळ युरोपमध्ये सात्रेटीसपासून व भारतामध्ये बुद्धापासून शोधता येते.

संपूर्ण क्रांतीमध्ये हिंसाचार व जुलूम वर्ज्य आहेत. परंतु शांततेच्या मार्गाने दडपण असणे वर्ज्य नाही. शेवटी आपल्या विरोधकांवर असहकार, बहिष्कार, धरणे देणे, सत्याग्रह या मार्गांनी दडपण आणणे यातही बदल हा स्वेच्छेने घडून येत नसल्यामुळे दडपण वापरण्याची गरज मान्य केलेली आहे. जयप्रकाश यांच्या जनशक्ती, संघर्ष समिती, छात्र–युवा संघर्ष वाहिनी व जनमत प्रदर्शनाच्या कल्पना अशा दडपणाचे महत्त्व मान्य करणाऱ्या आहेत. व्यक्ती व व्यवस्था बदलण्याकरता दडपणाचे महत्त्व निर्विवाद आहे. परंतु अशा दडपणाला न जुमानणाऱ्या हितसंबंधी गटांना व निरंकुश सत्ताधीशांना नमवण्याकरता हे दडपण कितपत यशस्वी ठरू शकेल हा एक वादाचा विषय आहे.

३. सर्वोदय व संपूर्ण क्रांती

भूदान आंदोलनाकडे जयप्रकाश मोठ्या आशेने वळले. 'दानं संविभागः' या स्वरूपात भूमी व इतर संपत्तीचे पुनर्वाटप करण्याकरता ही चळवळ प्रभावी ठरावी असा त्यांचा आशावाद होता. परंतु भूदान आंदोलनाचा एकंदर अनुभव असे दाखवतो की, केवळ माणसाच्या सद्भावनेला आवाहन करून व्यवस्था बदलता येत नाही. भूदान आंदोलनाला अपयश येण्याची अनेक कारणे आहेत. दान म्हणून मिळालेली जमीन निकृष्ट असणे, जमिनीचे पुनर्वाटप करण्याकरता व सामुदायिक शेती करण्याकरता संघटना व कार्यकर्त्यांचा अभाव असणे, या आंदोलनाला शासन व प्रशासन यांच्याकडून प्रत्यक्ष सहकार्य न मिळणे व शेवटी दान केलेली

जमीन जमीनदारांनी परत घेणे हे सर्व अनुभव निराशाजनक आहेत. कदाचित यामुळेच व्यक्तीमधील मनोवृत्तीला व्यवस्थेची जोड मिळाली पाहिजे याची तीव्र जाणीव निर्माण झाली असावी. जयप्रकाश नारायण यांचे सर्व प्रयोग, मग ते मुसहरी येथील असोत, सोखोदेवरा येथील असोत अथवा बलिया जिल्ह्यातील असोत, या दृष्टीने एकंदरीत अपयशी ठरले आहेत.

कदाचित याचे कारण मार्क्स सांगू शकेल. भोवतालची एकंदर परिस्थिती प्रतिकूल असताना एकाद्या लहान परिसरात आदर्श समाज निर्माण करण्याचा प्रयोग करणे यातून समाज परिवर्तनाची प्रक्रिया सुरू करता येत नाही. उलटपक्षी असे प्रयोग फसण्याचीच शक्यता अधिक असते. अशा प्रयत्नांना मार्क्स स्वप्नाळू समाजवाद म्हणतो. सर्वोदयाचे प्रयोग या सदरात जमा होतील. यातून संपूर्ण क्रांतीची प्रक्रिया सुरू करता येईल काय हा वादग्रस्त प्रश्न आहे.

४. प्रस्थापित हितसंबंधांविरुद्ध जनशक्ती संघटित करणे

अन्यायाविरुद्ध संघटित प्रतिकार करणे हे सामाजिक क्रांतीकरता आवश्यक आहे तर स्वत: अन्याय करण्यापासून दूर राहणे हे व्यक्तीमधील क्रांतीचे द्योतक आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय यासारखी तत्त्वे अन्यायापासून मुक्ततेच्या विविध बाजू आहेत. अन्यायाचा प्रतिकार करताना व अन्याय दूर करताना एक प्रकारचा अन्याय दूर करण्याकरता उचललेल्या पावलामुळे दुसऱ्या प्रकारचा अन्याय घडून येणार नाही याचीही खात्री देता येत नाही. यामुळे समता किंवा स्वातंत्र्य याच्या कक्षा सतत व्यापक होत असलेल्या दिसून येतात व त्यांना आदर्श म्हणून स्वीकारीत असताना हे लक्षात घ्यावे लागते की हे आदर्श वास्तवात आणणे हे असाध्य आहे व म्हणून ते आदर्श म्हणून साध्य करण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे.

जयप्रकाश जेव्हा समग्र क्रांतीचा पुरस्कार करतात तेव्हा त्यांच्या भूमिकेत हा सातत्याने अन्यायाविरुद्ध झगडा चालू ठेवण्याचा आग्रह महत्त्वाचा आहे. त्यांची संघर्षाची कल्पना केवळ वर्गयुद्धापुरती किंवा जातीय संघर्षापुरती मर्यादित नाही. व्यक्तीने व्यक्तीवर, एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर व एका गटाने दुसऱ्या गटावर केलेल्या अन्यायाविरुद्ध संघर्ष उभा करण्याची प्रेरणा समग्र क्रांतीच्या मुळाशी आहे. अन्यायावर आधारलेले हितसंबंध नष्ट करणे हा या प्रक्रियेतील एक भाग आहे तर दुसऱ्यात हे हितसंबंध टिकवून ठेवण्याकरता ज्या मानवी प्रवृती जबाबदार आहेत त्यांतही बदल घडवून आणण्याची कल्पना निहित आहे. त्यांचा भ्रष्टाचाराविरुद्ध संघर्ष अशा प्रकारचा आहे. त्यात व्यवस्था बदलण्याइतकाच मानवी प्रवृती बदलण्याचाही भाग येतो.

परंतु तात्त्विकदृष्ट्या समग्र क्रांतीची ही कल्पना मौलिक असली तरी कार्यरूप देताना त्यात अनंत अडचणी निर्माण होतात. अन्यायाविरुद्ध संघर्ष कोणी करावयाचा व कोणाकरता करावयाचा ? ज्या व्यक्ती अन्यायाविरुद्ध झगडतात त्याच आपले हितसंबंध जपण्याकरता अन्यायात भागीदारही होतात. जे गट अन्यायाविरुद्ध झगडतात ते सत्तेचा वापर नवीन अन्याय करण्याकरता करतात. याचे कारण असे सांगता येईल की अन्यायाचे स्वरूप, क्षेत्र व वर्तुळ सतत बदलणारे असते. ज्या युवा किंवा छात्र संघर्ष वाहिनींवर समग्र क्रांती घडवून आणण्याच्या दिशेने संघर्ष उभा करण्याकरता जयप्रकाशांनी भर दिला त्या संघर्षवाहिनीतच भ्रष्टाचारात गुंतलेले व हितसंबंध जपण्याकरता अनैतिक मार्गाचा अवलंब करणारे लोक मोठ्या प्रमाणावर असल्याचे त्यांना दिसून आले. अशा परिस्थितीत समग्र क्रांतीची कल्पना साकार करण्याकरता साधन कोणते हा महत्त्वाचा प्रश्न अनुत्तरित राहतो.

जयप्रकाश नारायण यांना या गोष्टींची पूर्ण कल्पना असावी. परंतु संघर्षाशिवाय अन्यायाला तोंड देता येत नाही व म्हणून ज्यांच्यावर अन्याय होतो त्यांनी प्रतिकार करण्यासाठी सिद्ध व संघटित व्हावे अशी भूमिका आहे. नवीन हितसंबंध व नवीन अन्याय निर्माण होतील. परंतु त्याविरुद्ध नव्याने प्रतिकार संघटित करावा लागेल. अशाप्रकारे क्रांतीची प्रक्रिया ही सतत चालेल असे गृहीत धरलेले आहे. परंतु यामुळे संघर्ष हा सामाजिक संबंधांत स्थायीभाव ठरतो. हा संघर्ष शांततेच्या मार्गाने व दडपण आणून व्हावा असा जयप्रकाशांचा आग्रह आहे. नैतिक भूमिकेतून हा आग्रह समर्थनीय ठरेल. परंतु प्रस्थापित हितसंबंध जपू पाहणारे जेव्हा हिंसाचाराचा अवलंब करतात व राज्ययंत्रणा त्यांच्या बाजूने उभी राहते तेव्हा त्याविरुद्ध प्रतिकार हा शांततेच्या मार्गाने संघटित करता येण्यासाठी मर्यादा येऊन पडतात व असा आग्रह अवास्तव ठरतो. यातून अन्याय सहन करण्याच्या सोशिक वृत्तीचा अधिक परिपोष होण्याचीही शक्यता आहे. 'अन्याय सहन करणे हे अन्याय करण्यापेक्षा चांगले' असे विधान एखादा सॉक्रेटीस याला उत्तर देण्याकरता करील. परंतु ही नैतिक भूमिका घेऊन शांततेच्या मार्गाने संघर्ष उभा करणे कितपत व्यवहार्य ठरेल ?

या संदर्भात जयप्रकाश व विनोबा यांच्यावर जो आरोप केला जातो त्याचाही येथे विचार करता येईल. तेलंगाण्यातील कम्युनिस्ट चळवळीला शह देण्याकरता विनोबांनी तेथे जाऊन भूदानाची चळवळ सुरू केली. मुसहरी येथे नक्षलवाद्यांच्या वाढत्या प्रभावाला आळा घालण्यासाठी जयप्रकाश यांनी तेथे जाऊन भूदान व ग्रामदान या कल्पना रुजवण्याचा प्रयत्न केला. या प्रयोगांचे

एकंदर फलित काय होते ? जमिनीचा प्रश्न भूदानाच्या मार्गाने कितपत सोडवता आला ? हृदयपरिवर्तन व समाजक्रांती घडवून आणण्याच्या दृष्टीने सक्ती व अत्याचार या मार्गाचा त्याग केल्यानंतर स्वच्छेने कितपत बदल घडवण्यात आला ? या प्रश्नांचे उत्तर सकारात्मक रीतीने देणे कठीण आहे. जमीनदार वर्गाचे एकंदर वर्तन, त्या वर्गाच्या शोषणाला सत्ताधाऱ्यांकडून होणारी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत, सर्वोदयी कार्यकर्त्यांची संघटनेच्या बाबतीत अनास्था व अक्षमता, व या सर्वांचे फलित म्हणून प्रचलित व्यवस्था कायम राहते हे समाधानकारक चित्र नाही हे जयप्रकाशही मान्य करतात. यामुळे कम्युनिस्टांचा प्रभाव कमी झाला व वर्गसंघर्षाची धार बोथट झाली. परंतु अन्याय दूर झाले नाहीत किंवा प्रश्नही सुटले नाहीत. जयप्रकाश नारायण ज्या समग्र क्रांतीची तरफदारी करतात त्यात प्रस्थापित हितसंबंध टिकवून ठेवण्याची कल्पना नसून ते नष्ट करण्यावर भर दिलेला आहे व हे उद्दिष्ट शांततेच्या मार्गाने साध्य झालेले नाही. ते साध्य करता येईल याचा पुरावादेखील निर्विवादपणे देता आलेला नाही.

५. साम्यवादाला विरोध

साम्यवादाविषयी जयप्रकाश नारायण यांनी समाजवादी पक्षातून बाहेर पडताना जे विचार व्यक्त केले आहेत ते मिलोवान जिलासच्या 'नवीन वर्ग' या पुस्तकाची आठवण करून देतात. कामगार क्रांतीच्या नावाखाली कम्युनिस्ट पक्षाच्या रूपाने नोकरशहांचा एक नवीन वर्ग निर्माण झालेला आहे व या वर्गाच्या हाती राजकीय व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण झालेले आहे. उत्पादनाची साधने राज्याच्या मालकीची आहेत या तात्विक भूमिकेने या वर्गाचे हितसंबंध नष्ट होऊ शकत नाहीत. अशा व्यवस्थेत सत्ता अनियंत्रितपणे राखवण्यात येते व लोक गुलाम बनतात. शिवाय साम्यवादाने समतेचा प्रश्न यशस्वीरीतीने हाताळलेला नाही. हा नवीन वर्ग सत्तेची मक्तेदारी असलेला तर आहेच, शिवाय तो सांपत्तिक विषमता व सबलती निर्माण करणारा आहे. क्रांतीनंतर अर्ध्या शतकानंतरही ही विषमता कायम राहणे याचा अर्थ साम्यवाद आपल्या उद्दिष्ट-पूर्तीत अयशस्वी राहिला आहे.

साम्यवादाचे हे चित्र वस्तुस्थितीला सोडून आहे असे म्हणता येत नाही. परंतु मागासलेल्या देशांमधून विकासाकरता राज्यावर अवलंबून राहण्यावर जो भर दिला जातो त्यातून ही प्रक्रिया घडून येते. राज्याने पुढाकार घेऊन लोकहिताकरता कामे करणे, उद्योग चालवणे अथवा आर्थिक कार्याचे नियंत्रण करणे या स्वरूपात नोकरशाहीची कामे वाढतात व पर्यायाने नोकरशाही

बलवान होते. साम्यवादामध्येही नोकरशाही सत्तारूढ पक्षाचा एक भाग असते व या पक्षाला प्रतिस्पर्धी पक्ष नसल्यामुळे राजकारणी व नोकरशहा हे अनियंत्रित व बेजबाबदार बनतात. उद्योगीकरण, एक पक्ष, राज्यावर आलेल्या विस्तृत जबाबदाऱ्या, व विशिष्ट परिस्थिती यांचे एकत्रित परिणाम म्हणून अशा प्रकारचा वर्ग निर्माण झालेला आहे ज्याकडे आर्थिक व राजकीय सत्ता मक्तेदारीच्या स्वरूपात एकवटलेली आहे.

परंतु याला पर्याय म्हणून ज्या प्रकारची व्यवस्था जयप्रकाश निर्माण करू इच्छितात ती व्यवस्थादेखील वास्तविक प्रश्न सोडवण्यास समर्थ ठरेल काय? मागासलेल्या देशांमधून विकास घडवून आणण्याकरता राज्याकडे पाहणे हे केवळ साम्यवादी देशांचे दृश्य नाही, ते सार्वत्रिक दृश्य आहे. समाजवादी तशीच भांडवलशाही अर्थव्यवस्था अधिकाधिक राज्याच्या नियंत्रण व निर्देशनाखाली आलेली आहे व पर्यायाने नोकरशाही व तंत्रज्ञ यांची समाजावरील पकड वाढत आहे. हे चित्र केवळ मागासलेल्या समाजापुरतेच मर्यादित नसून ते कल्याणकारी व लोकशाही असलेल्या राज्यांचेही चित्र आहे. अशाच प्रकारे आर्थिक प्रश्न सोडवण्याकरता उद्योगीकरण हा पर्याय सर्वत्र स्वीकारलेला दिसतो व तो अपरिहार्यपणे केंद्रीकरणाकडे जाताना दिसतो. याला भांडवलशाही अथवा समाजवादी व्यवस्था पर्याय देऊ शकलेल्या नाहीत.

अशा परिस्थितीत सत्तेचे विकेंद्रीकरण हा यथार्थ पर्याय होईल काय ? राजकीय सत्ता ही जयप्रकाश म्हणतात त्या पद्धतीने स्थानिक शासनाकडे मोठ्या प्रमाणावर सत्तेचे हस्तांतरण करून विकेंद्रित करता येईल काय ? यांतून नवीन समस्या निर्माण होणार नाहीत असे म्हणवत नाही. भारतासारख्या देशात यातून प्रादेशिकवाद उग्र स्वरूपात निर्माण होईल याची भीती वाटते. अशाचप्रकारे आर्थिक विकेंद्रीकरण हे चीनने घडवून आणण्याकरता संघटित प्रयत्न केले व आता चीन परत औद्योगिक केंद्रीकरणाकडे जात आहे असे चित्र दिसून येत आहे.

जर स्वत: जयप्रकाश म्हणतात त्याप्रमाणे सातत्याने क्रांती करण्याची भूमिका मान्य केली तर वाढत्या केंद्रीकरणाबरोबर नोकरशाहीविरुद्ध उपाययोजना व प्रतिकार अशक्य आहे असे म्हणता येत नाही. प्रचाराची व माहितीची माध्यमे स्वतंत्र ठेवणे, व्यक्तिस्वातंत्र्याच्या काही कक्षा—वैचारिक व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य-अबाधित ठेवणे, कायद्यातून, सामाजिक नीतिमत्तेतून व राज्यघटनेतून सत्ता जबाबदार राहील या कल्पनेवर भर देणे यातून मक्तेदारीच्या स्वरूपातील सत्ता, मग ती पक्षाची असो, व्यक्तीची असो, नोकरशाहीची असो अथवा उद्योगपतीची असो, मर्यादित करता येऊ शकेल असे

वाटते. संपूर्ण क्रांतीत स्वीकारलेली पर्यायी भूमिका उत्पादनाच्या साधनांकरता खाजगी नियंत्रण मान्य करणारी आहे. ही भूमिका व्यावहारिक तडजोडीची असेल परंतु यातून मालमत्तेविषयी अथवा सामुदायिक जीवनाकडे बघण्याची सध्याची दृष्टी बदलण्याची काय शक्यता आहे ? खाजगी मालमत्तेला मान्यता असणे यामुळे माणसाच्या संग्राहक नैसर्गिक प्रवृत्तीला मान्यता दिली असे म्हणता येईल. पण त्यातून सांपत्तिक विषमता नष्ट होईल अथवा सामाजिक समता प्रस्थापित होईल असे म्हणता येत नाही.

६. लोकशाही व राज्यवाद

लोकशाही राज्य हे सर्वंकष असू शकते. कारण एकंदर सामाजिक जीवनावर ते नियंत्रण ठेवू शकेल. परंतु अशा प्रकारच्या सर्वंकष राज्याला जयप्रकाश विरोध दर्शवतात. केवळ निवडणुकीतून राजसत्ता तयार झाली एवढ्यामुळेच व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच करण्याचे अधिकार राजसत्तेला आहेत असे त्यांना वाटत नाही. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्य हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे व ते कोणत्याही कारणासाठी हिरावून घेणे हे समर्थनीय ठरणार नाही. त्यांच्या टीकाकारांचा असा आरोप असू शकेल की जयप्रकाश हे प्रस्थापितांच्या अथवा मूठभर लोकांच्या स्वातंत्र्याचा या ठिकाणी विचार करीत आहेत. परंतु असा आरोप करणारे स्वतः व्यक्तिस्वातंत्र्याचा कोणत्याही प्रकारे पुरस्कार करणारे नसल्यामुळे त्यांच्या आरोपांचा विचार करण्याचे कारण नाही. वस्तुतः व्यक्तिस्वातंत्र्य या प्रश्नाचा विचार जयप्रकाश जात, धर्म, भाषा, वर्ग यांपासून हा प्रश्न वेगळा करून करीत असल्यामुळे त्याला विशिष्ट हितसंबंधांचा आधार आहे असा आरोप हा हेत्वारोप आहे.

जयप्रकाशांच्या दृष्टीने लोकशाही व राज्यवाद या परस्परविरोधी कल्पना आहेत. लोकशाहीत राज्याच्या कक्षा मर्यादित करण्यावर त्यांचा भर आहे. राज्यवाद या उलट व्यक्तीचे अस्तित्वच राज्याकरता मानणारा आहे. साम्यवादाची तात्त्विक बैठक काहीही असली तरी आधुनिक साम्यवाद हा सर्वंकष राज्याचा पुरस्कार करतो व म्हणून जयप्रकाश त्याचा विरोध करतात. परंतु ते आधुनिक लोकशाही राज्याचेही समर्थक नाहीत. कारण त्यामधून पुन्हा पक्ष व सत्ता यांचे केंद्रीकरण व राज्याचा एकंदर सामाजिक जीवनावर पगडा दिसून येतो. त्यांची व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना, अशाप्रकारे, अराज्यवाद्यांशी मिळतीजुळती कल्पना आहे.

परंतु नोकरशाहीचे वाढते वर्चस्व, केंद्रीकरणाच्या सर्वत्र आढळणाऱ्या प्रवृत्ती, भ्रष्टाचार व सत्तालोलुपता यांना आळा घालण्यासाठी केवळ सर्वंकष

राज्याची कल्पना नाकारून चालेल काय याचा विचार होणे आवश्यक आहे. विकेंद्रीकरण व ग्रामराज्य यांवर जयप्रकाश भर देतात. या कल्पना खऱ्या अर्थाने राबवलेल्या नाहीत व म्हणून त्यांचे मूल्यमापन करता येत नाही हा त्यांचा मुद्दा ग्राह्य आहे. परंतु जे काही विकेंद्रीकरण घडून आलेले आहे त्यातून प्रस्थापित हितसंबंधांना, सत्तालोलुपतेला किंवा भ्रष्टाचाराला आळा बसलेला आहे, लोकशक्ती जागृत झाली आहे, प्रतिनिधी हे लोकांचे प्रतिनिधी आहेत व त्यांना जबाबदार आहेत असे दिसून येत नाही. ग्रामराज्य, विकेंद्रित लोकशाही, प्रत्यावाहन, पक्षविरहित लोकशाही या जयप्रकाशांच्या कल्पनांचा विचार होणे व त्यांवर प्रयोग होणे हे राज्याच्या सत्तेला आळा घालण्याच्या दृष्टीने मर्यादित उपाय ठरतील, कारण एकंदर उत्पादनव्यवस्था, योजना, कल्याणकारी राज्याबद्दल लोकांच्या अपेक्षा, प्रशासन व नोकरशाहीचा वाढता विस्तार, राजकीय जीवनातील पक्षांची अपरिहार्यता व त्याबरोबर येणारे नेतृत्वाचे व सत्तेचे केंद्रीकरण या गोष्टींकडे सहजासहजी दुर्लक्ष करता येत नाही.

या जाणिवेतून लहान समुदाय व लहान राज्यांचा जयप्रकाशांनी पुरस्कार केलेला आहे. परंतु एका मर्यादेपलीकडे या लहान समुदायांच्या स्वायत्ततेची कल्पना करणे अशक्य आहे. आधुनिक जीवनातील अपरिहार्यता संघराज्यांमध्येदेखील केंद्रीकरणाच्या प्रवृत्ती वाढत्या प्रमाणावर आणत आहेत हे लक्षात घेतले असता स्वयंपूर्ण छोट्या समुदायांची कल्पना वास्तविकतेच्या भूमिकेतून करता येईल काय याचा विचार होणे आवश्यक आहे. गांधीवाद्यांनादेखील हे अभिप्रेत नसावे. जयप्रकाश जेव्हा ग्रामराज्याच्या कल्पनेचा पुरस्कार करतात तेव्हा त्यांना स्वायत्त खेड्यांची कल्पना पुरस्कारायची आहे असे वाटत नाही. खेड्यांचा समतोल विकास घडून येण्यासाठी खेडी व नगरे यांतील विषमता कमी करण्यावर त्यांचा भर आहे. ते ही गोष्ट मान्य करतात की राज्याच्या विविध स्तरांवर कार्याचे स्वरूप वेगवेगळे असेल व कार्यानुसार अधिकारांचे व सत्तेचे वाटप व्हावे. लहान समुदायांकडून मोठ्या समुदायांकडे व शेवटी जागतिक समुदायाकडे पसरत जाण्याची त्यांची कल्पना लक्षात घेतली तर असे दिसून येते की स्थानिक पातळीवर स्थानिक स्वरूपाचे प्रश्न हाताळण्यापलीकडे अधिकारांची यथार्थ कल्पना करता येत नाही. निरनिराळ्या स्तरांवर अधिकार विभागून द्यावेत ही कल्पना संघवादाला अधिक जवळची आहे व कदाचित या दृष्टीने केंद्रीकरणाला त्यांचा विरोध आहे. परंतु संघराज्यामधूनदेखील केंद्रीकरण हे अपरिहार्य होऊ लागल्यामुळे या प्रश्नाचा विचार वेगळ्याप्रकारे करणे भाग आहे.

व्यापक स्वरूपात विकेंद्रीकरण, संघटनांची स्वायत्तता, लोकांचा निर्णय-याच्या प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग, लोकसमित्यांद्वारे प्रतिनिधी व नोकरशाहीवर नियंत्रण, व्यक्तीला केंद्रबिंदू मानून सत्तेचा विचार व सत्ता हे समाज परिवर्तनाचे साधन न मानता विचार परिवर्तन हे लोकशिक्षणाद्वारे घडवून आणण्यावर भर देणे या गोष्टी जयप्रकाश नारायण यांच्या राज्यवादाविरुद्ध असलेल्या कल्पनांची वैशिष्ट्ये आहेत. प्रत्यक्ष परिणाम व अनुभव यांच्या आधारावर राजकारणाचे मूल्यमापन करण्यावर त्यांचा भर आहे. परंतु याकरता अनाग्रही प्रयोगशीलता व काही आदर्श समोर ठेवून मूल्यमापन करण्याची तयारी या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत.

७. मूल्यात्मक सहमती

राज्य आणि हितसंबंध असणारे सामाजिक वर्ग व गट यांचे परस्पर संबंध लक्षात घेता अशी तयारी राजकारणी, नोकरशाही, राजकीय पक्ष व हितसंबंधी गट दाखवतील काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. याची जाणीव जयप्रकाशांना आहे. परंतु यातून निर्माण होणारा वर्गसंघर्ष व सामाजिक कलह टाळून अनत्याचारी मार्गाने क्रांती घडवून आणणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. यामुळे ते राज्याची दंडशक्ती व क्रांतिकारकांचा हिंसाचार हे दोन्ही मार्ग समाजक्रांती–करता अनुपयुक्त मानतात व लोकशिक्षण व चळवळ यांच्या माध्यमाने क्रांती घडवून आणण्यावर भर देतात.

ही एक आदर्शवादी भूमिका आहे व जयप्रकाश हे आदर्शवादी बनले आहेत. ते जेव्हा असे प्रतिपादन करतात की या मार्गाने समाजक्रांती अधिक लवकर घडवून आणता येईल व अधिक चिरस्थायी होईल तेव्हा हा आदर्शवाद स्वप्नाळू बनतो. परंतु त्यांच्या कल्पना अव्यावहारिक म्हणून टाकून देण्यासारख्या नाहीत. हिंसक मार्गाने क्रांतीची उद्दिष्टे साध्य होत नाहीत व राज्याच्या शक्तीचा वापर करून केलेली क्रांती यशस्वी होत नाही हे त्यांचे आक्षेप नाकारणे केवळ अशक्य आहे. शिवाय लोकशाही प्रक्रियेत हिंसाचार हा टाळण्याचे गृहीतच धरलेले आहे. तेव्हा संपूर्ण क्रांतीविषयी जयप्रकाश यांचे विचार आदर्शवादी असतील परंतु त्यांचा व्यावहारिक दृष्टिकोणातून विचार होणे व प्रयोगांती ते टिकतात अथवा नाहीत हे तपासून पाहणे आवश्यक आहे. ही गोष्ट याकरता अधिक आवश्यक आहे की सध्याच्या व्यवस्थेत, मग ती लोकशाही असो अथवा सर्वंकष राज्याची असो, हे प्रश्न समाधानकारकपणे सोडवण्याची क्षमता दिसून येत नाही.

परंतु अशाप्रकारचे राष्ट्रव्यापी प्रयोग करण्याकरता स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, सामाजिक न्याय, लोकशाही या घोषित उद्दिष्टांबाबत सामान्य सहमती

असणे आवश्यक आहे. समाजव्यवस्थेतील विषमता, शोषण व गुलामगिरी यांना आधार मानून हितसंबंधांच्या आधारावर तयार झालेल्या गटांमध्ये ही मूल्यात्मक सहमती आणता येईल काय हा खरा प्रश्न आहे. हितसंबंध बाजूला ठेवून व्यक्ती किंवा गट हे विचार करणार असतील तर सहमती येऊ शकते. अन्यथा कलह व संघर्ष हाच सामाजिक जीवनाचा आधार मानावा लागेल. भारतीय जीवनात अशी सहमती नाही व त्यामुळे राष्ट्रनिर्मितीचे प्रयोग हे अपयशी ठरत आहेत हे जयप्रकाश नमूद करतात. पण जी वस्तुनिष्ठ परिस्थिती ही मूल्ये निर्माण करण्याच्या आड येते ती, अनत्याचारी मार्गाने, लोकशिक्षण व चळवळ यांच्या माध्यमाने, संपूर्ण क्रांती घडवून आणण्यात अडथळे आणणार नाही काय ? आणि अशाप्रकारच्या प्रयोगांची यशस्विता गृहीत धरता येईल काय ?

संपूर्ण क्रांतीचे भवितव्य या प्रश्नांचे उत्तर देण्यावर अवलंबून आहे. हे उत्तर होकारार्थी देता येईल अशी परिस्थिती आज दिसून येत नाही. परंतु लोकशाही प्रक्रिया टिकून राहिली तर अशा प्रकारची मूल्यात्मक सहमती चिकाटीने प्रयोग करीत राहिल्यास निर्माण करता येणार नाही असे समजण्याचे कारण नाही. संपूर्ण क्रान्तीची उद्दिष्टे मान्य असणाऱ्यांवर अशा प्रयोगशीलतेची जबाबदारी येऊन पडते व ती त्यांनी राजसत्तेच्या सहकार्याशिवाय उचलावयाची आहे.

* * *

जयप्रकाश नारायण : जीवनाची वाटचाल

चन्द्रकान्त न्यायाधीश

बाळाने दिवसभर अन्नाचा कण तोंडात घेतला नाही, रात्रभर स्वस्थ झोपले नाही. पाळलेल्या कबुतराच्या मृत्यूने हळव्या मनाच्या बाळाचे दुःख पाहून आईवडील चिंता करू लागले. बाळाला दुःखाचा विसर पडावा म्हणून वडिलांनी हरीण, ससे इत्यादी प्राणी आणले. त्यांच्या मोहक रूपाने मात्र बाळ देहभान विसरून त्यांच्यात तल्लीन झाले. बालवयात पशुपक्ष्यांचे असे वेड असलेल्या जयप्रकाश यांचा जन्म शहाबाद जिल्ह्यातील सिताब–दियारा या गावी ११ ऑक्टोबर १९०२ रोजी विजयादशमीच्या दिवशी झाला. एका गावी सामान्य सरकारी नोकराचे मध्यमवर्गीय कुटुंब. कुटुंबात तीन बहिणी व दोन भाऊ. बालवयात जयप्रकाश खेळण्याच्या जगात कधी रमलेच नाहीत. पशु–पक्ष्यांचे मात्र विलक्षण वेड.

वाचनाच्या आवडीमुळे वयाच्या दहाव्या वर्षापर्यन्त अनेकानेक देशांच्या शूर, पराक्रमी राजांची चरित्रे त्यांनी वाचून काढली. भगवद्गीता वाचनात तर ते तल्लीन होऊन जायचे. गावी राहून प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी ते पाटण्याला आले. पाटण्याच्या विद्यालयात जयप्रकाश एक अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी म्हणून चमकले. गणित हा त्यांचा आवडता विषय.

एका हिंदू सणाच्या दिवशी शाळेला सुटी न देता मुख्याध्यापकांनी परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. पूजेचा दिवस आहे हे माहीत असूनही मुद्दाम याच दिवशी परीक्षा ठेवल्याचा निर्णय अयोग्य वाटल्यावरून जयप्रकाशांनी तो धुडकावून लावला. भीतीने काही विद्यार्थी परीक्षेस बसले. मुख्याध्यापकांच्या निर्णयाविरुद्ध वागल्याबद्दल दुसऱ्या दिवशी आपल्या पाच–सहा विद्यार्थी सोबत्यांसह त्यांनी धैर्याने शिक्षा पण स्वीकारली. छडीच्या माराने तळहात

सुजून आले होते, परंतु १३–१४ वर्षांच्या वयात अन्यायाचा प्रतिकार करण्याची जिद्द त्यांच्यात अंकुरली. या घटनेमुळे मोठ्या वर्गातील विद्यार्थ्यांचे लक्ष जयप्रकाशांकडे गेले. छोटनसिंह नावाच्या विद्यार्थ्याच्या खोलीवर क्रांतिकारी विद्यार्थ्यांचा सायंकाळी अड्डा असे. छोटनसिंहने जयप्रकाशांना निमंत्रण दिले. खुदीराम बोसनी एका इंग्रज अधिकाऱ्यावर बॉम्बफेक केल्याची घटना आणि चंपारण्यातील गांधीजींचा अहिंसक सत्याग्रह या दोन्ही घटनांनी जयप्रकाशांचे लक्ष सारखेच वेधून घेतले. गांधींच्या प्रभावाने जयप्रकाश खादी वापरू लागले, तरी पण त्यांच्या तरुण मनाला क्रांतिकारकांचे बंडखोर विचार आकृष्ट करीत.

वयाच्या सतराव्या वर्षी जयप्रकाश शालान्त परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. 'मेरिट स्कॉलरशिप' पण त्यांना मिळाली. सर जगदीशचंद्र बोस यांच्या सारखे थोर वैज्ञानिक व्हावे व मातृभूमीची सेवा करावी हे ध्येय बाळगून त्यांनी विज्ञान महाविद्यालयात प्रवेश घेतला. ह्या काळात डोक्यात विज्ञान, हृदयात साहित्य आणि गीतेवर निष्ठा ठेवून मातृभूमीचे महान पाईक होण्याचे स्वप्न जयप्रकाश उराशी बाळगून होते.

आपले मेहुणे ब्रजबिहारी सहाय यांचेमुळे पाटण्यातील एक संधान, प्रतिष्ठित नागरिक बाबू ब्रजकिशोर प्रसाद आणि राष्ट्रीय काँग्रेसचे वरिष्ठ नेते डॉ. राजेंद्र प्रसाद इत्यादी नेत्यांचा परिचय जयप्रकाशांना झाला. जून १९१९ मध्ये बाबू ब्रजकिशोर प्रसाद यांच्या सुविद्य कन्या प्रभावती देवीशी जयप्रकाशांचा विवाह झाला. देशातील राष्ट्रवादी थोर नेत्यांशी अनायासे संबंध वाढत गेला. १९२० मध्ये गांधी, नेहरू, आझाद पाटण्याला आले असताना, आझादांच्या भाषणातून इंग्रजांच्या अनुदानावर चालणाऱ्या शिक्षणसंस्था सोडण्याच्या आवाहनानुसार, १९२१ च्या जानेवारीत होणारी परीक्षा नजीक आली असताना, जयप्रकाशांनी कॉलेज सोडून महात्मा गांधींच्या असहकार चळवळीच्या आवाहनाला प्रतिसाद दिला. राष्ट्रीय प्रश्नांच्या संदर्भात जेव्हा जयप्रकाश युवकांना कॉलेज सोडण्याचे आवाहन करीत असत तेव्हा स्वाभिमानाने या घटनेचा ते उल्लेख करीत.

पुढे राष्ट्रवादी नेत्यांनी सुरू केलेल्या राष्ट्रीय विद्यापीठातून इण्टर सायन्स परीक्षा जयप्रकाश प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाले. या विद्यापीठात पुढील शिक्षणाची व्यवस्था नसल्याकारणाने प्रश्न निर्माण झाला. याच वेळी स्वामी सत्यदेव परिव्राजक यांचे अमेरिकेसंबंधीचे ग्रंथ जयप्रकाशांच्या वाचनात आले. स्वतः उपार्जन करून शिक्षण घेण्याची सोय तेथे असल्याचे वाचून त्यांना आनंद झाला. अमेरिकेत जाऊन विज्ञानाचा पुढील अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा त्यांनी निर्णय

घेतला. नवविवाहित पत्नी प्रभावतीदेवींनी अनुमती दिली. आईला मात्र आपला मुलगा मातृभूमी सोडून इतके दूर जाण्याची कल्पना असह्य झाली. आईची कशीतरी समजूत घालून जयप्रकाश अमेरिकेला निघाले.

१९२२ च्या ऑक्टोबरमध्ये जयप्रकाश कॅलिफोर्नियाला पोचले. विद्यापीठाचे नवीन सत्र जानेवारी १९२३ मध्ये सुरू होणार होते. जवळ पैसे थोडेच शिल्लक होते. मधल्या काळात मिळेल ती नोकरी करून, काटकसरीने शिक्षण-खर्चासाठी पैसे मागे टाकायचे त्यांनी ठरविले. शेरखान नावाच्या एका पठाणाच्या मदतीने एका द्राक्षाच्या मळ्यात मजूर म्हणून त्याना काम मिळाले. दररोज दहा तास काम करून फीपुरते पैसे जमविले. द्राक्षाच्या मळ्यात मजूर काम करीत असताना, जयप्रकाशसारख्या मध्यमवर्गीय कुटुंबातील तरुणास गरीब मजूर लोकांचे जीवन जवळून पाहावयास मिळाले. अंगमेहनत करणाऱ्या मजूर वर्गाबद्दलच्या प्रेमाचे बीज त्यांच्या मनात येथेच रुजले.

१९२३ च्या जानेवारीत त्यांनी बर्कलेच्या कॅलिफोर्निया विद्यापीठात प्रवेश घेऊन परीक्षेत ९० टक्के गुण संपादन केले. तेथील शिक्षणाचा खर्च जास्त वाटू लागला म्हणून बर्कले सोडून आयोवा आणि नंतर शिकागो येथील विद्यापीठात ते गेले. उपजीविकेसाठी निरनिराळ्या प्रकारची हीन समजली जाणारी सर्व कामे जयप्रकाशांनी केली. उपहारगृहातील कपबशा विसळणाऱ्या मुलाचे, वेटरचे, तर कधी निरनिराळ्या दुकानांतून अकुशल कामगाराचे अशाप्रकारे एकीकडे अंगमेहनतीची, कठोर श्रमाची कामे करून शिक्षण घेत असताना जयप्रकाशांनी एका सधन राष्ट्रातील मजुरांच्या जीवनाचे जवळून अवलोकन केले, एवढेच नव्हे तर ते प्रत्यक्ष अनुभवले, तर दुसरीकडे शैक्षणिक गुणवत्ता पण टिकविली. शिकागो येथील प्राध्यापकांत आणि विद्यार्थ्यांत तर ते खूप प्रसिद्ध झाले. तेथे त्यांना सर्वजण प्रेमाने 'जेपी' म्हणत.

अमेरिकेच्या निरनिराळ्या विद्यापीठांतून जयप्रकाशांनी विज्ञान, अर्थशास्त्र व समाजशास्त्राचा अभ्यास केला. शिकागोहून पुढे ते मॅडिसनला गेले. तेथे त्यांची अब्राहम लँडीशी ओळख झाली. मध्यंतरीच्या काळात जयप्रकाशांच्या वाचण्यात मार्क्सवादी साहित्य आले होतेच. अब्राहम लँडीच्या सहवासात आणि त्यांच्या मार्क्सवादी विचारांच्या प्रभावाने जयप्रकाश मार्क्सवादी साहित्याच्या अभ्यासात मग्न झाले. एक शास्त्रज्ञ होण्याची कल्पना त्यांनी सोडून दिली. मानवेन्द्रनाथ रॉय हे त्यावेळी रशियातच होते. त्यांचे साहित्य जयप्रकाश आवडीने वाचत. याच काळात अमेरिकेतील मजुरांच्या संपाचे नेतृत्व करणाऱ्या मॅन्युएल गोमेझशी जयप्रकाशांची ओळख झाली. अमेरिकेसारख्या सधन,

भांडवलशाही राष्ट्रात राहून जयप्रकाश साम्यवादी विचाराने भारावून गेले. या विचारसरणीच्या प्रभावामुळेच रशियाला जाण्याची त्यांना तीव्र इच्छा झाली. अर्थात् मॉस्कोच्या प्रवासखर्चाचा प्रश्न होताच. पुन्हा शिकागोला जाऊन मॉस्कोच्या प्रवासखर्चाची तरतूद करणे आवश्यक होते.

१९२६ च्या थंडीच्या दिवसात जयप्रकाश शिकागोला परत आले. दररोज सकाळी एक कप कॉफी घेऊन नोकरीच्या शोधात त्यांची भटकंती सुरू झाली. दोन-दोन दिवस उपासमार होऊ लागली. ट्रामच्या प्रवासखर्चासाठी पण पैसे नसायचे म्हणून ते मैल-मैल अंतर पायी चालून जायचे. या दगदगीमुळे ते आजारी पडले. आजारामुळे सहा महिने अंथरुणावर पडून राहावे लागले. घरून पैसे न मागविण्याचा त्यांनी निश्चय केला होता, परंतु नशिबाने साथ दिली नाही. घरच्यांनी जमीन गहाण ठेवून पैसे पाठविले. रशियाला जाण्याचा विचार जयप्रकाशाना अर्थातच सोडून द्यावा लागला.

ओहायो विद्यापीठाची समाजशास्त्र व अर्थशास्त्र हे विषय घेऊन बी.ए. ची पदवी त्यांनी संपादन केली. एम्. ए. चे अध्ययन करीत असताना सहायक अध्यापक म्हणून अध्यापनाचे कार्य करण्याची त्यांना संधी मिळाली. एम्. ए. साठी लिहिलेला 'सोशल व्हॅरिएशन्स' हा त्यांचा प्रबंध त्या वर्षाचा सर्वोत्कृष्ट प्रबंध म्हणून गाजला. पीएच्. डी. ची तयारी करीत असतानाच त्यांना आई आजारी असल्याचे कळले. २३ नोव्हेंबर, १९२९ रोजी ते स्वदेशी परतले आणि सरळ त्यांच्या सिताब-दियारा गांवी पोहचले. सात वर्षांनी परत आलेला मुलगा पाहून आईच्या डोळ्यांत आनंदाश्रू साठवेनात. आईच्या निर्व्याज प्रेमाने जयप्रकाश भारावून गेले.

परदेशात प्रत्येक क्षणी आपल्या देशातील स्वातंत्र्य चळवळीसंबंधी जयप्रकाशांना चिंता असायची. स्वदेशी परत आल्यानंतर राष्ट्रीय चळवळीसाठी अपेक्षित बलिदानाची निकड त्यांना जाणवली. या जाणिवेला प्रभावती-देवीच्या प्रेरणेने खत-पाणी घातले. २९ डिसेंबर १९२९ ला जयप्रकाश प्रभावती-देवीबरोबर वर्ध्यास बापूना भेटावयास गेले. तेथे त्यांची नेहरूंशी पण भेट झाली. नेहरूंनी सुचविल्याप्रमाणे अलाहाबादेस येऊन काँग्रेस कमिटीच्या कार्यालयाची जबाबदारी सांभाळायला जयप्रकाशांनी सुरुवात केली. एप्रिल १९३० मध्ये गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. गांधी, नेहरू इत्यादी थोर नेत्यांना अटक झाली. आईच्या आजारामुळे गावी थांबावे लागले याबद्दलची खंत जयप्रकाशाना स्वस्थ बसू देईना. शेवटी मातृभूमीच्या प्रेमाने प्रेरित होऊन, आईला आजारी अवस्थेत सोडून निघण्याचा त्यांनी निश्चय केला. आई आजारी अवस्थेत आपल्या मुलाला निरोप देण्यासाठी

पाटण्यापर्यंत आली. प्रवासाची दगदग सहन न होऊन ती मृत्यू पावली. वडिलांना अर्धांगवायू झालेला; जयप्रकाश अमेरिकेत असताना त्यांना पैसे पाठविल्यामुळे जमीन गहाण पडलेली; अशा प्रकारे जयप्रकाशांचे कुटुंब घोर आर्थिक संकटात सापडले. गांधींच्या मार्गदर्शनानुसार जयप्रकाशांनी नोकरी पत्करली. परंतु राष्ट्राच्या समस्या स्वहितासाठी नोकरी करू देईनात. केवळ सहा महिन्यांतच त्यांनी नोकरी सोडली. नेहरूंच्या आग्रहास्तव सविनय कायदे-भंग चळवळीचे इतिहास-लेखनाचे कार्य जयप्रकाश करू लागले.

काँग्रेसने स्वातंत्र्य चळवळ आणखी तीव्र केली. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या खास बैठकीसाठी आवश्यक ती कागदपत्रे जयप्रकाशांनी वेष बदलून दिल्लीहून मुंबईस पोचविली. देशात मोठमोठ्या नेत्यांना अटक झालेली. यावेळी जयप्रकाश भूमिगत झाले. देशात बुलेटिन व परिपत्रके वाटून काँग्रेसची चळवळ चालू ठेवण्याची जबाबदारी यावेळी त्यांनी पार पाडली. परंतु ७ सप्टेंबर १९३२ ला जयप्रकाश यांना अटक करण्यात सरकार यशस्वी झाले. 'काँग्रेसची मूळ प्रतिभा बंदिस्त झाली' अशा आशयाचे मथळे देऊन वृत्तपत्रांनी ही बातमी छापली.

नासिक आणि इतर तुरुंगांत अशोक मेहता, मिनू मसानी, अच्युत पटवर्धन ना. ग. गोरे, आचार्य नरेंद्र देव, डॉ. राममनोहर लोहिया वगैरे तरुण नेत्यांच्या भेटी-गाठी झाल्या, त्यांच्याशी विचार-विनिमय झाला. गांधीप्रणीत उपवास, अहिंसक चळवळी वगैरे मार्गाने स्वातंत्र्य प्राप्त होणार नाही असा विचार-प्रवाह या तरुण नेत्यांमध्ये निर्माण झाला. तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर १७ मे १९३४ रोजी पाटण्यात एक परिषद बोलावून काँग्रेस अंतर्गत काँग्रेस समाज-वादी पक्षाची स्थापना करण्यात आली. जयप्रकाश या पक्षाचे पहिले जनरल सेक्रेटरी होते.

नाझी आणि ब्रिटिश दोघे साम्राज्यवादी असल्याने आपले शत्रू आहेत या भूमिकेतून १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धाचे वेळी जयप्रकाशांनी युद्ध-सामग्री तयार करणाऱ्या कारखान्यातील कामगारांचा संप घडवून आणला. युद्धविरोधी कार्य केल्याबद्दल त्यांना अटक करण्यात आली. कोर्टात बचावाच्या वेळी स्वतःचे कर्तव्य केल्याचे तर त्यांनी सांगितलेच परंतु परिणामाची तमा न बाळगता इंग्रज या देशात जुलमी कारभार करीत असल्याचे दृढपणे बजावले. या अटकेला महात्मा गांधींनी आपल्या 'हरिजन' मधून तीव्र विरोध केला. जयप्रकाशांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण केले असून, कष्ट सोसण्याचे त्यांचे विलक्षण सामर्थ्य असल्याचे म. गांधींनी या प्रसंगी नमूद केले. जयप्रकाश यांना शिक्षा झाली. काँग्रेसने युद्धाचे समर्थन केल्याने काँग्रेसला दिल्लीला राष्ट्रीय सरकार बनविण्याची संधी मिळाल्याची बातमी त्यांना हजारीबाग तुरुंगात कळाली.

या बातमीने ते अत्यंत दुःखी झाले. तुरुंगातून बाहेर आल्यावर भूमिगत राहून कार्य करण्याच्या उद्देशाने ते मुंबईस आले. परंतु तेथे पोंचताच त्यांना पुन्हा अटक करण्यात आली. राजपुतान्यातील देवली कॅंप तुरुंगात त्यांना ठेवण्यात आले. बाहेरच्या मित्रांशी संपर्क साधण्यासाठी व्याकुळ झालेल्या जयप्रकाशांनी भेटीस आलेल्या पत्नीजवळ चप्पलचे साप देण्याचा बहाणा करून पत्रांचे बंडल दिले. दुर्दैवाने ही पत्रे पकडली गेली. हिंदुस्थानचा कटकारस्थानी नंबर एक, जयप्रकाश नारायण याचा सशस्त्र बंडाचा कट अयशस्वी ठरल्याची बातमी दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांतून दिली गेली. नंतर जयप्रकाश यांची रवानगी हजारीबाग तुरुंगात झाली. देशामध्ये चालू असलेल्या दडपशाहीच्या बातम्यांनी ते अस्वस्थ होत. तुरुंगात दिवाळसण साजरा होत असताना या संधीचा फायदा घेऊन आपल्या इतर पाच कैदी-सहकाऱ्यांसह तुरुंगाच्या उत्तुंग भिंती ओलांडून ते पसार झाले. बनारसला येऊन त्यांनी अनेक देशांच्या सेनाधिकाऱ्यांना भारतीय स्वातंत्र्याची योजना कळवणारे संदेश पाठविले. बिहारमध्ये कोसी नदीच्या काठी क्रांतिकारी युवकांसाठी एक प्रशिक्षण केंद्र त्यांनी सुरू केले. तेथे त्यांचेबरोबर डॉ. राममनोहर लोहिया आले. जयप्रकाश तुरुंगातून पळून गेल्याची चर्चा साऱ्या देशात होत होती. त्यांना पकडण्यासाठी सरकारने २१ हजारांचे बक्षीस जाहीर केले होते. सरकारला या केंद्राचा सुगावा लागल्याचे कळताच, लोहियासह जयप्रकाश नेपाळकडे जाण्यास निघाले. सीमा पार करीत असतानाच नेपाळी पोलिसांनी त्यांना पकडले. परंतु त्यांच्या हातावर तुरी देऊन ते निसटले. भूमिगत राहूनच पुन्हा ते क्रांतीच्या कार्यात कार्यमग्न झाले.

सप्टेंबर १९४३ मध्ये अमृतसर-लाहोर प्रवास करीत असताना, मोगलसराय स्टेशनवर वेष बदललेल्या जयप्रकाशांना ओळखण्यात पोलीस यशस्वी झाले. अटक करून त्यांची रवानगी लाहोर तुरुंगात झाली. तेथे त्यांना कठोर यातना भोगाव्या लागल्या. परंतु देशाच्या स्वातंत्र्यासाठी झपाटलेल्या या सेनानीकडून सरकारला त्यांच्या योजनेबद्दल काही कळू शकले नाही. डॉ. राममनोहर लोहियांना काही दिवसांनंतर मुंबईत अटक झाली आणि त्यांची रवानगी पण याच तुरुंगात झाली. योगायोगाने लाहोर तुरुंगाच्या काळकोठडीत तेरा महिन्यानंतर मित्र-भेटीचा हा स्वप्नवत् दिवस उजाडला.

११ एप्रिल १९४६ रोजी जयप्रकाशांची तुरुंगातून सुटका झाली. ठिकठिकाणी स्वागतपर, अभिनंदनाच्या सभा आयोजित झाल्या. जयप्रकाशांची लोकप्रियता वाढत गेली. देशात स्वातंत्र्य चळवळ जोरात होती. देशातील थोर नेत्यांच्या धोरणांविषयी जयप्रकाश, लोहिया असंतुष्टच होते. दिल्ली, नोआखाली, बिहार वगैरे ठिकाणच्या जातीय दंगलींमुळे तर व्यथित मनाने काँग्रेस

वर्किंग कमेटीचा राजीनामा देण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. लोहियांनी त्याचे समर्थन करून निराळा पक्ष स्थापन करण्याची कल्पना मांडली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला. आनंदाचा दिवस. साऱ्या देशात आनंदाने सोहळे होऊ लागले. पण विभाजनामुळे हृदय विदीर्ण झाले होते. देशाच्या विभाजनाने जयप्रकाश अत्यंत दुःखी झाले. त्यांचे दुःख गांधींना कळत होते. त्यांनी प्रभावती देवींना जयप्रकाशांच्या विचारसरणीशी सहानुभूती दर्शवून त्यांच्याबरोबर राहावयास सुचविले. जयप्रकाशांनी आपल्या विचार-सरणीच्या सहकार्यांसह काँग्रेसमधून बाहेर पडून समाजवादी पक्षाची स्थापना केली. स्वतंत्र भारतात काँग्रेस विरोधाचा अर्थ देशद्रोह नसून, सरकारच्या काही धोरणांचा विरोध होय, ही भूमिका त्यांनी स्पष्ट केली. जयप्रकाश अधिक जोमाने कामास लागले. २५ नोव्हेंबर १९४९ रोजी पाटण्यात त्यांनी अभूतपूर्व असा विराट किसान मेळावा आयोजित केला.

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये समाजवादी पक्षाचा दारुण पराभव झाला. काँग्रेसला गुप्तपणे मदत केली, नेहरूंशी मैत्रीचे संबंध राखले इत्यादी आरोप जयप्रकाश यांच्यावर करण्यात आले आणि पक्षाच्या पराभवाचे खापर त्यांच्याच माथी मारण्यात आले. ज्या पक्षासाठी सारे जीवन वेचले होते, त्या पक्षातील आपल्या सहकाऱ्यांकडून करण्यात आलेल्या या आरोपांमुळे जयप्रकाश खूपच दुःखी झाले.

यानंतरच्या काळात सक्रीय राजकारणापासून अलिप्त राहून केवळ अध्ययन आणि आत्मचिंतनात जयप्रकाश मग्न झाले. आपला देश महान संकटाच्या खाईत जात आहे आणि त्याला वाचविण्यासाठी काही प्रयत्न न केल्यास इतिहास क्षमा करणार नाही ही जाणीव पण त्यांना होतीच. याच काळात त्यांचे लक्ष विनोबांच्या भूदान कार्याकडे गेले. १९५२ मध्ये वांदा येथे त्यांची विनोबांशी भेट झाली. थोडयाच अवधीत विनोबांच्या सहवासात जय-प्रकाशांना 'सत्ताहीन' मार्गावरून जाण्याची दृष्टी प्राप्त झाली. जयप्रकाशांनी टपाल व तार खात्याच्या कर्मचाऱ्यांना काही आश्वासने दिली होती. सरकारकडून त्यांची पूर्तता झाली नाही. पश्चात्ताप-दग्ध जयप्रकाशांनी जून १९५२ मध्ये २१ दिवसाचे उपोषण केले. यानंतर त्यांनी स्वतःस भूदान कार्यास वाहून घेतले. एप्रिल १९५४ मध्ये बोधगयेच्या सर्वोदय संमेलनामध्ये त्यांनी सक्रीय राजकारणाला कायमचा रामराम ठोकून भूदान कार्यासाठी जीवनदान केल्याची घोषणा केली. जयप्रकाशांच्या प्रेरणेने जवळ जवळ ६०० कार्यकर्त्यांनी या कार्यासाठी जीवनदान केले. बिहारच्या एका मागासलेल्या

सोखोदेवरा या गावी सर्वोदयाच्या प्रयोगात जयप्रकाश कार्यमग्न झाले. भूदान चळवळ जेवढ्या तीव्र गतीने फोफावली तेवढ्याच गतीने ती मंदावली. ज्या संघर्षाची अन् त्यागाची जोड या कार्यास आवश्यक होती तिच्या अभावामुळे कदाचित् हे शैथिल्य आल्याची जाणीव जयप्रकाशांना झाली.

मुजफ्फरपूर येथे दोन सर्वोदय कार्यकर्त्यांचा, नक्षलवादी खून करणार असल्याची बातमी मे १९७० मध्ये मिळाली. जयप्रकाश प्रभावतीदेवीबरोबर तातडीने मुजफ्फरपूरला पोचले. तेथे गेल्यानंतर ही बातमी केवळ धमकी असल्याचे कळले. तेथील श्रीमंत, जमीनदार लोकांचा हा डाव होता. त्यांनीच सर्व कायदे हातात घेतले होते. निर्धन लोकांची असहाय अशी पिळवणूक चालू होती. त्यांचा अपराध हाच होता की ते अस्पृश्य म्हणून जन्मले. सामाजिक परिवर्तनासाठी महात्मा गांधींनी दाखविलेल्या मार्गाने सरकारशी अहिंसक असहकार चळवळ करावी लागेल याची तीव्र जाणीव त्यांना झाली.

नक्षलवादी, नागा इत्यादींचे प्रश्न सर्वोदयी मार्गांनी सोडविण्याच्या प्रयत्नांत जयप्रकाश गुंतले असतानाच ९१७१ मध्ये पाटण्यात एक घटना घडली. चंबळ खोऱ्यातील कुविख्यात डाकू माधोसिंह एका ठेकेदाराच्या वेषात जयप्रकाशांना भेटला. या माधोसिंहाला पकडण्यासाठी भारत सरकारने दीड लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. जयप्रकाशांच्या समक्ष त्याचे साथीदार डाकू शरण येण्यास तयार असल्याचा संदेश तो घेऊन आला होता. आपले गुरू विनोबा यांच्याकडे जाण्यास जयप्रकाशांनी त्यास सुचविले. माधोसिंहने विनोबांबद्दल श्रद्धा व्यक्त करून या प्रश्नी मात्र सरकार व डाकू यांच्यामध्ये जयप्रकाश यांनीच मध्यस्थ बनावे असा आग्रह धरला. केवळ फाशीची शिक्षा होऊ नये या एकाच अटीवर सर्व डाकू शरण येण्यास तयार होते. कित्येक प्रयत्न करून ज्या कार्यात भारत सरकार यशस्वी झाले नाही, ते कार्य जयप्रकाशांच्या व्यक्तिमत्त्वातून साध्य झाले. १४ एप्रिल १९७२ रोजी चंबळ खोऱ्यात कित्येक डाकूंनी जयप्रकाश यांचे समक्ष हत्यार टाकून आत्मसमर्पण केले.

१९७३ च्या एप्रिलमध्ये प्रभावती देवीचे निधन झाले. जयप्रकाश यांचेवर हा वज्राघातच होता, परंतु त्यांनी आपल्या राष्ट्रसेवेच्या कार्यात खंड पडू दिला नाही.

लोकशाहीचा प्राण असलेल्या निवडणुका निरनिराळ्या दृष्टींनी निरर्थक होत असल्याचे जाणवू लागले. १९७४ मध्ये वाराणसी येथे युवकांच्या एका सभेत पैसा, असत्य आणि भ्रष्टाचाराच्या बळावर लढविल्या जाणाऱ्या निवडणुकांसंबंधी युवकांनी जागृत होऊन, लोकशाहीच्या रक्षणास्तव पुढाकार

घ्यावयास हवा, असे आवाहन जयप्रकाशांनी केले. त्यांच्या भाषणाची तीव्र प्रतिक्रिया प्रथम गुजरातमध्ये झाली. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढलेल्या किमती, बेकारी वगैरे प्रश्नांवरून तेथील युवकांनी विधानसभा विसर्जित करविली. गुजरातनंतर बिहारमध्ये याच प्रश्नाबरोबर विशेषतः शिक्षण पद्धतीत बदल, शासनातील भ्रष्टाचार इत्यादी प्रश्नांवर उग्र स्वरूपाची चळवळ सुरू झाली. पोलिसांनी चळवळ दडपून टाकण्याचे आटोकाट प्रयत्न केले, परंतु युवक चळवळ संपूर्ण अहिंसात्मक मार्गाने चालूच राहिली. मार्गदर्शनासाठी आलेल्या युवकांना स्वतः आजारी असताना जयप्रकाशांनी मार्गदर्शन केले, एवढेच नव्हे तर पुढील दोन अटींवर त्यांच्याबरोबर सहकार्य करण्याचे मान्य केले. ह्या दोन अटी म्हणजे शांततेच्या मार्गानेच जावयाचे व कोणत्याही पक्षाचे असलात तरी एकजुटीने काम करायचे. सत्तर वर्षाच्या वृद्ध नेत्यात आणि युवकांत यामुळे एकतानता निर्माण झाली.

बिहार सरकारने युवक चळवळ अत्यंत क्रूरपणे चिरडून टाकण्याचे प्रयत्न चालू ठेवले. १८ मार्च १९७४ ला गया येथे पोलिसांच्या गोळीबारात आठ व्यक्ती मृत्युमुखी पडल्या. ८ एप्रिल १९७४ रोजी पाटण्यात जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली एक कि. मीटर लांबीचा ऐतिहासिक मूकमोर्चा निघाला. ५ जून १९७४ रोजी पाटण्यातच गांधीमैदानावर विराट सभेत जयप्रकाश यांनी संपूर्ण क्रांतीची घोषणा केली. ४ नोव्हेम्बर १९७४ ला शांततापूर्ण चळवळीत भाग घेणाऱ्यांवर अमानुष लाठीमार करण्यात आला. त्यातून जयप्रकाश पण सुटले नाहीत. अशाप्रकारे या चळवळीचे घटनाचक्र देशात वेगाने फिरू लागले. २६ जून १९७५ ला ऐतिहासिक आणीबाणी घोषित झाली. रातोरात शेकडो नेत्यांना अटक करण्यात आली. तुरुंगात जयप्रकाशांची प्रकृती अत्यंत चिंताजनक झाली तेव्हा १२ नोव्हेम्बर १९७५ ला त्यांना पॅरोलवर सोडण्यात आले. जयप्रकाशांच्या प्रकृतीविषयी साऱ्या देशात चिंतेची लाट पसरली. एक महिन्यानंतर त्यांची प्रकृति थोडी सुधारली. देशातील अनेक नेते तुरुंगात असल्याने तुरुंगाबाहेर जयप्रकाश अत्यंत व्यथित मनाने जीवन व्यतीत करीत होते.

युवक चळवळीतील नेतृत्वामुळे एकीकडे गुरुतुल्य विनोबांशी तात्त्विक भूमिकेवरून आलेल्या दुराव्याचे दुःख तर दुसरीकडे श्रीमती इंदिरा गांधींनी केलेल्या बेछूट आरोपांचे हलाहल, संयम आणि सहनशीलतेने पचवून, शांततेच्या मार्गावरील आपला अढळ विश्वास आणि अदम्य आशावाद यांचा आदर्श जयप्रकाशांनी जनतेसमोर ठेविला.

१८ जानेवारी १९७७ मध्ये सरकारने निवडणूक घोषित केली. सर्व विरोधी पक्ष, आपसातील मतभेद विसरून, जयप्रकाशांच्या नेतृत्वाखाली देश-कल्याणासाठी एकत्र आले. मार्च १९७७ मध्ये सत्ताधारी काँग्रेसचा दारुण पराभव झाला. जयप्रकाशांच्या प्रेरणेतून स्थापन झालेला जनता पक्ष निवड-णुकीत विजयी झाला. भारताचे दुसरे स्वातंत्र्य म्हणून संबोधिल्या जाणाऱ्या स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणारे लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी २४ मार्च १९७७ ला दिल्ली येथे महात्मा गांधींच्या समाधीजवळ नवनिर्वाचित संसद सदस्यांना शपथ देवविली.

स्वतःच्या मृत्यूच्या साक्षात्कारास स्वतःच साक्षी राहणाऱ्या जयप्रकाशांना आपल्या जीवनाच्या शेवटच्या काही दिवसात मृत्यूशी क्षणोक्षणी झुंज देण्यात जेवढ्या वेदना झाल्या असतील, त्यापेक्षा सहस्रपटीने अधिक वेदना संपूर्ण क्रांतीच्या स्वप्नभंगामुळे जीवनाच्या अंतकाळी मूकपणे सहन कराव्या लागल्या. देशाला नित्य नवा प्रकाश देत, गीतेतील निष्काम कर्मयोग्याप्रमाणे संपूर्ण जीवन हे सत्तेच्या राजकारणापासून दूर राहून जगणाऱ्या आणि संपूर्ण क्रांतीची ज्योत प्रज्वलित ठेवणाऱ्या जयप्रकाशांची जीवन ज्योत दि. ८ ऑक्टोबर १९७९ ला दिव्य प्रकाशात विलीन झाली.

* * *

निवडक संदर्भ ग्रंथ

१. जयप्रकाश नारायण : (संपादक ब्रह्मानंद)
टुवर्डस टोटल रिव्होल्यूशन, चार भाग
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७८

२. जयप्रकाश नारायण : (संपादक विमल प्रसाद)
सोशालिझम, सर्वोदय अँड डेमॉक्रसी,
एशिया पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९६४.

३. जयप्रकाश नारायण : टुवर्डस् स्ट्रगल, पद्म पब्लिशर्स, मुंबई १९४६

४. जयप्रकाश नारायण : थ्री बेसिक प्रॉब्लेम्स ऑफ फ्री इंडिया,
एशिया पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९६५

५. जयप्रकाश नारायण : मेरी विचार यात्रा,
सर्व–सेवा–संघ प्रकाशन, वाराणसी, १९७४

६. जयप्रकाश नारायण (अनु. सच्चिदानंद)
सामुदायिक समाज रूप और चिन्तन.
सर्व–सेवा–संघ प्रकाशन, वाराणसी, १९७२

७. जयप्रकाश नारायण : प्रिझन डायरी १९७५
अभय प्रकाशन, पुणे, १९७७

८. जयप्रकाश नारायण : संपूर्ण क्राती, चंद्रकांत वानखेडे, अमरावती

९. नारगोलकर वसंत : संपूर्ण क्रांतीच्या दिशेने जयप्रकाशजी,
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९७७

१०. नारगोलकर वसंत : अखेर जयप्रकाशजीच खरे ठरले !,
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९७७

११. नारगोलकर वसंत : जेपीज क्रुसेड फॉर रिव्होल्यूशन,
एस. चांद अँड कंपनी, नवी दिल्ली, १९७५

१२. गर्ग श्रवणकुमार : बिहार आंदोलन : एक सिंहावलोकन,
सर्व–सेवा–संघ प्रकाशन, वाराणसी, १९७४

१३. महादेवन टी. के. (संपादक) : जयप्रकाश नारायण अँड द फ्यूचर ऑफ इंडियन डेमॉक्रसी, अफिलियेटेड ईस्ट–वेस्ट प्रेस, प्रा. लि. नवी दिल्ली, १९७५

१४. मसानी मिनू : इज जेपी द अॅन्सर ? द मॅक मिलन कम्पनी ऑफ इंडिया लि., दिल्ली, १९७५

१५. स्कार्फ, अॅलन अँड वेन्डी : जेपी. हिज बायॉग्रफी, ओरियन्ट लाँगमन, नवी दिल्ली, १९७५

१६. भट्टाचार्य अजित : जयप्रकाश नारायण, अ पॉलिटिकल बायॉग्रफी

१७. राममूर्ति : जे. पी. का वर्ग संघर्ष,
सर्व–सेवा–संघ प्रकाशन, वाराणसी, १९७७

१८. राममूर्ति : लोकसमितियाँ, क्यों बने, कैसे बने, क्या करे ?
सर्व–सेवा संघ प्रकाशन, वाराणसी, १९७७

१९. वारिक आर. के. : पॉलिटिक्स ऑफ द जेपी मूव्हमेंट,
रॅडियन्ट पब्लिशर्स, नवी दिल्ली, १९७७

२०. भोळे भा. ल. : आधुनिक भारतातील राजकीय विचार,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८

सूची

उद्योगीकरण २–४, १३, १६,२७, ३३, ३५, ४२, ९४.
- खाजगी क्षेत्र ३-४, २७, ८५.
- सामुदायिक क्षेत्र ३, १३–१४, २६–२७, ८५.
- शहरीकरण २,३५, ७४,
- प्रदूषण २, ४, २३.
- तंत्रज्ञान ३, १७, २३-२६, ३३, ७४,
- विकास २, २८, २९, ३०, ३३, ३५, ९४-९५.

गांधीवाद १, ५, १४, १७, ३९, ५१, ७१, ८१, ८९,
- सर्वोदय ११, १५, १७, ३८, ४०, ४२, ८०, ८१, ९०.
- मार्क्सवाद १, ५, ७, ११, १२, १३, ४१, ८९, ९३.
- समग्र क्रांती १, ५, ७-८, १०, १४, १५, १७, १९, ३४, ३८-३९, ५१, ५८, ९०-९२.

ग्राम स्वराज्य ५, १५, ३२, ३५, ५१, ५३, ५४, ६०, ६२, ६६.
- ग्राम विकास ३२, ३५, ४९, ५१.
- विकेंद्रीकरण ५, १३, ५१-५२, ५८, ५९, ६३, ९३-९४.
- पंचायत राज ४९, ५३-५४, ७४,
- पक्ष पद्धती १५, ४८, ५४, ६१, ६२, ६४, ७८,
- सामुदायिक समाज ५२-५३, ७४,
- लोकसमित्या ६२, ६४, ६७

तंत्रज्ञान ३, १७, २३-२६, ३३, ३५,
- उपयुक्त ३, १७,
- आधुनिक २३, २४, २५, ७४
- मध्यम २४-२६
- उत्पादन तंत्र १७, २४-२६,

निवडणुका ७, ४७, ४८, ४९, ७८,
- लोकशाही ७, ४७, ४८, ४९, ५४, ६०-६१, ६२, ६३, ७८,
- पक्षपद्धती १५, ३७, ४८-४९, ५४, ५९, ७८,
- भ्रष्टाचार ३७, ७८, ८०

नोकरशाही ५, १२, १३-१४, १६, ६५, ९४-९५,
- वर्चस्व १३, १६, ७९, ९३, ९४, ९५,
- साम्यवाद १२, १३, ९३,
- भ्रष्टाचार १५, ६५, ७९, ९४,

भ्रष्टाचार ४, ५, ७, ८, १५, ३६, ३७, ५६, ८६,
- राजकीय ३७, ४७, ४८, ६३, ६४, ७८,
- प्रशासकीय ३७, ६३, ६५,
- सार्वजनिक ४, ७८-७९, ८६,
- लोकसमिती ६१, ६३, ६५, ६७,

मानवकेंद्रित क्रांती १, २, ५, ६, ७-८, ९, २२, २३, २४, २९-३०, ३२, ३३, ३४, ३९, ४१, ४४-४५, ५०-५४, ६१-६३, ९७,

राज्यवाद १२-१३, १५, १६, ४४-४५, ४९, ९३, ९५,
- लोकशाही ४-५, ४२-४३, ४५-४६, ४९, ७७, ७८, ९५,
- व्यक्तिस्वातंत्र्य ९, १३, ४१, ९४, ९५,
- सत्ता १६, ३९, ७७-७८,
- राजकारणी १५, ३७, ४४, ४५,
- विरोध १७, ५०, ५५, ९५-९७,

राष्ट्र ६९ – ७४,
- राष्ट्रवाद ६९-७१, ७२, ७६,
  जागतिक समुदाय ७५, ९६,
- लहान समुदाय १६, ७३-७४, ९६,
- भारतीय ७०, ७१-७२,
- आध्यात्मिक ७०, ७२, ७३,

लोकशाही ४, ५, ७, १२-१५, १८, ३६, ३७, ४२-४६, ४७-४९, ५९-६०, ६६-६७, ७७-७९, ९५,
- प्रक्रिया ४-५, ६-७, १५-१६, ४२–४५,
- विकेंद्रित ४-५, १५, ५८, ८५,
- सहभागी ५, ५०, ५७, ५९-६०, ६१-६२,
- संसदीय ४७-४९, ५९ ७८, ८०
- निवडणुका १५, ४७, ४८,
- मूल्ये ९-१०, ४२, ८७,
- जनसंघर्ष ६-७, १०, ३४-३५, ५६, ५९-६०, ६४, ८३–८४, ८७
- समस्या ४४, ४९, ५७, ५९, ६७, ६८, ८०, ८१, ८९-९८,

लोकसमित्या ५
- समग्र क्रांती ६६-६८
- रचना ५९-६०
- कार्ये ६१-६३,
- परीक्षण ६३-६८.

सत्ता ५, ६, ९४-९५
- केंद्रीकरण ५, १३, १४, १६, २७, ४७, ५९, ६३, ७८, ८५,
- विकेंद्रीकरण ४-५, १५, १८, ८५, ९४,
- नियंत्रण ७, ८, १५, १६, ४९, ५०-५४, ६१-६३, ८४-८८

समग्र क्रांती (संपूर्ण क्रांती) १-८, ९-१०, १५-१८, १९-२०, २९-३०, ३१,-३४, ३८-३९, ४०-४२, ५७-५८, ७४-७६.
- आर्थिक २-४, १६-१७, २३-३०,
- राजकीय ४-५, १५-१८, ३७, ४०- ५८, ५९- ६३, ७९,
- सामाजिक ६, ७, ९, १०, ३१, ३२, ३५, ३६, ३८-३९,
- सांस्कृतिक ८, १७-१८, ७२-७४, ७६
- शैक्षणिक ७-८, ३५, ३८,
- नैतिक ८, ९, १०, १७, २३, २४,
- आध्यात्मिक ८, ३३, ३९, ७२-७४, ७६
- मार्ग व तंत्र ८, १०, ३५, ६३, ७९-८०, ८१, ८३-८४, ८५-८८
- हिंसा-अहिंसा १०, ३३, ७९- ८३, ९०

समाजवाद ११-१८, २६-२८, ४०-४१, ४२, ४४, ९३,
- साम्यवाद १२-१४, ९२, ९३, ९५,
- जयप्रकाश ११-१८, ४१-४२, ५६, ९२,
- सर्वोदय १५-१८, ४२, ८१,
- समग्र क्रांती ३, ७, ९, ११, १३, १४, १५, १६, २७, ३५, ४०-४१, ५०-८९, ९१, ९३,

सामाजिक परिवर्तन ६, ७, ९, ३१, ३२
- मूल्यात्मक १, १७, १८, ३१-३३, ३५, ३९, ४३, ७१-७४, ८७, ८९,
- व्यवस्थात्मक १, ३२, ३५-३६, ५०-५४, ५९-६० ६२, ७४,-७६, ८७,
- संघर्ष ६, १०, ३५, ८४, ८६, ९२,
- नेतृत्व ३७, ३९,
- अनत्याचारी चळवळ १०, १८, ८३-८८, ९१-९२,
- अडथळे ३६, ३८,



विचार प्रकाशनाचे सभासद

१	श्री. वसंत मुळे	अध्यक्ष	कार्यकारिणी
२	श्री. सुनील दाते	चिटणीस	,,
३	श्री. हरीश देशमुख	कोषाध्यक्ष	,,
४	श्री. दिवाकर जोशी	सदस्य	,,
५	श्री. शरद अदवंत	सदस्य	,,
६	श्री. विजय देशपांडे	विश्वस्त	
७	सौ. कमल मुळे	सदस्य	
८	श्री. विश्वनाथ जोशी	,,	
९	श्री. दिनकर बोरीकर	,,	
१०	श्री. जीवन देसाई	,,	
११	श्री. शरच्चंद्र रत्नाळीकर	,,	
१२	श्री. वसंत देशपांडे	,,	
१३	श्री. रमेश ढोबळे	,,	
१४	श्री. प्रभाकर कुळकर्णी	,,	
१५	सौ. माधवी आपटे	,,	
१६	श्री. अशोक कुलकर्णी	,,	
१७	श्री. अशोक देशपांडे	,,	
१८	श्री. चन्द्रकांत न्यायाधीश	,,	
१९	श्री. भगवानदास वर्मा	,,	
२०	श्री. रमेश देशपांडे	,,	
२१	सौ. शशिकला जोशी	,,	
२२	श्री. आनंद ठाकरे	,,	
२३	श्री. प्रदीप देशपांडे	,,	
२४	श्री. राघवेन्द्र मोरखंडीकर	,,	
२५	सौ. शांता धुमाळ	,,	



समग्र क्रांती

व्यक्तीला अमरत्व तिच्या विचारामुळे मिळते.

जयप्रकाश नारायण यांच्या समग्र क्रांती-
वरील विचारांचा परिचय करून देणारे विचार-
प्रकाशनचे सहावे पुष्प

भागील प्रकाशने

१. भारतीय मध्यम वर्ग

२. भारताचे परराष्ट्रीय धोरण

३. भारतीय जाती व खेडी

४. जनता पक्ष : राजकारण व आर्थिक धोरण

४. क्रोचेचे सौंदर्य शास्त्र